


जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अमरावती, गुरुवार ७ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




# दापोली 'साई रिसॉर्ट' प्रकरणी अनिल परबांसह सर्व आरोपी निर्दोष

**रत्नागिरी :** गेल्या काही वर्षांपासून राज्याच्या राजकीय आणि कायदेशीर वर्तुळात चर्चेत असलेल्या दापोलीतील साई रिसार्ट प्रकरणाचा अखेर निकाल लागला असून, खेड येथील अतिरिक्त



जिल्हा व सत्र न्यायालयाने अनिल परब यांच्यासह सर्व आरोपींची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. या निर्णयामुळे दीर्घकाळ गाजलेल्या या प्रकरणावर पडदा पडला आहे.या प्रकरणात माजी मंत्री परब यांच्यासह तत्कालीन प्रशासकीय अधिका-यांवरही गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यामध्ये उपविभागीय अधिकारी, महसूल विभागातील अधिकारी तसेच मुरुड येथील तत्कालीन सरपंचांचा समावेश होता. आरोपींवर भारतीय दंड विधान अंतर्गत फसवणूक (कलम ४२०), गुन्हेगारी कट (१२०-ब), खोटी माहिती देणे (१७७, १८२) यांसह इतर कलमांखाली गुन्हे दाखल होते. याशिवाय भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा अंतर्गतही आरोप ठेवण्यात आले होते.सरकारी पक्षाने न्यायालयात असा दावा केला होता की, संबंधित रिसार्टचे बांधकाम पूर्ण नसतानाही कर आकारणी करून शासनाची फसवणूक करण्यात आली. तसेच खरेदीखतामध्ये इमारतीचा समावेश असूनही आवश्यक स्टॅम्प शुल्क न भरता महसूल बुडवण्यात आल्याचा आरोप होता. याशिवाय, सीआरझेड नियम उल्लंघन, अकृषी परवानगीसाठी बनावट कागदपत्रे आणि वीजजोडणीसाठी खोटी माहिती दिल्याचेही नमूद करण्यात आले होते. मात्र, बचाव पक्षाचे वकील ॲड. सुधीर शरद बुटाला यांनी न्यायालयात सादर केलेल्या युक्तिवादात जमीन आणि बांधकाम हे स्वतंत्र घटक असल्याचे स्पष्ट केले. न्यायालयाने हा मुद्दा ग्राह्य धरत, सरकार पक्षाला आरोप सिद्ध करता न आल्याने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. दरम्यान, हे प्रकरण केवळ न्यायालयीन पातळीवरच नव्हे तर राजकीय स्तरावरही गाजले होते. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी या प्रकरणावरून परब यांच्यावर सातत्याने आरोप करत आंदोलन आणि पत्रकार परिषदांच्या माध्यमातून मुद्दा जिवंत ठेवला होता. त्यामुळे साई रिसार्ट प्रकरण राज्यातील चर्चेचा केंद्रबिंदू ठरले होते.

# पेट्रोल, डिझेल अन् घरगुती गॅसचे दर स्थिर राहणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**अमेरिका-इराण संघर्षामुळे संपूर्ण जगालाच इंधन संकटाचा सामना करावा लागत आहे. यातच भारतातील सर्वसामान्य जनतेसाठी पेट्रोल, डिझेल आणि घरगुती एलपीजीच्या



किमतींसंदर्भात एक अत्यंत दिलासादायक बातमी समोर आली आहे. पेट्रोल-डिझेल आणि घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतींवर कोणताही परिणाम होणार नाही. त्यात कोणतीही वाढ केली जाणार नाही. केवळ व्यावसायिक एलपीजीच्या दरातच वाढ करण्यात आली आहे, असे सहसचिव सुजाता शर्मा यांनी एका आंतरमंत्रालयीन बैठकीत स्पष्ट केले आहे. याशिवाय, मे महिन्याच्या मध्यापर्यंत 'नयारा' ऑपरेशन्स सुरू करेल. यानंतर, रिलायन्स इंडस्ट्रीज आपल्या क्रूड युनिटच्या देखभालीसाठी तीन ते चार आठवडे कामकाज बंद ठेवणार आहे, असेही सुजाता शर्मा यांनी यावेळी सांगितले.

**आंतरराष्ट्रीय बाजाराची स्थिती -**आंतरराष्ट्रीय बाजाराचा विचार करता, गेल्या ३० एप्रिलला ब्रेंट क्रूडच्या किमती प्रति बॅरल १२६ डालर्सपर्यंत पोहोचल्या होत्या. अमेरिका-इस्त्रायल आणि इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली ही उच्चांकी पातळी होती. 'स्ट्रेट ऑफ होर्मुज'मधील तणावामुळे तेल टँकरच्या वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. महत्वाचे म्हणजे, हा इतिहासातील सर्वात मोठा पुरवठा अडथळा असल्याचे आंतरराष्ट्रीय उर्जा संस्थेने म्हटले आहे. खरेतर यामुळे संपूर्ण जगालाच ऊर्जा अथवा इंधन संकटाचा सामना करावा लागला आहे. अमेरिका आणि इराणमध्ये लवकरच शांतता करार होउ शकतो, असे वृत्त 'Axios'ने प्रसिद्ध केले आहे. यानंतर, बुधवारी ब्रेंट क्रूडच्या किमतीत मोठी घसरण दिसून आली आहे. कच्च्या तेलाचे दर ९ टक्क्यांनी घसरले असून ९९.७९ डालर्स प्रति बॅरलवर आले आहेत. यापूर्वीही ७ टक्क्यांची घसरण दिसून आली होती. अमेरिकन अधिकारी आणि काही सूत्रांच्या माहितीनुसार, व्हाईट हाउसने संकेत दिले आहेत की त्यांनी इराणसोबत युद्ध संपवण्यासाठी आणि अणु वाटाघाटींसाठी एक चौकट तयार करण्याच्या उद्देशाने एक करार अंतिम केला आहे.

# विशेष रेल्वेगाड्या आता नियमित धावणार

## विदर्भातील चार स्थानकांवर थांबा

**बुलढाणा :** भारतीय रेल्वेने काकीनाडा टाउन आणि हिसारदरम्यान धावणा-या विशेष गाड्या नियमित केल्या आहेत. या गाड्या आता



नवीन क्रमांकांसह नियमित गाड्या म्हणून चालवल्या जातील. ज्यामुळे प्रवाशांची सोय वाढेल आणि कामकाज अधिक सुव्यवस्थित होईल. विदर्भातील चार रेल्वेस्थानकांवर या गाड्यांचा थांबा राहणार आहे. यामुळे हजारो प्रवाशांची सोय होणार आहे. रेल्वे विभागाच्या वरिष्ठ सूत्रांनी ही माहिती दिली.

**१२ मेपासून प्रारंभ-** गाडी क्रमांक (०७७१७/ ०७७१८) काकीनाडा टाउन ते हिसार साप्ताहिक विशेष गाड्यांचे नियमित सेवांमध्ये रूपांतर केले जाणार आहे. गाडी क्रमांक १७२९५ काकीनाडा टाउन ते हिसार साप्ताहिक एक्सप्रेस १२ मे २०२६ पासून काकीनाडा टाउन येथून तर गाडी क्रमांक १७२९६ ही हिसार ते काकीनाडा टाउन साप्ताहिक एक्सप्रेस १५ मे २०२६ पासून प्रारंभ होणार आहे. गाडी क्रमांक १७२९५ साप्ताहिक एक्सप्रेस १२ मे २०२६ पासून दर मंगळवारी काकीनाडा टाउन येथून ०५.४० वाजता सुटेल आणि तिस-या दिवशी हिसार येथे १०.२० वाजता पोहचेल. गाडी क्रमांक १७२९६ साप्ताहिक एक्सप्रेस १५ मे २०२६ पासून दर शुक्रवारी हिसार येथून १४.१० वाजता सुटेल आणि तिस-या दिवशी काकीनाडा टाउन येथे २१.३५ वाजता पोहचेल.

**मलकापूरलाही थांबा-**काकिनाडा टाउन येथून निघणा-या गाडीला सामलकोट, राजमुंद्री, तादेपल्लीगुडम, एलुरु, विजयवाडा, गुंटूर, मिरयालगुडा, नालगोंडा, चार्लापल्ली, मेडचल, कामारेड्डी, निझामाबाद, बासर, धर्माबाद येथे थांबे राहतील. यानंतर महाराष्ट्र राज्यातील हजूर साहिब नांदेड, पूर्णा, बसमत, हिंगोली डेक्कन, वाशीम, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, धरणगाव, अमळनेर, नंदुरबार येथे गाडी थांबणार आहे. यानंतर उधना, वडोदरा, रतलाम, मंदसोर, नीमच, चित्तौरगढ, भिलवारा, बिजेनगर, नासिराबाद, अजमेर, किशनगढ, फुलेरा, रींगस जंक्शन, सिकर, नवलगढ, झुनझुनू, चिड़ावा, लोहारू, सदूलपूर मार्गे ही गाडी हिसार येथे पोहोचेल.

# 'वंदे मातरम्'ला राष्ट्रगीतासारखा दर्जा

## मंत्रिमंडळाची मंजुरी अपमान केल्यास किंवा गायनात अडथळा आणल्यास शिक्षा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**केंद्र सरकारने वंदे मातरमला राष्ट्रगीत जन गण मन समान दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपला मिळालेल्या विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार, बंकिमचंद्र चटर्जी यांनी रचलेल्या वंदे मातरम्वर आता तेच नियम आणि निर्बंध लागू होतील, जे सध्या राष्ट्रगीतावर लागू आहेत. म्हणजेच, त्याचा अपमान केल्यास किंवा त्याच्या गायनात अडथळा आणल्यास शिक्षा होईल. सध्या राष्ट्रीय ध्वज, संविधान आणि राष्ट्रगीताचा अपमान केल्यास तुरुंगवास, दंड किंवा दोन्हीची तरतूद




आहे आणि आता वंदे मातरमचाही यात समावेश केला जाईल.

**कायद्यात बदल आणि शिक्षेची तरतूद-**सरकार वंदे मातरमला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हा बदल करत आहे. यासाठी कायद्याच्या कलम ३ मध्ये सुधारणा केली जाईल. या कलमानुसार, जर एखादी व्यक्ती जाणूनबुजून राष्ट्रगीत गाण्यात अडथळा आणत असेल किंवा त्याला थांबवत असेल, तर त्याला तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा होउ शकतात. पुन्हा गुन्हा केल्यास किमान एक वर्षाच्या शिक्षेची तरतूद आहे. सुधारणेनंतर हेच नियम वंदे मातरमलाही लागू होतील.

**सरकारने मार्गदर्शक तत्त्वे जारी केली-** केंद्र सरकारने बुधवारी भारताचे राष्ट्रगीत वंदे मातरम्च्या गायनासाठी अधिकृत प्रोटोकॉलसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. मार्गदर्शक तत्त्वांनुसार, वंदे मातरमची संपूर्ण अधिकृत आवृत्ती, ज्यात सहा श्लोक आहेत आणि ज्याचा कालावधी अंदाजे ३ मिनिटे आणि १० सेकंद आहे, प्रमुख शासकीय समारंभांमध्ये सादर किंवा वाजवली जावी.(पान २ वर)

# काँग्रेसमध्ये आमचे अनेक धुरंधर आहेत, 6 जण निवडूनही आलेत

## हेमंत बिस्वा सरमांचे मोठे विधान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आसाममध्येभाजपा-एनडीएच्या सलग तिस-या विजयानंतर हेमंत बिस्वा सरमा यांनी एक मोठा दावा केला आहे. आदित्य धर यांच्या अलीकडील ब्लॉकबस्टर 'धुरंधर' चित्रपटाचा संदर्भ देत त्यांनी काँग्रेस पक्षावर टीका केली. काँग्रेस पक्षात आमचे धुरंधर नेते आहेत. काँग्रेसचे ३० उमेदवार असे होते ज्यांचे भाजपासोबत चांगले संबंध होते. यापैकी सहा उमेदवार विजयी झालेले आहेत, असे सरमा यांनी म्हटले आहे. १२६ सदस्यांच्या



आसाम विधानसभेच्या निवडणुकीत एनडीएने १०२ जागा जिंकल्या असून, त्यापैकी ८२ जागांवर भाजपाने विजय मिळवला आहे. भाजपाने एकूण ९० जागांवर निवडणूक लढवली होती. भाजपाचे मित्रपक्ष, आसाम गण परिषद आणि बोडोलँड पीपल्स फ्रंट यांनी प्रत्येकी १० जागा जिंकल्या. भाजपा २०१६ पासून आसाममध्ये सत्तेवर असून, यावेळी विजयाची हॅटट्रिक साधली आहे. यानंतर आता मुख्यमंत्री(पान २ वर)

# '118 आमदारांचा पाठिंबा असलेले पत्र घेऊन या'-राज्यपाल राजेंद्र आर्लेकर



## TVKचे तोंडी बहुमत!

**चेन्नई/वृत्तसंस्था :** तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत अभिनेता विजय यांच्या तमिळगा वेत्री कळघम अर्थात टीव्हीके पक्षाने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. मात्र, कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने राज्यात 'त्रिशंकू' स्थिती निर्माण झाली आहे. हा 'त्रिशंकू' चक्रव्यूह भेदून विजय यांना सत्ता स्थापन करावी लागणार आहे. काँग्रेसने टीव्हीकेला पाठिंबा दर्शवला आहे. सत्ता स्थापनेचा दावा करण्यासाठी अभिनेता विजय याने तामिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची भेट घेतली.

विजय यांच्या पक्षाने १०८ जागा जिंकल्या आहेत. तामिळनाडू विधानसभेच्या एकूण २३४ जागांपैकी सरकार स्थापनेसाठी ११८ जागांचे बहुमत आवश्यक आहे. सरकार स्थापनेसाठी विजय यांना अजून ११ आमदारांच्या पाठिंब्याची गरज आहे. विजय यांनी आधी काँग्रेस नेतृत्वाशी संपर्क साधला आहे. टीव्हीकेने एआयएडीएमकेचा युतीचा प्रस्ताव सध्यापुरता स्थगित केला आहे.

***कृपया ११८ सह्या (बहुमत) घेउन परत या-*** सूत्रांनुसार, अभिनेता विजय यांनी अद्याप ११८ आमदारांचे पाठिंब्याचे पत्र सादर केलेले नाही. बहुमतासाठी आवश्यक संख्याबळ आपल्याकडे असल्याचे त्यांनी(पान २ वर)

# प.बंगालमध्ये भाजप देणार महिला मुख्यमंत्री?

## रूपा गांगुली, अग्निमित्रा पॉल नावांची जोरदार चर्चा

**कोलकाता/वृत्तसंस्था :**पश्चिम बंगालमधील जोरदार विजयानंतर ९ मे रोजी भाजप सरकारचा



शपथविधी समारंभ पार पडणार आहे. मात्र, राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा नेमकी कुणाच्या खांद्यावर असणार, यासंदर्भात अद्यापही सस्पेन्स कायम आहे. यातच, भाजप महिला मुख्यमंत्री बनवू शकतो, अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात चांगलीच रंगत आहे. मात्र, ममता बॅनर्जी यांचा सलग दोन वेळ पराभव करणारे शुभेंदू अधिकारी हे या पदाचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत.



भाजपने अद्याप अधिकृत नावाची घोषणा केलेली नाही.

**या महिला उमेदवारांची जोरदार चर्चा -**महिलांचा विचरा करता, मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत अग्निमित्रा पॉल यांचे नाव आघाडीवर आहे. आसनसोल दक्षिणमधून त्यांनी तब्बल ४०८३९ मतांच्या फरकाने विजय मिळवला आहे. अग्निमित्रा या पेशाने प्रसिद्ध फॅशन डिझायनर आहेत. त्या २०२१ मध्ये पहिल्यांदाच निवडणूक जिंकल्या होत्या. यानंतर त्या बंगाल भाजपच्या उपाध्यक्षही झाल्या. दुसरे नाव आहे, 'महाभारत' मालिकेतून लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचलेल्या (पान २ वर)

# पराभव होताच ममतांच्या निकटवर्तीयांचे 'एक्झिट'!



**कोलकाता/वृत्तसंस्था :**पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत

### ज्या IAS अधिका-यासाठी घेतली होतीमोदींशी टक्कर; त्यांनीही दिला राजीनाम!

ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर, राज्याच्या प्रशासकीय वर्तुळात आता राजीनामा सत्र सुरू झाले आहे. महत्वाचे म्हणजे, ममता बॅनर्जी यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला आहे. मात्र, त्यांच्या अत्यंत जवळच्या मानल्या जाणा-या सनदी अधिका-यांनी आणि सल्लागारांनी मंगळवारी आपापल्या पदांचे राजीनामे दिले. यांत, माजी मुख्य सचिव अलापन बंद्योपाध्याय, एच. के. द्विवेदी, मनोज पंत आणि अर्थतज्ज्ञ अभिरूप सरकार (पान २ वर)

# *अभिषेक बॅनर्जींना मोठा धक्का!*

## *घराच्या सुरक्षेत कपात, पोलिसांचा ताफा गायब; शेजारी आनंदात*

**कोलकाता/वृत्तसंस्था :**पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या ऐतिहासिक निकालांनंतर राज्यातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. भाजपने सत्ता काबीज केल्यानंतर, आता तृणमूल काँग्रेसच्या बड्या नेत्यांचे वर्चस्व कमी होताना दिसत आहे. अशातच ममता बॅनर्जी यांचे पुतणे आणि टीएमसी खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्या घराबाहेरील कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत मोठी कपात करण्यात आली आहे. याचा आनंद त्यांच्या शेजा-यांना सर्वात जास्त झाला आहे.

अभिषेक बॅनर्जी यांच्या शांती निकेतन या निवासस्थानाबाहेर एरवी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात असायचा. मात्र, निवडणुकीचे निकाल समोर येताच ही सुरक्षा व्यवस्था शिथिल करण्यात आली. ४ मे पर्यंत या ठिकाणी ३०० ते ३५० पोलीस कर्मचारी पहारा देत असत पण आता हे सुरक्षा रक्षक



हळूहळू तिथून हटवले जात आहेत. इतकेच नव्हे तर घराबाहेर लावण्यात आलेली सुरक्षा यंत्रणाही काढून टाकण्यात आली आहे.

**स्थानिक नागरिकांची आनंदी प्रतिक्रिया-** अभिषेक बॅनर्जीच्या घराबाहेरील रस्ता सर्वसामान्यांसाठी मोकळा झाल्याने परिसरातील रहिवाशांनी समाधान(पान २ वर)

# 200 हून अधिक FIR, 433 जणांना अटक



**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर वातावरण तणावपूर्ण झालं आहे. भाजपाचा मोठा विजय आणि तृणमूल काँग्रेस १५ वर्षांनंतर सत्तेतून बाहेर

### ■ बंगाल निवडणुकीनंतर हिंसाचार, ■ पोलिसांची मोठी कारवाई

पडल्यानंतर राज्याच्या अनेक भागांतून हिंसाचार, तोडफोड आणि संघर्षाच्या बातम्या समोर आल्या. या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने आता परिस्थिती नियंत्रणात असल्याचा दावा केला आहे. राज्याच्या डीजीपींनी दिलेल्या माहितीनुसार, २०० हून अधिक एफआयआर (FIR) नोंदवण्यात आले असून ४०० हून अधिक जणांना (पान २ वर)

# अखेर पेन्शनचा तिढा सुटला!

## महाराष्ट्र शासनाचा ऐतिहासिक निर्णय सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची नियमावली जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील कर्मचा-यांना कोणती निवृत्तीवेतन योजना लागू होणार, याबाबत संदिग्ध स्थिती होती. नुकत्याच झालेल्या राज्य सरकारी कर्मचारी व शिक्षक संघटनाच्या संपात याविषयी मागणी रेटण्यात आली होती. तसेच जुनी निवृत्ती वेतन योजना लागू होणार नाही, हे सुद्धा शासनाने स्पष्ट केले होते. त्याचवेळी सुधारित योजनेबाबत लवकरच आदेश काढण्याची हमी दिली होती. अखेर बुधवारी त्यावर महाराष्ट्र शासनाने आदेश काढला आहे.

**सुधारित योजना-** राज्य शासनाने राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली (NPS) अंतर्गत असलेल्या कर्मचा-यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू करण्याची सविस्तर कार्यपद्धती एका शासन परिपत्रकाद्वारे जाहीर केली आहे. या निर्णयामुळे १ मार्च २०२४



पासून सेवेत असलेल्या आणि या योजनेचा पर्याय निवडणा-या कर्मचा-यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**निवृत्तीवेतनाचे स्वरूप असे-** या योजनेनुसार, ज्या कर्मचा-यांची सेवा २० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त झाली आहे, त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५०ऽ निवृत्तिवेतन आणि त्यावरील महागाई वाढ लागू होईल. १० ते २० वर्षांच्या दरम्यान सेवा झालेल्या कर्मचा-यांना त्यांच्या सेवेच्या प्रमाणात निवृत्तिवेतन दिले जाईल. या योजनेअंतर्गत किमान निवृत्तिवेतन ७,५०० रु पये निश्चित करण्यात आले असून, १० वर्षांपेक्षा कमी सेवा असलेल्यांना हे निवृत्तिवेतन लागू होणार नाही.

**विकल्प निवडण्याची मुदत-** पात्र आणि इच्छुक कर्मचा-यांनी या सुधारित योजनेत सहभागी होण्यासाठी आपला पर्याय ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत संबंधित कार्यालय किंवा विभाग प्रमुखांकडे सादर करणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे, ज्या कर्मचा-यांनी यापूर्वी NPS मधून काही रक्कम काढली असेल, त्यांना ती रक्कम १०% व्याजासह परत करावी लागेल. अन्यथा त्यांच्या निवृत्तिवेतनात त्याच प्रमाणात कपात केली जाईल.

**निधी जमा करण्याची प्रक्रिया निश्चित आहे-** योजनेच्या अंमलबजावणीसाठी खालील तांत्रिक बाबी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. ६०% परतावा जमा करणे. निवृत्तीच्या वेळी PFRDA कडून मिळणा-या संचित निधीतील ६०ऽ रक्कम कर्मचा-यांनी आहरण व संवितरण अधिका-यांकडे (DDO) जमा करणे अनिवार्य आहे. (पान २ वर)



# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, ७ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# अल्पवयीन आदिवासी मुलीवरील अत्याचार प्रकरणी संताप ; आरोपीच्या तात्काळ अटकेची मागणी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा तालुक्यातील खेर्डा जिरापुरे येथे १४ वर्षीय आदिवासी (गोंड) अल्पवयीन मुलीवर छेडछाड व जबरदस्तीचा प्रयत्न झाल्याच्या गंभीर घटनेने परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणात आरोपीवर कठोर कारवाई करून त्याला तात्काळ अटक करण्याची मागणी नागरिक व विविध सामाजिक संघटनांकडून जोर धरत आहे.

पीडित मुलीने कारंजा शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या जबानीनुसार, गावातील ५५ वर्षीय व्यक्तीने तिच्याशी अयोग्य वर्तन करत जबरदस्तीचा प्रयत्न केला तसेच तिला धमकावल्याचे उघड झाले आहे. मुलगी इयत्ता ९ वीमध्ये शिक्षण घेत असून तिचे आई-वडील मजुरी करतात. ओळखीचा फायदा घेत आरोपीने हा प्रकार केल्याचे समोर आले आहे. माहितीनुसार, २३ एप्रिल रोजी कारंजा बाजारात



आरोपीने मुलीशी अयोग्य संवाद साधण्याचा प्रयत्न केला होता. त्या वेळी घाबरल्यामुळे मुलीने ही बाब घरी सांगितली नव्हती. मात्र २ मे रोजी सकाळी ती घरी एकटी असताना आरोपी घरात शिरून दार बंद करून तिच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. मुलीने धाडसाने प्रतिकार करत स्वतःची सुटका केली. त्यानंतर आरोपीने तिला पैसे देऊन गप्प बसवण्याचा प्रयत्न केला व जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही समोर आले आहे.

घटनेनंतर मुलीने प्रथम आपल्या आत्याला व नंतर आई-वडिलांना सर्व प्रकार सांगितला. त्यानंतर कारंजा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून न्याय मिळवण्यासाठी नागरिक पुढे सरसावले आहेत .

अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे राज्य प्रभारी अविनाश पंधरे यांनी घटनेचा तीव्र निषेध करत आरोपीला तात्काळ अटक करून कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. 'त्वरित कारवाई न झाल्यास मोठ्या प्रमाणात आंदोलन उभारण्यात येईल,' असा इशारा त्यांनी दिला. सामाजिक कार्यकर्ते सुजित भगत यांनीही प्रशासनावर टीका करत या प्रकरणात आरोपीविरुद्ध इध्ण्एध व ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून त्वरित अटक करण्याची मागणी केली. अन्यथा मोठ्या जनसमुदायासह तीव्र आंदोलन छेडले जाईल, असे त्यांनी सांगितले. या प्रकरणी पोलीस ठाण्यात मोठ्या संख्येने आदिवासी बांधव व महिला उपस्थित राहून पीडितेला न्याय मिळावा, अशी ठाम मागणी करण्यात आली. विविध सामाजिक कार्यकर्त्यांनीही यावेळी उपस्थिती दर्शवली.

पोलीसांनी या घटनेचा तपास सुरू केला असून आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल, असे सांगितले आहे. मात्र वाढता जनदबाव पाहता पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मान्सूनपूर्व तयारीला गती देत यंत्रणांनी १५ मे पूर्वी कामे पूर्ण करावीत –जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मान्सूनपूर्व तयारीला गती देत सर्व यंत्रणांनी समन्वयाने व काटेकोर नियोजनाने काम करावे, नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात मान्सूनपूर्व आढावा सभा घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, अतिरिक्त जिल्हा पोलिस अधीक्षक लता फड, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. पुढे बोलतांना जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी जिल्ह्यात संभाव्य पूरस्थिती, अतिवृष्टी तसेच नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला. पाटबंधारे व जलसंधारण विभागाने तातडीने ?क्शन प्लॅन तयार करावा, तसेच प्रकल्पस्थळी आवश्यक खबरदारी घेऊन बॅरिकेटिंग करावे, असे स्पष्ट निर्देश दिले.

आपत्ती व्यवस्थापनासाठी वितरित करण्यात आलेले साहित्य सुस्थितीत आहे की नाही याची खातरजमा करून त्याचे प्रत्यक्ष



**मान्सूनपूर्व तयारीबाबत आढावा सभा**

प्रात्यक्षिक (ड्रिल) घेण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. बाहेरून येणाऱ्या नद्यांच्या पाण्यामुळे जिल्ह्यात आपत्तीजनक परिस्थिती उद्भवू नये यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी संपर्क अधिकारी नेमून त्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन शाखेत सादर करावी, असेही त्यांनी सांगितले.

जलसंधारण विभागाने जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित झालेल्या तलावांची सविस्तर माहिती सादर करावी, तसेच वायरलेस सुविधा तात्काळ सुरू करून आपत्ती काळात संदेशवहनासाठी ती कार्यान्वित ठेवावी, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.परिवहन विभागाने जिल्ह्यातील अपघातप्रवण स्थळांची पाहणी करून सविस्तर अहवाल सादर करावा, असेही यावेळी त्यांनी सांगितले.

नालेसफाईची कामे तातडीने व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करावीत, ड्रेनेज व्यवस्था सक्षम ठेवावी, पूरप्रवण भागांची ओळख करून आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, तसेच धरणे व तलाव पातळीवर सतत निरीक्षण ठेवावे, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

आरोग्य विभागाने साथीच्या रोगांवर नियंत्रणासाठी पुरेसा औषधसाठा, फॉगिंग मोहीम, स्वच्छता व जनजागृती कार्यक्रम राबवावेत. आपत्कालीन रुग्णसेवा अखंडित राहण्यासाठी रुग्णवाहिका व वैद्यकीय पथके सज्ज ठेवावीत, वीज वितरण व सार्वजनिक बांधकाम विभागाने देखभाल-दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करून सेवा अखंडित ठेवावी, तर आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. आपत्ती व्यवस्थापनाच्या बाबतीत स्वयंसेवी संस्थांचे चांगले सहकार्य आजपर्यंत मिळाले असून पुढेही असे सहकार्य मिळावे.अशी अपेक्षा जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केली. सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व मुख्याधिकारी व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

# 'छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान' समाधान शिबिर



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

राजस्व प्रशासनाला अधिक लोकाभिमुख करण्यासाठी आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ थेट जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी मालेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबिराचे आयोजन ८ मे रोजी सकाळी १० वाजता मालेगाव तहसील कार्यालय येथील मीटिंग हॉलमध्ये वाशीम उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर आणि तहसीलदार दिपक पुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. या समाधान शिबिरामध्ये नागरिकांची प्रलंबित महसुली कामे मार्गी लावली जाणार आहेत. तसेच, शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यात येणार आहे. एकाच छताखाली प्रशासकीय सेवा उपलब्ध करून देऊन जनतेच्या समस्यांचे निराकरण करणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. यावेळी निवासी नायब तहसीलदार रंजना गोरे, महसूल नायब तहसीलदार अरविंद करांगळे, निवडणूक नायब तहसीलदार सुनिल देशमुख, पुरवठा निरीक्षण अधिकारी बळीराम वांजोळ यांच्यासह महसूल मंडळाचे सर्व अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. तरी, नागरिकांनी शिबिरात मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या कामांचे निराकरण करून घ्यावे व शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# बुद्ध मूर्ती विटबंना प्रकरणी रिसोड कडकडीत बंद

## त्या समाजकंटकांना सोडणार नाही - सोनाजी इंगळे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुका वाढोणा येथे बुद्ध मुर्ती तोड फोड करून विंटबना केल्याच्या कारवाई साठी काल रिसोड शहर बंदचे आवाहन करण्यात आले होते. वंचित बहुजन आघाडी, भारतीय बौद्ध महासभा, रावण मित्र मंडळ तथा इतर सामाजिक संघटनांच्या वतीने रिसोड शहर बंद ची हाक दिली होती. रिसोड व्यापारी मंडळींनी त्याला १००ऱ् प्रतिसाद देऊन आपली प्रतिष्ठाने दिवसभर बंद ठेऊन घटनेचे गांभीर्य ओळखले. व्यापारी मंडळाने स्वयफुर्तीने सर्व व्यापा-यानी आपपाली दुकाने बंद ठेवून बंद साठी सहकार्य केले सर्व बंद कोणतेही गालबोट न लागता शांततेत यशस्वी करण्यात आला त्याबद्दल व्यापारी मंडळाचे धन्यवाद व्यक्त करण्यात आले.



वंचित बहुजन आघाडी, भारतीय बौध्द महासभा विविध संघटनेच्या वतिने ठाणेदार पोलीस स्टेशन रिसोड व तहसीलदार रिसोड यांनी कडक कारवाई करण्यासाठी निवेदन देण्यात आले. यावेळी वंचीत बहुजन आघाडीचे मा. जिल्हामहासचिव सोनाजी इंगळे, तालुका अध्यक्ष महेश तिडके, मा शहर अध्यक्ष प्रदिप खंडारे, प्रकाश गवई, जियाऊर खान, मा. जिल्हाध्यक्ष डॉ. रविंद्र मोरे पाटील, मा उपाध्यक्ष गिरिधर शेजुळ, मा. जिल्हाध्यक्ष महिला आघाडी प्रमिलाताई शेवाळे, मंदाताई धांडे, बहुसंख्येने पदाधिकारी उपस्थित होते, भारतीय बौद्ध महासभेच्या वतिने तालुका अध्यक्ष माधव हिवाळे, जिल्हाउपाध्यक्ष शालिग्राम पठाडे, संध्याताई पंडित, देविदास सोनुने, मंदाताई वाघमारे, मीनाताई चव्हाण महानंदा वाठोरे, सुमित जमधाडे प्रा. जयवंतराव हेलोडे, भगवान जाधव, बहुसंख्येने पदाधिकारी उपस्थित होते. या प्रसंगी जिल्हाउपाध्यक्ष शालिग्राम पठाडे, सोनाजी इंगळे यांनी जनतेला शांततेचे आवाहन करण्यात आले. व्यापा-यांनी रिसोड शहर बंद साठी आपपाली प्रतिष्ठिने बंद ठेवून सहकार्य केल्याबद्दल आभार व्यक्त केले. आणि प्रशासनाने लवकरात लवकर आरोपीस पकडुन कारवाई करावी नसता आंबेडकरी जनता रस्त्यावर उतरेल कायदा व सुव्यवस्था बिघडु शकते त्याला प्राधासन जबाबदार राहील असे सांगितले.

# वाशिमच्या पोलीस अधीक्षकपदी आयपीएस नितेश खाटमोडे पाटील यांचा पदभार स्वीकार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या आदेशानुसार आयपीएस नितेश खाटमोडे पाटील यांनी दि. ५ मे रोजी वाशिम जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक पदाचा अधिकृतपणे पदभार स्वीकारला.

यावेळी मावळते पोलीस अधीक्षक अनुज नारे (घ्झ्ए) यांनी त्यांना पदभार सुपूर्द करत पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. नवीन पोलीस अधीक्षकांकडून जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासोबतच जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यावर भर दिला जाणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



# मानोरा–कारंजा प्रशिक्षणाचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा



**जनगणना २०२७**

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम जनगणना २०२७ही अत्यंत महत्त्वाची राष्ट्रीय प्रक्रिया असून तिची अचूक, पारदर्शक व वेळेत पूर्तता करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काटेकोरपणे प्रशिक्षण आत्मसात करणे आवश्यक आहे.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

मानोरा व कारंजा येथे जनगणना २०२७ अनुषंगाने आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमास जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी भेट देऊन कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. त्यांनी प्रशिक्षण केंद्रांतील प्रत्यक्ष कार्यवाहीची पाहणी केली तसेच प्रशिक्षणार्थी व संबंधित यंत्रणेशी संवाद साधून माहिती संकलन प्रक्रिया, डिजिटल प्रणालीचा वापर आणि क्षेत्रीय अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान जनगणना कार्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पद्धती, अचूक माहिती नोंदणी, तसेच समन्वय यंत्रणेचे महत्त्व यावर विशेष भर देण्यात आला. जनगणना कार्यात कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी प्रत्येक स्तरावर दक्षता घेण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

मानोरा व कारंजा येथील प्रशिक्षणाची तयारी समाधानकारक असल्याचे निरीक्षण नोंदवत जिल्हाधिकाऱ्यांनी पुढील टप्प्यातील काम अधिक गतिमान करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# वाशीममध्ये पक्ष्यांसाठी पाण्याची सोय मंत्री निवासात उपक्रम राबवला

■ प्रतिनिधी | वाशिम ■

उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेमुळे पक्ष्यांना पाण्याची मोठी गैरसोय होत असल्याच्या पार्श्वभूमीवर शहरात जागोजागी त्यांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी, या उद्देशाने हे स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे. हा उपक्रम सुरू करण्याच्या मागचा उद्देश म्हणजे पक्ष्यांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी मातीच्या लहान कुंड्यांचे पाणवटे तयार करून ते वाशीम शहरातील विविध ठिकाणी लावण्यात येतील किंवा लोकांनी लावावे आणि याबद्दलची जागृती व्हावी.

हा उपक्रम जयराज मनिष मंत्री आणि लक्ष मनिष मंत्री यांच्या पुढाकारातून साकारण्यात आला असून, त्यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत 'मंत्री निवास' येथेही विशेषतः पाणवटे बसविण्यात आले असून, परिसरातील पक्ष्यांना त्यामुळे मोठा दिलासा मिळत आहे.

उन्हाळ्यात पाण्याअभावी अनेक पक्ष्यांचे जीव धोक्यात येतात. अशा परिस्थितीत नागरिकांनीही पुढाकार घेऊन अशा प्रकारचे पाणवटे आपल्या घराच्या अंगणात, गच्चीवर किंवा सार्वजनिक ठिकाणी ठेवावेत, असे आवाहन या उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात आले आहे.तसेच, ज्यांना पाणवटे हवे असतील त्यांनी आमच्याशी संपर्क साधून ते उपलब्ध करून घेऊ शकतात, अशी माहितीही देण्यात आली आहे.

# महाकौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्थाचालक असोसिएशनच्या विदर्भप्रमुखपदी डॉ. माधव हिवाळे यांची निवड

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कौशल्याधारीत व्यवसाय प्रशिक्षण देवून युवकांना रोजगाराभिमुख व सक्षम करणाऱ्या राज्यातील विविध प्रशिक्षण संस्थांना भेडसावत असणाऱ्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाकौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्थाचालक असोसिएशनच्या विदर्भप्रमुखपदी येथील सामाजीक कार्यकर्ते, वैद्यकीय तज्ञ व पत्रकार डॉ. माधव हिवाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



असोसिएशनचे अध्यक्ष सुहास पाटील व सरचिटणीस राज सोनावले यांनी ही नियुक्ती केली असून ५ मे रोजी डॉ. हिवाळे यांना निवडीचे पत्र देण्यात आले.

स्थापना झाल्यानंतर असोसिएशनने राज्यस्तरावर अभियान छेडून संस्थाचालकांचे विविध प्रश्न शासन दरबारी मांडून ते मार्गी लावले आहेत. यासोबतच शासनाला दिलेल्या विविध निवेदनाच्या माध्यमातून शासकीय सेवांच्या माध्यमातून भेडसावत असलेल्या विविध समस्यांचा निपटारा करुन संस्थाचालकांना दिलासा दिला आहे. विदर्भप्रमुखपदी डॉ. माधव हिवाळे यांच्या नियुक्तीमुळे विदर्भातील संस्थाचालकांच्या समस्या सुटतील अशी आशा निर्माण झाली आहे. या नियुक्तीबद्दल डॉ. हिवाळे यांचे विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# साडीचा पदर चाकात अडकला; महिलेचा जागीच मृत्यू



■ प्रतिनिधी | मानोरा ■

मोटारसायकलच्या मागील चाकात साडीचा पदर अडकून झालेल्या अपघातात एका महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दि. ४ मे रोजी सोमवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास मानोरा तालुक्यातील कुपटा गावाजवळ घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, आसोला खुर्द येथील उषाबाई पुरुषोत्तम गिरी या दुचाकीवरून लग्नानिमित्त बाहेरगावी जात असताना कुपटा गावाजवळ पोहोचताच त्यांच्या साडीचा पदर अचानक मोटारसायकलच्या मागील टायरमध्ये अडकला. त्यामुळे संतुलन बिघडून त्या रस्त्यावर खाली पडल्या. या अपघातात उषाबाई गिरी यांच्या डोक्याला व शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापत झाली. जखमा अतिशय गंभीर असल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली, मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या अकाली निधनामुळे आसोला खुर्द गावात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सुना , नातवंडे असा परिवार आहे. या घटनेमुळे दुचाकीवर प्रवास करताना साडी किंवा ओढणी यांसारख्या वस्त्रांबाबत काळजी घेण्याची गरज आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार : नराधमाविरुद्ध गुन्हा दाखल

## चान्नी ठाणे हद्दीच्या सावरगावातील आरोपीचा शोध सुरू

■ प्रतिनिधी | खेट्री ■

चान्नी ठाणे हद्दीतील एका गावात दहा वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी सावरगाव येथील ६० वर्षीय नराधाम जगराम गोविंदा आडे यांच्याविरुद्ध ५ मे रोजीच्या रात्री उशिरा चान्नी पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेनंतर नराधाम घटनास्थळावरून पसार झाला आहे. पीडित मुलीचे आई-वडील नेहमीप्रमाणे ५ मे रोजी सुद्धा शेतात मजुरी करण्यासाठी गेले असता, मुलगी घरात एकटी असल्याची संधी साधून , नरधमाने घरात घुसून अत्याचार करण्यासाठी मुलीच्या अंगावरील कपडे काढले असता, नराधमाच्या तावडीतून सुटण्यासाठी मुलीने आरडाओरडा केला, परंतु नराधमांने मुलीचा तोंड दाबून तिच्या






आईला जीवे मारण्याची धमकी देऊन बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित करून मुलीवर अत्याचार केल्याचा आरोप मुलीच्या आईने चान्नी पोलिसात दिलेल्या तक्रारीतून केला आहे. या धक्कादायक घटनेची जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी गंभीर्य लक्षात घेता, नराधमाला तत्काळ जेरबंद करण्याच्या दिलेल्या आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखेचे शंकर शेळके, चान्नी पोलिस स्टेशनचे ठाणेदार रवींद्र लांडे यांनी आपल्या ताफ्यासह सावरगाव येथे ६ मे रोजीच्या संध्याकाळी ७ वाजेपर्यंत गावासह जंगलात नराधमाचा शोध घेण्यासाठी मोहीम राबवली परंतु नराधाम आढळून आला नाही, पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार नराधमाच्या शोधासाठी स्थानिक गुन्हे शाखा व चान्नी पोलीस यांचे पथक विविध ठिकाणी रवाना झाले आहे.

**नरधमाचा अवैध व्यवसाय गावात दहशत!**

नरधाम जगराम गोविंदा आडे व त्याचा मुलगा असे दोघेही बसस्थानकावर किराणा दुकानात पेट्रोल, देशी दारू, गुटका, आदी अवैध व्यवसाय करतात, त्यांच्या मुलाविरुद्ध अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने पोक्सो, पेट्रोल व दारूची अवैध विक्री आदी गुन्हे चान्नी पोलिसात दाखल आहे. अवैध व्यवसायामुळे बाप लेक दोघांची गावात दहशत आहे. वेळेस दखल घेऊन तडीपार करण्याची गरज आहे.

**जिल्हा पोलीस अधीक्षक लक्ष ठेवून !**

दहा वर्षीय मुलीवर ६० वर्षीय नरधमाने केलेल्या अत्याचारामुळे अकोला जिल्हा हादरला असून, जिल्ह्यात एकच खडबड उडाली आहे. त्यामुळे आरोपीला लवकर अटक करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षकांनी संबंधितांना आदेश दिले असून,या प्रकरणावर जिल्हा पोलीस अधीक्षक अर्जित चांडक लक्ष ठेवून आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १५९ ■ गुरुवार, ७ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# विद्यार्थी घटले... शाळा गटांगळ्या खातायत

## शिक्षण राज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातच ८ मराठी शाळांचे विलिनीकरण

**वर्धा । जनमाध्यम :** ज्या जिल्ह्याने राज्याला शिक्षण राज्यमंत्री दिला, त्याच वर्धा जिल्ह्यात मराठी शाळांचे अस्तित्व धोक्यात आले आहे, हीच आजची सर्वात मोठी शोकांतिका ठरली आहे. घटती विद्यार्थीसंख्या, शिक्षकांचा तीव्र तुटवडा आणि शासनाच्या धोरणातील गोंधळ यामुळे तब्बल ८ शाळांचे विलिनीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, शिक्षण क्षेत्रात संतापाची लाट उसळली आहे.

जिल्हा परिषद वर्धाच्या माध्यमिक शिक्षण विभागाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी हा निर्णय राबवत, संबंधित शाळांमधील विद्यार्थ्यांना जवळच्या शाळांमध्ये स्थलांतरित करण्याचे आदेश दिले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे काही शाळांमध्ये एकही शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत नसल्याची स्थिती समोर आली आहे,जी थेट शिक्षण व्यवस्थेच्या अपयशावर बोट ठेवणारी आहे.

शासनाने अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन केल्याचा दावा केला असला तरी प्रत्यक्षात अनेक शाळा 'ओस पडलेल्या' दिसत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात असले, तरी ही उपाययोजना की शिक्षण व्यवस्थेचा अंत? असा सवाल उपस्थित होत आहे.



हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू आणि कारंजा तालुक्यातील शाळा या निर्णयाच्या कचाट्यात सापडल्या आहेत. संबंधित मुख्याध्यापकांना तातडीने विलिनीकरण प्रक्रिया पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले असून, गटशिक्षण अधिकाऱ्यांना देखरेखीची जबाबदारी देण्यात आली आहे.

दरम्यान, अनेक जुनी व ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या शाळा बंद होण्याच्या मार्गावर आल्याने पालक, शिक्षक आणि शिक्षणप्रेमींमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. काही शाळा व्यवस्थापनांनी या निर्णयाविरोधात न्यायालयात जाण्याची तयारीही सुरू केली आहे.

**भरती नाही, अनुदान नाहीष्ठ मग शाळा टिकणार कशा?**

२०१२ पासून शिक्षक भरतीच झालेली नाही. वेतन व अनुदानात होणारा विलंब, १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय आणि अनुदानित शाळांकडे असलेली उदासीनता यामुळे आज ही परिस्थिती निर्माण झाली आहे. मंजूर शिक्षकसंख्या अपुरी असल्याने वर्ग चालविणेही अवघड झाले आहे.

**सतीश जगताप, अध्यक्ष विदर्भ मुख्याध्यापक संघ**

आज ८ष्ठ उद्या ४०! शिक्षण मंत्र्यांच्या जिल्ह्यातच शाळांवर 'काळी छाया

सध्या काही निकषांमध्ये शिथिलता देऊन काही शाळा तात्पुरत्या वाचल्या असल्या, तरी पुढील वर्षात सुमारे ४० शाळा बंद होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तज्ज्ञांच्या मते, इंग्रजी माध्यम आणि स्वयंअर्थसहाय्यित शाळांना दिलेल्या सवलतींमुळे पारंपरिक मराठी शाळांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे.

**विलिनीकरणाचा फटका बसलेल्या शाळा**

**हिंगणघाट तालुका**

मीराबाई महंतारे विद्यालय (काजळसारा), अरुण थुटे लोकविकास विद्यालय (सेलू-मुरपाड), मातोश्री खोडे प्राथमिक शाळा, स्व. इंदिरा गांधी विद्यालय,

**आर्वी तालुका**

उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव (हातला), भारत माता विद्यालय,

आदर्श विद्यालय, पीएमश्री नगर परिषद हायस्कूल,

**देवळी तालुका**

नवजीवन माध्यमिक विद्यालय (दहेगाव), यशवंत विद्यालय (सोनोरा),

नूतन विद्यालय (कवठा रेल्वे), यशवंत विद्यालय (वायफळ)

**सेलू तालुका**

संत नानाजी महाराज विद्यालय, महाकाळ माध्यमिक विद्यालय,

**कारंजा तालुका**

जगदंबा विद्यालय, नवप्रभात विद्या मंदिर (ठाणेगाव),

**अखेरचा प्रश्न...**

शिक्षण मंत्र्यांच्या जिल्ह्यातच शाळा वाचत नाहीत, तर उर्वरित राज्याचे काय? आज ८ शाळा विलीन झाल्याष्ठ उद्या किती? मराठी शिक्षणाचा पाया हादरतोय, आणि शासन मात्र कागदोपत्री निर्णयांच्या आड लपले आहे,हीच खरी वेदना,

# पालकमंत्री डॉ. भोयर यांचा उद्या सेलूत जनसंवाद

## -बोर नदीवरील पुरभिंतीचे भूमिपूजन

**सेलू जनमाध्यम :**वर्धा व भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर हे उद्या शुक्रवार, ८ मे रोजी सेलू तालुक्याच्या दौऱ्यावर येत असून विविध कार्यक्रमांतून नागरिकांशी थेट संवाद साधणार आहेत. सायंकाळी ५ वाजता बाजार परिसरातील शिव मंदिर सभागृहात आयोजित जनसंवाद कार्यक्रमात ते तालुक्यातील नागरिकांच्या समस्या जाणून घेणार आहेत. स्थानिक प्रश्नांना तातडीने न्याय मिळावा, यासाठी या संवादाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून नागरिकांमध्ये उत्सुकता वाढली आहे.



डॉ. भोयर हे गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, खनिकर्म व सहकार राज्यमंत्री म्हणून कार्यरत असून त्यांनी अल्पावधीत जिल्ह्यातील विकासकामांना गती दिली आहे. जनसंवादाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांची माहिती देत नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

यानंतर सायंकाळी ५.३० वाजता बोर नदीवरील पुर संरक्षक भिंतीच्या बांधकामाचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते होणार आहे. या प्रकल्पामुळे पूरस्थितीत परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून शेती व मालमत्तेचे संरक्षण होण्यास मदत होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार रामदास तडस राहणार असून अनेक मान्यवरांची उपस्थिती अपेक्षित आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# अल्पवयीनवरील अत्याचार दडपला? डॉक्टरसह दोघे जाळ्यात

**हिंगणघाट जनमाध्यम :** अकरा वर्षीय मुलीचा लैंगिक छळ प्रकरणी वडनेर येथील डॉ. जवाहरचंद खत्री यांना पोलिसांनी ताब्यात घेत अटक केली आहे. पाचवीत शिकणाऱ्या एका मुलीवर आरोपीने बलात्कार केल्याचे पुढे आल्यावर तिच्या पालकांच्या तक्रारीवरून वडनेर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी नरेश हिरबा दिवे हा मुलीचा नातेवाईक आहे. पीडितेचे वडील घर सोडून गेल्यानंतर त्याने मुलीला फुस लावून तिचा लैंगिक छळ केला. तिच्या त्रासामुळे वडिलांनी मुलीला वडनेर मधील सुयश क्लिनिकमध्ये डॉ. जवाहर खत्री यांच्याकडे नेले.

प्रकरणाचे गांभीर्य असूनही त्यांनी हे प्रकरण पोलिसांपासून लपवल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. त्यांनी पीडितेला फक्त औषध देऊन घरी परत पाठवले. यापूर्वी पोलिसांनी आरोपी नरेश हिरबा दिवे (वय ५२) यास ताब्यात घेतले होते.

तर आता डॉक्टरचीही चौकशी सुरू होती. डॉक्टरने पीडितेवर झालेल्या कथित अत्याचाराची पुष्टी केली. घटनेची माहिती असूनही पोलिसांना कळवण्यात आले नाही. या संदर्भात पोलिसांना ठोस पुरावे मिळाले आहे. डॉक्टरने पीडितेला काही औषधही दिले होते. रुग्णालय आणि मेडिकल स्टोअरमधील सीसीटीव्ही फुटेजही तपासण्यात आले. आरोपी मुलीसोबत दिसला होता. अखेरीस वडनेर पोलिसांनी डॉ. जवाहरचंद खत्री (वय ६३) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले आहे. वडनेर पोलिस ठाण्याचे अधिकारी श्याम पाटील यांच्या मार्गदर्शनात पुढील तपास सुरू आहे.

# वर्धा-हिंगणघाट मार्गावर भीषण अपघात : मोटरसायकल चालक ठार

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा–हिंगणघाट मार्गावरील इंझापूर परिसरात बुधवारी सायंकाळच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात मोटरसायकल चालकाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून वाहतुकीत काही काळ खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, मोटरसायकल (क्रमांक एमएच ३२ एक्स ६९५५) वर्ध्याकडे येत असताना समोरून येणाऱ्या बोलेरो (क्रमांक एमएच ४० बीएल ७८३८) या वाहनाला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की मोटरसायकल चालक गंभीर जखमी होऊन जागीच मृत्युमुखी पडला.





अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, मृतकाची ओळख अद्याप पटलेली नसून त्याची माहिती मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

घटनेची नोंद सावंगी पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. या अपघातामुळे पुन्हा एकदा वर्धा–हिंगणघाट मार्गावरील वेगमर्यादा व सुरक्षिततेच्या मुद्द्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# किरकोळ कारणावरून रक्तरंजित संघर्ष; युवकाचा चाकू प्रहार

## आगरगाव चौफुलीत थरार; तिघांवर चाकूने हल्ला

**वर्धा जनमाध्यम :** दुचाकीच्या धडकेत श्वानाचा मृत्यू झाल्याच्या कारणावरून झालेला वाद चाकू हल्ल्यापर्यंत पोहोचल्याची धक्कादायक घटना नाचनगाव परिसरातील आगरगाव चौफुली येथे घडली. या घटनेत एक जण गंभीर जखमी झाला असून दोघांना किरकोळ दुखापत झाली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, परवेज उर्फ शहजाद शेख हबीब शेख (वय २२, रा. लहानुजीनगर) हा ५ मे रोजी सायंकाळी दुचाकीने जात असताना त्याच्या वाहनाची धडक लागून एका श्वानाचा मृत्यू झाला. ही बाब लक्षात आल्यानंतर मनोज रामसिंग चौहाण, बजरंग रावेकर व मंगेश गुल्हाणे यांनी संबंधित युवकाचा शोध घेतला.

आगरगाव चौफुली येथे आरोपी आढळल्यानंतर तिघांनी त्याच्याकडे जाब विचारला. या वेळी वाद वाढत जाऊन आरोपीने शिवीगाळ केली व अचानक चाकू काढून हल्ला चढविला. यात मंगेश गुल्हाणे (वय ३०) गंभीर जखमी झाले, तर त्यांना वाचवण्यासाठी गेलेले मनोज चौहाण व बजरंग रावेकर हेही जखमी झाले. झटापटीदरम्यान आरोपीही जखमी झाल्याची माहिती आहे.

जखमींना स्थानिकांच्या मदतीने पुलगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मंगेश गुल्हाणे यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अन्यत्र हलविण्यात आले.

या प्रकरणी मनोज चौहाण यांच्या तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण उघड; आरोपीला अटक, मुलगी सुखरूप परत

**वर्धा जनमाध्यम :** अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेणाऱ्या आरोपीस पोलिसांनी अत्यंत शिताफीने अटक करत मुलीचा शोध लावण्यात यश मिळवले आहे. या कारवाईमुळे दहेगाव पोलिसांच्या तपासाला मोठे यश मिळाले आहे.

दहेगाव पोलिस ठाण्यात फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांची १७ वर्षीय मुलगी ९ नोव्हेंबर २०२५ रोजी अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेली होती. याप्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. मुलगी व आरोपीचा शोध लागत नसल्याने गुन्ह्यात पुढे कलम १३४(४) ची भर घालून तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडे वर्ग करण्यात आला.

पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने संयुक्त पथक तयार करून तपास गतीमान केला. तांत्रिक तपास व गुप्त माहितीच्या आधारे आरोपी व पीडित मुलगी कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले येथून वर्ध्याकडे येत असल्याची माहिती मिळाली.

यानंतर वर्धा रेल्वे स्थानक व बसस्थानक परिसरात सापळा रचून पोलिसांनी आरोपी आकाश दिवाकर तडस (वय ३१, रा. घोराड, ता. सेलू) याला ताब्यात घेत अटक केली. तसेच अल्पवयीन मुलीची सुखरूप सुटका करून तिला तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले.

या प्रकरणाचा पुढील तपास दहेगाव पोलिस करत असून ही कारवाई पोलिस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली.

# कृषी युरियाचा औद्योगिक वापर; कंपनीसह पुरवठादारावर गुन्हा

**सेलू जनमाध्यम :**तालुक्यात कृषी वापरासाठी निर्धारित असलेल्या युरियाचा औद्योगिक कामासाठी बेकायदेशीर वापर केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी संबंधित कंपनी व पुरवठादार एजन्सीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून कृषी विभागाच्या मदतीने ही कारवाई करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, केळझर येथील 'सुआ एक्स्प्लोसिव्ह अँड ॲक्सेसरीज' या गोदामाची १७ ते ३० एप्रिल २०२६ दरम्यान तपासणी करण्यात आली. या तपासणीत टेक्निकल ग्रेड युरियाचा मोठा साठा आढळून आला. हा साठा औद्योगिक वापरासाठी ठेवण्यात आल्याचे निष्पन्न झाले. मात्र, नियमांनुसार अशा प्रकारे युरियाचे साठवण व वितरण प्रतिबंधित आहे.

सदर युरियाचे नमुने नाशिक येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले. अहवालानुसार हा युरिया कृषी वापरासाठी योग्य असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे कृषी युरियाचा औद्योगिक वापरासाठी साठा ठेवणे हे नियमांचे उल्लंघन असल्याचे समोर आले. यानंतर ५ मे रोजी करण्यात आलेल्या पुढील कारवाईत ४६ पोती युरिया जप्त करण्यात आला. जप्त मालाची किंमत सुमारे ८० हजार ५०० रुपये असल्याचे सांगितले जाते.

# नाचनगावात अवैध खत साठ्याचा भंडाफोड; ७ लाखांचा माल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** नाचनगाव येथे अवैधरित्या साठवून ठेवलेल्या खताच्या मोठ्या साठ्याचा कृषी विभागाच्या भरारी पथकाने भंडाफोड केला. बसस्थानक परिसरातील दोन ठिकाणी करण्यात आलेल्या कारवाईत ७२३ पिशव्या जप्त करण्यात आल्या असून त्यांची अंदाजे किंमत सुमारे ७ लाख रुपये असल्याचे सांगितले जाते. या प्रकरणी घेतलेल्या नमुन्यांचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित साठा इंझाळा येथील 'एनजीपी ॲग्रो केअर' या कृषी सेवा केंद्राचा आहे. मात्र, या केंद्राने खत साठवणुकीसाठी आवश्यक परवानगी घेतलेली नव्हती. गोदामात विविध प्रकारच्या खतांचा मोठ्या प्रमाणात साठा आढळून आला. त्यामुळे नियमांचे उल्लंघन झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. प्राथमिक तपासात खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे समोर आले. अनेक पिशव्यांवर आवश्यक माहिती मुद्रित नसल्याचे आढळले. तसेच सर्व पिशव्यांवर एकच बॅच क्रमांक व उत्पादन महिना नमूद करण्यात आल्याने शंका अधिकच बळावली आहे. नियमांनुसार खताच्या पिशव्यांवर उत्पादन, बॅच क्रमांक, घटकांची माहिती स्पष्टपणे नमूद असणे आवश्यक आहे.



भरारी पथकाने तातडीने संपूर्ण साठ्याच्या विक्रीवर बंदी घालत कारवाई केली. यासोबतच खताचे पाच नमुने घेऊन ते प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून शेतकरी वर्गात चिंता व्यक्त होत आहे. निकृष्ट किंवा अवैध खतामुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता असल्याने दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.


## नावात बदल

माझे पूर्वी RESHMA ANANDKUMAR KANKARIYA असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील RESHMA ANAND KANKARIYA हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- चित्रकूट लेआऊट संत कबीर वॉर्ड हिंगणघाट, वर्धा ४४२३०१

## नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर M1740367 वरील माझे ANANDKUMAR KANKARIYA असे नाव होते. माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील ANAND TRILOKCHAD KANKARIRA हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- चित्रकूट लेआऊट हिंगणघाट वर्धा ४४२३०१

## नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर V1657884 वरील माझे SUHAS SUNILRAO DHALE असे नाव होते. माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील SUHAS SUNIL DHALE हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता:- प्रबुद्ध नगर मसाळा, जिल्हा वर्धा

## जाहीर सूचना

धीरज सुरेश गाडेकर इस नाम के व्यक्ती का नाम पॅन कार्ड पे धीरज सुरेशपंत गाडेकर र्ल्ज़ू कराया गया है । यह दोनो नाम एक ही व्यक्ती के है ।अगर किसी को कोई दंराम्रूदह हो तो त्वरित संपर्क करे ।

**धीरज सुरेशपंत गाडेकर**
**म्हाडा कॉलनी देवळी**

## कोर्ट विद्यमान श्री. योगेश शिंदे, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट यांचे न्यायालय

प्रेस विज्ञप्ती

आपणास याव्दारे सुचीत करण्यांत येते की, अर्जदार सुनिल सिताराम कातडे, रा. संत तुकडोजी वार्ड हिंगणघाट ता. हिंगणघाट. जि. वर्धा यांनी कलम १३ (३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अंतर्गत अर्जदार यांचे वडील नामे सिताराम धॉडबाजी कातडे यांची मृत्यु मौजा हिंगणघाट ता. हिंगणघाट. येथे झाल्याने त्यांच्या दि. १४/०५/२०२४ रोजी मृत्युची नोंद नगरपरिषद कार्यालय हिंगणघाट जि. वर्धा यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तीकेमध्ये घेण्याचा आदेश होण्याबाबत अर्ज / प्रकरण सादर केले आहे.

वर नमुद मृत्यु नोंदणीबाबत हितसंबधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकती असल्यास ते त्यांनी स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी मार्फत पुराव्यासह कार्यालयीन वेळेत जाहीरनामा प्रसिध्दी दिनांकाचे ८ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. उशिरा प्राप्त होणारे किंवा पुरावे नसणारे आक्षेप / हरकती ग्राहय धरल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- हिंगणघाट
दिनांक :- ०१/०४/२०२६

योगेश शिंदे तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट

## जाहीर नोटीस

प्रोसेस क- ३२२२/२०२६

एम.जे.सी.कं. ७०/२०२६, सुधा संतोष मिश्रा वि. निरंक, पेशी ता. २०/०६/२०२६

वर्धा येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, वर्धा यांचे न्यायालयात, एम.जे.सी.कं. ७०/२०२६, सुधा संतोष मिश्रा वि. निरंक, पेशी ता. २०/०६/२०२६, सदरहु केसमध्ये संतोष बिजेंद्र मिश्रा, बिजेंद्रकुमार केदारनाथ मिश्रा व विनोदनी बिजेंद्र मिश्रा हे मयत असुन त्यांचा मृत्यू अनुक्रमे दि. २६/०६/२०१९, दि.२४/०४/२०२१ व दि. २०/०८/२०२२ रोजी झालेला आहे. अर्जदार कं ०१. सुधा संतोष मिश्रा हे मयत यांचे कायदेशीर वारसदार आहे. अर्जदार यांनी मयत संतोष बिजेंद्र मिश्रा, बिजेंद्रकुमार केदारनाथ मिश्रा व विनोदनी बिजेंद्र मिश्रा यांचा मृत्यू पश्चात या न्यायालयात मुंबई रेगुलेशन ॲक्ट १८२७ नुसार वारसान प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

सदरहू केसमध्ये कोणासही काही आपत्ती असल्यास अथवा काही सांगावयाचे असल्यास त्यांनी हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महीन्याचे आत ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, वर्धा यांचे न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यास कायदेशीर वारसहक्क कायद्या अन्वये प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज तारिख ०६/०५/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिले.

**आदेशान्वये**

**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, वर्धा**
**दि. ०६/०५/२०२६**

## कार्यालय ग्रामपंचायत पिपरी (भाईपूर) ता.आर्वी, जि.वर्धा

**ग्रा.पं.पिपरी (भाईपूर) ता.आर्वी, जि.वर्धा कडून ७/५/२०२६ ते १३.०५.२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निविदा अनुभवी पंजीकृत कंत्राटदारांकडून मागविण्यात येत आहे. निविदा द्विलिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. निविदा उघडण्याचा दिनांक १४.०५.२०२६ हा आहे.**

| अ. क्र. | कामाचे नांव | योजनेचे नांव | टी.एस. नंबर | निविदा फी | प्राकलन किंमत | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सार्वजनिक शौच्यालय बांधकाम करणे | SBM + १५ वा वित्त आयोग | ३१ | ५००/- | २९९८७० | १ टक्का |

अटी व शर्ती - ग्रा.पं.पिपरी (पु) भाईपूर नोटीस बोर्डवर लावण्यात येईल.

सरपंच,
ग्रा,पं.पिंपरी (भाईपूर)
ता.आर्वी, जि.वर्धा

सचिव,
ग्रा,पं.पिंपरी (भाईपूर)
ता.आर्वी, जि.वर्धा

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# 'मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी' उपक्रमाला शासनाची मान्यता

## विद्यार्थ्यांना इस्त्रोसह अमेरिकेतील नासा केंद्राला भेटीची मिळणार संधी -शालेय शिक्षण मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :**मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी उपक्रमाअंतर्गत राज्यातील विज्ञान प्रदर्शनांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणा-या विद्यार्थ्यांना इस्त्रो आणि अमेरिकेतील नासा केंद्राला भेट देण्याची संधी मिळणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली. यासाठी ३.३० कोटी रुपये खर्च करणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचारसरणी आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्यावर भर देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती आणि नवोपक्रमशीलतेला प्रोत्साहन देउन त्यांना भविष्यासाठी सक्षम बनविण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने 'मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रातील प्रगत संशोधन संस्थांचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार असून, त्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला चालना मिळून भविष्यातील संशोधक घडण्यास मदत होणार असल्याचा विश्वास शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाबाबत आवड निर्माण व्हावी, तसेच अनुभवाधारित शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे. या उपक्रमांतर्गत राज्यातील विज्ञान प्रदर्शनांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणा-या विद्यार्थ्यांना विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विज्ञान केंद्रांना भेट देण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तालुकास्तरावर विज्ञान प्रदर्शनात प्रथम येणा-या एकूण २१४८ विद्यार्थ्यांना जवळच्या विज्ञान केंद्रांना भेट देण्याचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच जिल्हास्तरावर निवड झालेल्या १८० विद्यार्थ्यांना बंगळुरू येथील इस्त्रो केंद्राला भेट देण्याचे आयोजन करण्यात येणार आहे. याशिवाय उच्च प्राथमिक स्तर (इयत्ता सहावी ते आठवी) आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर (इयत्ता नववी ते १२ वी) चे विद्यार्थी गटाकरिता राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात उत्कृष्ट ठरलेल्या ५१ विद्यार्थ्यांना अमेरिकेतील नासा केंद्राला भेट देण्याची विशेष संधी देण्यात येणार असून, या दौ-यासाठी सुमारे ३.३० कोटी रुपयांच्या खर्चास शासनाने मान्यता दिली आहे. उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर स्वतंत्र समित्या स्थापन करण्यात येणार असून, संबंधित स्तरांवरील अधिका-यांवर नियोजन व अंमलबजावणीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या उपक्रमासाठी आवश्यक निधी जिल्हा नियोजन समिती तसेच राज्याच्या अर्थसंकल्पीय तरतुदींमधून उपलब्ध करून दिला जाणार आहे.

# माजी सैनिकांच्या कुटुंबीयांसाठी शिक्षण, नोकरीमधील संधी वाढविण्यासाठी अभ्यास गट नेमणार

**मुंबई/प्रतिनिधी :** माजी सैनिकांच्या कुटुंबीयांना शिक्षण, नोकरी व इतर संधी उपलब्ध करून देण्यासाठी इतर राज्यांच्या धर्तीवर अभ्यास गट नेमण्याचे निर्देश माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले. माजी सैनिक, शहीद कुटुंबीय तसेच अपघातग्रस्त सैनिकांच्या विविध मागण्यांबाबत आज मेघदूत शासकीय निवासस्थानी महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीस महाएल्गार सैनिक एकतेचा आवाज माजी सैनिक सर्व संघटनीय सैनिक परिवार महाराष्ट्रचे कॅप्टन दाभाडे व पदाधिकारी, सामान्य प्रशासन विभागाचे गणेश पवार, माजी सैनिक कल्याण विभागाचे उपसंचालक ओमकार कापले तसेच संबंधित प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीदरम्यान माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सैनिकांच्या पाल्यांना शिक्षण, नोकरी व विविध क्षेत्रांत संधी उपलब्ध करून देण्यासाठी अभ्यास गट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच अर्हता प्राप्त पाल्यांना भेडसावणा-या अडचणी तात्काळ निकाली काढण्यासाठी शासन संवेदनशील व सकारात्मक भूमिका घेणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. देशसेवेसाठी आयुष्य अर्पण करणा-या आपल्या वीर जवानांच्या कुटुंबीयांच्या सन्मान, हक्क आणि सुविधांसाठी राज्य शासन कटिबद्ध असून त्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील, असेही मंत्री देसाई यांनी यावेळी सांगितले.

# नागरिकांनी जनगणनेच्या देशव्यापी स्वगणना मोहिमेत सहभागी व्हावे

**मुंबई/प्रतिनिधी :**जनगणना २०२७ च्या घरयादी व घरगणनेतील स्व-गणना प्रक्रियेत मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आपली माहिती संगणकाद्वारे एसई पोर्टल वर नोंदविली. राज्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी आपल्या कुटुंबाची माहिती जनगणना २०२७ च्या घरयादी व घरगणनेतील स्व-गणना प्रक्रियेत एसई पोर्टलवर नोंदवून जनगणनेच्या देशव्यापी स्व-गणना प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केले. यावेळी महाराष्ट्राच्या मुख्य प्रधान जनगणना अधिकारी डा. निरुपमा जे. डांगे, तसेच जनगणना कार्य संचालनालयाचे सहसंचालक संतोष पायस यांनी मुख्य सचिव यांना स्मृतीचिन्ह दिले. महाराष्ट्राच्या मुख्य प्रधान जनगणना अधिकारी डा. निरु पमा जे. डांगे यांच्या हस्ते गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर आणि मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डा. श्रीकर परदेशी यांनाही स्मृतिचिन्ह देण्यात आले. भारतीय जनगणनेच्या इतिहासात प्रथमच, देशातील प्रत्येक व्यक्तीला स्व-गणनेचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. स्व-गणना ही जनगणनेतील अशी प्रक्रिया आहे, ज्यात व्यक्ती जनगणनेची माहिती वेब पोर्टलद्वारे नोंदवितात. महाराष्ट्र राज्यासाठी स्व-गणना (एसई) पोर्टल १ मे, २०२६ ते १५ मे २०२६ पर्यंत कार्यरत राहील. भारताचे महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्त यांच्या कार्यालयाद्वारे एक वेब पोर्टल (https://se.census.gov.in) विकसित करण्यात आले आहे. हे पोर्टल जनगणनेत सहभागी होण्यासाठी एक सुरक्षित आणि सोयीस्कर माध्यम उपलब्ध करून देते त्यामुळे कुटुंबांना त्यांच्या सोयीनुसार त्यांची माहिती भरता येते. जनगणना प्रगणक जेव्हा घरी भेट देतील, तेव्हा स्व-गणनेद्वारे नोंदविलेल्या माहितीची पडताळणी, पुष्टीकरण आणि अंतिम सादरीकरणासाठी त्यांना स्व-गणना आयडी (एसई आयडी) देणे आवश्यक असेल. राज्यातील प्रत्येक व्यक्तीने ही जबाबदारी स्वीकारुन मोठ्या संख्येने 'स्व-गणना' सुविधेचा पर्याय निवडावा. जेणेकरून कुटुंबाची नोंद अचूकता आणि कार्यक्षमतेने होईल, असे आवाहनही मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी यावेळी केले.

# विकासाच्या बाबतीत आता नाशिक थांबणार नाही-मुख्यमंत्री

## कुंभ उद्योग संगम आणि नाशिक गुंतवणूक शिखर परिषदेचा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत समारोप

## क्षमता आणि सुविधांद्वारे औद्योगिक विकासाचा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला विश्वास



**नाशिक/प्रतिनिधी :** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने धार्मिक आणि आध्यात्मिक महत्व असलेले नाशिक शहर यापुढील काळात विकासाचे ग्रोथ इंजिन ठरेल, विकासाच्या बाबतीत आता नाशिक थांबणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. क्षमता आणि सुविधांद्वारे येथील औद्योगिक विकासाला ख-या अर्थाने बळ मिळेल आणि गुंतवणुकीच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

हाटेल ताज येथे आयोजित कुंभ उद्योग संगम आणि नाशिक गुंतवणूक शिखर परिषद २०२६ च्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, उद्योगमंत्री उदय सामंत, शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, खासदार शोभा बच्छाव, महापौर हिमगौरी आहेर-आडके, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, उद्योग विभागाचे विकास आयुक्त दीपेंद्र कुशवाह आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत विविध ३०० हून अधिक उद्योजकाच्या सोबत १३ हजार १९० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून ३२ हजार इतकी रोजगार निर्मिती होणार आहे.

विकासाची मोठी संधी असलेले नाशिक हे शहर असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जिल्ह्यात गुंतवणूक व्हावी यासाठीचा कुंभ उद्योग संगम उपक्रम अतिशय चांगला आहे. या गुंतवणूक परिषदेच्या माध्यमातून नाशिक विकासाच्या मुख्य धारेत पुन्हा आला आहे. मागील तीन वर्षांपासून आपण जिल्हा केंद्रित गुंतवणूक परिषद घेण्यात येत आहे. त्यामध्ये आतापर्यंत एकूण ३१ हजार ९४५ कोटी रुपयांची गुंतवणूक नाशिक जिल्ह्यात झाली आहे. त्यातून ६६ हजार जणांना रोजगार उपलब्ध होणार आहेत. आतापर्यंत झालेल्या सामंजस्य करारापैकी ७७ टक्के कार्यान्वित झाले आहेत. यामध्ये, इलेक्ट्र?निक्स, कृषीआधरित सेवा, ऑटोमोबाईल, वस्त्रोद्योग, सेवा क्षेत्रासह इतर उद्योगातील गुंतवणुकीचा समावेश असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**नाशिकमध्ये गेल्या दोन वर्षात ५७ हजार कोटींची गुंतवणूक**-नाशिक जिल्ह्यातही अनेक उद्योग समूहानी गुंतवणूक करण्यास स्वारस्य दाखवले असून त्यासाठी त्यांना आवश्यक जमीन उपलब्ध होणे गरजेचे आहे. महिंद्रा अँड महिंद्रा सारखी कंपनी नाशिकमध्ये गुंतवणूक करत आहे, जागा उपलब्ध झाल्यास या उद्योगाची त्वरित सुरूवात करण्यात येईल. याशिवाय, रिलायन्स, लार्सन अँड टुब्रो यासारख्या उद्योगांनी गुंतवणूक केली आहे. अनेक उद्योगसमूह येथे उद्योगविस्तारासाठी इच्छुक असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. गेल्या दोन वर्षात ५७ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक नाशिकसाठी आली असून दावोस येथे झालेल्या परिषदेत नाशिक जिल्ह्यासाठी १२ हजार कोटींची गुंतवणूक राज्य शासनाने आणल्याचे त्यांनी नमूद केले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात आता उद्योगाचे नवीन मॅग्नेट तयार झाले आहेत. उत्तर महाराष्ट्रामध्ये नाशिक हे नवे मॅग्नेट तयार झाले आहे. त्यामुळे नाशिकचा विकास आता थांबणार नाही. अहिल्यानगर, जळगाव, धुळे, नंदुरबार हेही उद्योगासाठी गुंतवणुकीचे ग्रोथ इंजिन होत आहेत. याशिवाय, मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना येथे मोठे उद्योग येत आहेत. विदर्भात नवीन मॅग्नेट तयार झालेत. विकासाचा समतोल साधण्याचा प्रयत्न राज्य शासन करीत असल्याचे त्यांनी नमूद केले

**भौगोलिक समतोलावर भर**-ते पुढे म्हणाले, महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करायची आहे. त्यामध्ये भौगोलिक समतोल असावा, यादृष्टीने काम सुरू आहे. सुरुवातीला केवळ मुंबई, पुणे आणि महानगर प्रदेश केंद्रित विकास असे धोरण होते. राज्य शासनाने जिल्ह्याला विकासाचे केंद्र केले पाहिजे, अशी भूमिका घेतली. जिल्ह्याच्या क्षमतांचा आणि सुविधांचा उपयोग केला पाहिजे. केवळ मोठ्या उद्योगांसोबत लघु उद्योगांना प्राधान्य देण्याचे काम राज्य शासनाच्या माध्यमातून होत असल्याचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, उद्योजकांनासाठी उद्योगस्नेही धोरण आखले. विविध परवानग्या एक छताखाली आणल्या. त्यासाठी मैत्री सारखी सुविधा निर्माण करण्यात आली असून त्यामुळे गुंतवणूकदारांचा वि□ास वाढला आहे. मैत्रीद्वारे ३ लाखाहून अधिक अर्जांवर कार्यवाही करण्यात आली आहे. राज्यात सर्वदूर उद्योग सुरू होत आहेत. महाराष्ट्र ही आता स्टार्टअप्सची राजधानी झाले आहे. राज्यात ३० हजाराहून अधिक स्टार्टअप्सची सुरुवात झाली आहे. शेती क्षेत्रात स्टार्ट अप्सने क्रांती केली आहे याशिवाय, एक जिल्हा एक उत्पादन मधे मूल्यवर्धन करून राज्य शासन त्या माध्यमातून ब्रॅण्डिंग करत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.कुंभमेळा विकासकामांमुळे ३ लाख कोटींची अर्थव्यवस्था तयार होईल.

राज्य शासन ३३ हजार कोटींची गुंतवणूक करत आहे. ही गुंतवणूक पुढील १५-२० वर्ष उद्योगासाठी मॅग्नेटच काम करेल, असा विश्वास व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यामुळे निर्माण झालेल्या दळणवळण सुविधा, ड्राय पोर्ट, पायाभूत सुवधा, रिंगरोड आदी सुविधांमुळे पुढील १० वर्षात ३ लाख कोटींची अर्थव्यवस्था नाशिक जिल्ह्यात तयार होईल. कुंभमेळा विकासाच्या दृष्टीने परिवर्तन करणारा ठरेल. गुंतवणूकच्या संधी आहेत. याशिवाय गोदावरी शुद्धीकरण, पर्यावरण रक्षण , जल शुद्धीकरण याकडे लक्ष आहे. कुंभ अधिक सुगम कसा होईल याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले

**समतेचा, श्रद्धेचा, पर्यावरण रक्षणाचा कुंभ होणार**

हा सिंहस्थ कुंभमेळा डिजिटल कुंभ करायचा आहे. त्याची चांगली तयारी सुरू आहे. कमी काळात सगळी कामे अधिक गतीने पूर्ण करण्यात येत आहेत. भेदभाव विरहित भारतीय संस्कृतीच्या आस्थेचा सर्वात मोठा अविष्कार आणि अर्थव्यवस्थेला गती देणारा समता आणि श्रद्धेचा मेळा म्हणजे कुंभमेळा आहे. कुंभमेळ्यात पर्यावरण संवर्धनासाठी देखील प्रयत्न करण्यात येतील. डिजिटल आणि तंत्रज्ञानाचा सर्वाधिक उपयोग असणारा हा कुंभ असेल.

# जायकासह महाराष्ट्रात वैद्यकीय क्षेत्र बळकट करण्यासाठी नवे पाउल -मुख्यमंत्री

## जायकाकडून 3 हजार 708 कोटींची वित्तीय सहाय्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या विकास प्रवासात विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान देणा-या (जायका) या आंतरराष्ट्रीय संस्थेसोबत आता वैद्यकीय क्षेत्रातही सहकार्याची नवी दिशा निर्माण होणार आहे. राज्यातील वैद्यकीय सेवा अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी जायका महाराष्ट्रसोबत भागीदारी करण्यास उत्सुक असून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय



सहाय्यता घेण्यास मंत्रीमंडळाने मान्यता दिली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की यापूर्वी आसाम आणि तामिळनाडू सारख्या राज्यांमध्ये यशस्वी प्रकल्प राबविल्यानंतर, जायका आता महाराष्ट्रातही मेडिकल केअर सिस्टम मजबूत करण्यासाठी पुढाकार घेत आहे. विशेषतः राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागासोबत समन्वय साधून हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रस्तावित भागीदारीत खालील महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे, सध्याच्या शासकीय वैद्यकीय, पॅरामेडिकल आणि नर्सिंग महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांचा विकास, आधुनिक निदान (डायग्नोस्टिक) यंत्रणा अधिक सक्षम करणे विशिष्ट आजारांसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स उभारणे. नवीन नर्सिंग आणि पॅरामेडिकल महाविद्यालयांची स्थापना करून प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे. आरोग्य व्यवस्थापन प्रणाली अधिक कार्यक्षम करण्यासाठी सहाय्य, राज्य सरकारच्या वतीने या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला असून, वैद्यकीय शिक्षण विभागाने आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याची तयारी दर्शविली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात यापूर्वीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. याशिवाय जळगांव, लातूर, बारामती, मिरज, कोल्हापूर, नंदूरबार व गोंदिया या सात जिल्ह्यांमध्ये १०० प्रवेश क्षमतेचे शासकीय बीएस्सी नर्सिंग विद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयांच्या पायाभूत सुविधांकरिता तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध व्हावी, याकरिता स्ट्रेन्थनिंग टर्शरी हेल्थ केअर डिलीव्हरी, मेडिकल एज्युकेशन सिस्टीम अण्ड नर्सिंग सिस्टीम इन महाराष्ट्र हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी जपानच्या इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सीकडून ३ हजार ७०८ कोटींचे वित्तीय सहाय्य उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या प्रकल्पात वर्धा, पालघर, रत्नागिरी, अहिल्यानगर या नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी तसेच मुंबईतील जीटी, सेंट जार्ज, धुळे, सोलापूर, अंबेजोगाई, अकोला, आयजीएमसी नागपूर, रत्नागिरी, पालघर, धाराशिव येथील नर्सिंग महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करण्यात येणार आहे. तर बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर येथील नर्सिंग महाविद्यालयांचे बांधकाम करण्यात येणार आहे.

# तूर व हरभरा खरेदीला मुदतवाढ

## राज्यातील शेतक-यांना मोठा दिलासा

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शेतक-यांच्या मागणीचा विचार करून केंद्र शासनाने खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत तूर व हरभरा खरेदीसाठी मुदतवाढ दिली आहे. तसेच हरभरा खरेदीत आणखी ५८ हजार ६३२ मेट्रिक टन वाढ केली असून आता राज्यात ८ लाख १९ हजार ८८२ मेट्रिक टन हरभरा खरेदी करता येणार असल्याची माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली. केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी राज्य शासनाच्या मागणीनुसार तूर खरेदीची मुदत ३१ मे २०२६ पर्यंत तर हरभरा खरेदीची मुदत २९ मे २०२६ पर्यंत वाढवून दिली आहे. तसेच हरभरा खरेदीत ५८ हजार ६३२ मेट्रिक टन उद्दिष्ट वाढवून दिले, याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चव्हाण यांचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी आभार मानले.

मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, सुरुवातीला केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत (एमएसपी) योजनेअंतर्गत तूर खरेदीसाठी ९० दिवसांचा तर हरभरा खरेदीसाठी ६० दिवसांचा कालावधी मंजूर करण्यात आला होता. मात्र राज्यातील शेतक-यांकडून मुदतवाढीची सातत्याने मागणी होत होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पणन विभागाने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून अतिरिक्तमुदतवाढ मिळवून दिली. किमान हमीभाव योजनेअंतर्गत तूर खरेदीला १ फेब्रुवारी २०२६ पासून सुरुवात झाली असून, १ मेपर्यंतचा कालावधी आता ३१ मे २०२६ पर्यंत वाढविण्यात आला आहे. खरीप हंगाम २०२५-२६ साठी राज्याला ३ लाख ३७ हजार मेट्रिक टन तूर खरेदीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. आतापर्यंत ३७ हजार ८०१ शेतक-यांकडून ६ लाख ८२ हजार ३७ क्विंटल तूर खरेदी करण्यात आली आहे. हरभरा खरेदीला १ मार्च २०२६ पासून सुरुवात झाली होती. आधी २९ एप्रिलपर्यंत असलेली मुदत आता २९ मे २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. हरभरा खरेदीसाठी सुरुवातीला ७ लाख ६१ हजार २५० मेट्रिक टन उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यात आणखी ५८ हजार ६३२ मेट्रिक टन वाढ करून एकूण उद्दिष्ट ८ लाख १९ हजार ८८२ मेट्रिक टन करण्यात आले आहे. आतापर्यंत ३ लाख ७ हजार ९७३ शेतक-यांकडून ७६ लाख १२ हजार ४९९ क्विंटल हरभरा खरेदी करण्यात आला आहे,अशी माहिती पणन मंत्री रावल यांनी दिली.

# शासकीय कर्मचा-यांसाठी हिंदी भाषा परीक्षा स्थगित



**मुंबई/प्रतिनिधी :** शासकीय कर्मचा-यांसाठी हिंदी भाषा परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी जाहीर केला आहे. मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपूर्वी तत्कालीन मुंबई सरकारने शासकीय पत्रव्यवहार व माहितीची देवाणघेवाण सुलभ होण्यासाठी कर्मचा-यांना हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य केले होते. मात्र, राज्य स्थापन झाल्यानंतर मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळाला असून, १ मे, १९६६ पासून वर्जित प्रयोजनांव्यतिरिक्त सर्वच शासकीय कामकाज मराठीतच करण्यात येत आहे. त्यामुळे, सध्याच्या परिस्थितीत हिंदीचा वापर फारसा होत नसल्याने, शासकीय कर्मचा-यांसाठी व अधिका-यांसाठी हिंदी भाषा परीक्षा सुरू ठेवणे संयुक्तिक ठरत नाही, असे त्यांनी नमूद केले. यासंदर्भात शासन स्तरावर चर्चा सुरू असून भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी हिंदी भाषा परीक्षा रद्द करण्याची मागणी मराठी भाषा विभागाकडे करण्यात आली होती. या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून, अंतिम धोरणात्मक निर्णय लवकरच घेतला जाणार आहे. अंतिम निर्णय होईपर्यंत भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी हिंदी भाषा परीक्षा स्थगित करण्यात येत असल्याचे भाषा संचालक अरूण गिते यांनी कळविले आहे.

# टाटा मेमोरियल रूग्णालयात अत्याधुनिक निदान सुविधांना बळकटी

**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील अग्रगण्य कर्करोग उपचार व संशोधन केंद्र असलेल्या टाटा मेमोरियल हॉस्पिटल येथे निदान व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी कार्पोरेट सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत महत्त्वपूर्ण प्रकल्प राबविण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत अत्याधुनिक स्वयंचलित ट्यूब लेबलिंग व बारकोडिंग प्रणाली (एपीटीएल) या तीन प्रगत यंत्रणांची यशस्वी स्थापना करण्यात आली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या नव्या प्रणालींमुळे नमुन्यांचे अचूक लेबलिंग आणि बारकोडिंग स्वयंचलित पद्धतीने होणार असून, मानवी त्रुटी कमी करण्यास मोठी मदत होणार आहे. परिणामी, निदान प्रक्रियेत अचूकता वाढणार असून रुग्णांच्या सुरक्षिततेत लक्षणीय सुधारणा होईल. तसेच, रुग्णालयातील क्लिनिकल वर्कफ्लो अधिक सुलभ आणि कार्यक्षम होणार आहे. विशेषतः कर्करोगासारख्या गंभीर आजारांमध्ये निदानातील अचूकता आणि वेळेवर उपचार अत्यंत महत्त्वाचे असतात. एपीटीएल प्रणालीमुळे नमुने हाताळण्यातील गोंधळ, विलंब आणि चुकीची ओळख यांसारख्या समस्या मोठ्या प्रमाणात कमी होतील. त्यामुळे डॉक्टरांना अधिक विश्वासार्ह अहवाल मिळून उपचार प्रक्रियेत गती येईल. या उपक्रमामुळे रुग्णालयातील प्रयोगशाळा व्यवस्थापन आधुनिक तंत्रज्ञानाशी सुसंगत होउन, जागतिक दर्जाच्या आरोग्य सेवांकडे आणखी एक पाउल टाकले गेले आहे. सीएसआरच्या माध्यमातून अशा प्रकारच्या अत्याधुनिक सुविधांची उभारणी केल्याने सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्यास मोठी मदत होत आहे. या उपक्रमासाठी इंडियन ऑइल कंपनीने सहकार्य केले आहे त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आभार व्यक्त केले. याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की 'टाटा मेमोरियल रुग्णालयात उभारण्यात आलेल्या या अत्याधुनिक एपीटीएल प्रणालीमुळे निदान प्रक्रियेत अचूकता, पारदर्शकता आणि गती वाढणार आहे. रुग्णांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याची ही दिशा महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे.

# विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय स्पर्धेत कबड्डी, खो-खोमध्ये महावितरण, राजस्थानची आगेकूच







**अमरावती/पुणे/प्रतिनिधी :** दि. ६ मे २०२४: एमएसईबी होल्डिंग कंपनीद्वारे आयोजित अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ४५ व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत बुधवारी (दि.६) झालेल्या चुरशीच्या साखळी सामन्यांमध्ये महावितरणच्या पुरुष व महिला संघाने प्रतिस्पर्धी संघावर सहज विजय मिळवला. तर खो-खोमध्ये महावितरणच्या पुरुष संघासह राजस्थानच्या महिला व पुरूष संघाने आगेकूच केली आहे. बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात आज पहिल्या सत्रात कबड्डी, खो-खोचे साखळी सामने झाले. कबड्डीच्या सामन्यांमध्ये महापारेषण संघाने मध्यप्रदेशच्या एमपी पावर संघाचा ३ गुणांनी पराभव केला. तर महावितरणने एकतर्फी वर्चस्व गाजवत महानिर्मिती संघाचा २६ गुणांनी पराभव केला. पंजाब पावरने उत्तराखंडच्या पावर ट्रान्समिशन कंपनीचा १७ गुणांनी आणि हरियाणा संघाने गुजरात संघाचा ३० गुणांनी पराभव केला. कबड्डीच्या महिला गटात हिमाचल प्रदेशने महापारेषण संघाचा ३२ गुणांनी तर महावितरणने हरियाणा पावर संघाचा ४८ गुणांनी एकतर्फी पराभव केला. खो खोच्या महिला गटात राजस्थान संघाने गुजरात उर्जा विकास निगम संघाचा पराभव केला. तर पुरुष गटात हरियाणा पावर संघाने मध्यप्रदेश पावर संघाचा, राजस्थान विद्युत निगम संघाने गुजरात उर्जा विकास निगमचा तर राष्ट्रीय खो खो संघाचा कर्णधार व महावितरणचा खेळाडू प्रतिक वाईकर याच्या नेतृत्वात महावितरणने हिमाचल प्रदेश राज्य विद्युत मंडळ संघाचा सहज पराभव केला.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# विकासाचा आदर्श

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारमधील विजयसोहळ्यात बोलताना विश्वास व्यक्त केला होता की, बिहार आणि ओडिशानंतर आता पश्चिम बंगालमध्येही 'कमळ' फुलेल. पाच राज्यांमधील निवडणूक निकालांनी यावर शिक्कामोर्तब केले. भाजपने प्रथमच प. बंगालमध्ये सत्ता स्थापन करून इतिहास रचला. सत्तेचा चौकार मारण्याच्या तयारीत असणाऱ्या ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसचा दारुण पराभव करत भाजपने बंगालमधील सत्तेची स्वप्नपूर्ती केली. 'संकल्प से सिद्धी' या पंतप्रधानांच्या सिद्धांताचा पुनःप्रत्यय या विजयाने देशातील जनतेला आला. २०१४ मध्ये देशात झालेल्या सत्तांतरानंतर महाराष्ट्र, हरियाणा, मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान अशा अनेक राज्यांमध्ये भाजपप्रणीत आघाडीने सत्ता मिळवली; पण तामिळनाडू, तेलंगणा, बिहार, दिल्ली आणि प. बंगालच्या विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपला सत्तेची चव चाखता आली नव्हती. गतवर्षी बिहार आणि दिल्ली विधानसभा जिंकल्यानंतर आता बंगाल जिंकत भाजपने मोठा टप्पा पार केला. बंगालमधील प्रचारात भाजपकडे 'बाहेरचे लोक' म्हणून पाहिले जात होते. त्यामुळेच विजयसोहळ्यात पारंपरिक बंगाली पेहराव करून पंतप्रधानांनी आपण बंगालच्या संस्कृतीशी पूर्णपणे समरस झालो आहोत, हा संदेश दिला. जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या स्वप्नातील 'नवा बंगाल' साकार झाल्याची भावनाही त्यांनी व्यक्त केली. ममता यांनी जाणीवपूर्वक केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांना आणि विकास कार्यक्रमांना विरोध दर्शवण्याची भूमिका घेतली होती. आयुष्मान भारत आणि पीएम किसान सन्मान निधी योजना त्यांनी बंगालमध्ये लागू केल्या नाहीत. यामुळे बंगाल विकासाच्या प्रक्रियेत मागे पडत गेला. तीन वेळा बंगाली मतदारांनी ममतांना सत्तेची संधी देऊनही मोठ्या उद्योगांचा अभाव आणि रोजगारासाठी होणारे स्थलांतर हे आजही या राज्यापुढील सर्वात मोठे प्रश्न आहेत. राज्याचा महसूल वाढण्यापेक्षा कर्जाचा डोंगर वाढत गेला. बंगालमधील सुशिक्षित तरुण नोकरीसाठी आजही बंगळुरू, पुणे किंवा हैदराबादला स्थलांतर करत आहेत. या स्थितीतून बंगालला विकासाच्या दिशेने नेण्यासाठी भाजपने 'शोनार बांगला' असा नारा प्रचारादरम्यान दिला होता. 'डबल इंजिन'चा फॉर्म्युला यासाठी ठळकपणाने मांडला गेला. तृणमूल सरकारच्या काळात प. बंगालमध्ये गुन्हेगारीचे साम्राज्य निर्माण झाले होते. येथील राजकीय हिंसाचार हाही सर्वात चर्चेचा विषय राहिला.

वस्तुतः डाव्या आघाडीच्या ३४ वर्षांच्या सत्तेनंतर राज्यात शांतता प्रस्थापित होईल अशी अपेक्षा होती; मात्र हिंसाचाराचे केवळ स्वरूप बदलले, तो संपला नाही. पंचायत निवडणुका असोत वा विधानसभा निवडणुका, येथे बॉम्बस्फोट आणि राजकीय कार्यकर्त्यांच्या हत्या यांचे सावट सदैव राहिले. राजकीय वर्चस्व राखण्यासाठी विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांची, नेत्यांची गळचेपी करणे हा तृणमूलचा शिरस्ता बनला होता. दक्षिण बंगालमधील अनेक जिल्ह्यांमध्ये 'कॉटलेज इंडस्ट्री' प्रमाणे गावठी बॉम्ब बनवले जाणे, हे या हिंसक संस्कृतीचे द्योतक ठरले. शिक्षक भरती घोटाळा आणि कोळसा तस्करी प्रकरणांनी सरकारी यंत्रणेतील भ्रष्टाचाराचे स्वरूप उघड केले. ईडीच्या अधिकाऱ्यांना कोंडून मारहाण करण्यापर्यंत तृणमूल समर्थकांची मजल गेली. सामाजिक - आर्थिक विषमता आणि रोजगाराच्या संधींचा अभाव यामुळे तरुणांचे गुन्हेगारीकडे वळण्याचे प्रमाण वाढत चालले होते. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांचे भेदक स्वरूप कोलकात्यातील वैद्यकीय महाविद्यालयात घडलेल्या प्रकरणाने समोर आले. प. बंगालला बांगला देशाशी जोडणारी मोठी आंतरराष्ट्रीय सीमा आहे. गेल्या १५ वर्षांत मानवी तस्करी, बनावट नोटांची छपाई आणि अमली पदार्थांची तस्करी हे मोठे आव्हान राहिले आहे. परदेशी नागरिकांकडून होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये बंगाल सातत्याने देशात अव्वल राहिला. घुसखोरी आणि सीमावर्ती भागातील गुन्हेगारीमुळे राज्याच्या अंतर्गत सुरक्षेवर ताण पडत गेला. गुन्हेगारी टोळ्या आणि राजकीय वरदहस्त असलेले गट यांच्या अभद्र युतीमुळे कायदा - सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला. घुसखोरीमुळे बंगालच्या लोकसंख्येचे स्वरूप बदलत असल्याचा आरोप पंतप्रधानांनी प्रचारात सातत्याने केला. घुसखोरी रोखण्यासाठी 'झीरो टॉलरन्स' धोरण राबवणार असून, डिटेक्ट, डिलीट आणि डिपोर्ट या मॉडेलवर काम करणार असल्याचा विश्वास बंगाली जनतेत त्यांनी निर्माण केला. निकालानंतर भाषणातून या आश्वासनांची पूर्ततेची हमी पंतप्रधानांनी दिली. अनेक दशकांपासून औद्योगिक पीछेहाट सोसणाऱ्या या राज्याला पुन्हा आर्थिक केंद्र बनवण्याची संधी आहे. केंद्र आणि राज्य समन्वय वाढून आता पायाभूत सुविधा आणि गुंतवणुकीला मोठी चालना मिळू शकेल. या नवीन कालखंडात बंगालच्या अर्थव्यवस्थेसाठी सर्वात महत्त्वाचा बदल हा व्यवसाय सुलभता या क्षेत्रात अपेक्षित आहे. दीर्घकाळापासून प्रलंबित जमीन सुधारणा कायदे आणि कामगार नियमांमध्ये बदल होण्याची गरज आहे. यामुळे मोठ्या कंपन्यांना राज्यात गुंतवणूक करणे सोपे होईल. कोलकात्यासह उपनगरांमध्ये नवीन औद्योगिक वसाहती निर्माण झाल्यास स्थानिक तरुणांना रोजगार संधी उपलब्ध होतील. पायाभूत सुविधांसाठी केंद्राच्या 'गती शक्ती' योजनेचा बंगालला मोठा फायदा होऊ शकतो. महामार्ग, रेल्वे नेटवर्कचे आधुनिकीकरण, कोलकाता व हल्दिया बंदरांचा विस्तार यामुळे व्यापार लॉजिस्टिकमध्ये सुधारणा होऊ शकेल. दक्षिण - पूर्व आशियाई देशांशी व्यापार वाढवण्यासाठी बंगालचे भौगोलिक स्थान महत्त्वाचे आहे. या राज्याला 'ॲक्ट ईस्ट' धोरणाचे प्रवेशद्वार बनवण्याचे भाजपचे उद्दिष्ट आहे. 'पीएम किसान' आणि इतर केंद्रीय योजनांची थेट अंमलबजावणी सुलभ होईल. अन्न प्रक्रिया उद्योगाला प्राधान्य देऊन शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळवून देणे आणि ग्रामीण भागातील कोल्ड स्टोरेजची साखळी भक्कम करणे, यावर नवीन सरकारने भर दिल्यास केवळ शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचे उत्पन्न वाढेल. पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी जागवलेल्या आशावादामुळे राज्यातील मध्यमवर्गाच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. प्रगतीचा आलेख उंचावण्यासाठी 'भयमुक्त बांगला' हे उद्दिष्ट पूर्ण होणे आवश्यक आहे. कारण, सामाजिक शांतता ही आर्थिक विकासाची पूर्वअट आहे. नवे मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्रिमंडळ यांच्यापुढे नव्या 'शोनार बंगाल'च्या उभारणीचे मोठे आव्हान असणार आहे. केंद्राच्या मदतीने ही उभारणी गतिमानतेने झाल्यास देशाच्या नकाशात हे राज्य विकासाचा नवा आदर्श घालून देईल.

# भाजपाची आसामवर भक्कम पकड

**मुख्यमंत्री हिमांता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखालील पायाभूत सुविधांचे जाळे आणि महिला केंद्रित योजनांनी भाजपला सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवून दिली.**



आसाममध्ये सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवताना भाजपाने यंदा प्रथमच स्वबळावर बहुमत मिळवले आहे. गेल्या दोन्ही निवडणुकींमध्ये त्यांना बहुमतापेक्षा तीन जागा कमी मिळाल्या होत्या. भाजपाने २००६च्या निवडणुकीत पहिल्यांदा दुहेरी आकडा (१०) गाठल्यानंतर या राज्यात सत्ता मिळवायचीच या दृष्टीने पावले टाकण्यास सुरुवात केली. पुढच्या निवडणुकीत पक्षाला हे यश टिकवता आले नाही, त्यांना पाचच जागा मिळाल्या.

पण २०१४मध्ये केंद्रात सरकार स्थापन झाल्यानंतर दोनच वर्षांनी झालेल्या निवडणुकीत भाजपाने ६० जागा जिंकत मित्र पक्षांच्या साहाय्याने पहिल्यांदाच सरकार स्थापन केले. गेल्या निवडणुकीतही भाजपाला ६०च जागा मिळाल्या होत्या. या वेळी मात्र, पक्षाने खणखणीत यश मिळवताना काँग्रेसची स्थिती अधिक दयनीय केली आहे.

राज्यात भाजपाच्या विजयाची कारणे ओळखणे फारसे अवघड नाही. कट्टर हिंदुत्वाच्या जोडीला महिलांना डोळ्यासमोर ठेवून आखलेल्या कल्याणकारी योजना, बांगलादेशी घुसखोर या मुद्द्यांच्या आधारे संघटनात्मक पातळीवर कमकुवत झालेल्या काँग्रेसला हरवणे त्यांना सहज शक्य झाले. बंगाली लोकांमुळे आसामी संस्कृती, अस्मितेला धोका निर्माण झाल्याचे आसामी जनतेच्या मनावर बिंबवण्यात आणि आसामी विरुद्ध बंगाली या संघर्षाला हिंदू विरुद्ध मुस्लिम असे स्वरूप देण्यात भाजपाला यश मिळाले.

गेल्या १० वर्षांच्या कालावधीत हिमांता बिस्वा सरमा हे कट्टरवादी हिंदुत्वाचा चेहरा झाले आहेत. त्यांच्या काही कृती आणि वक्तव्यांमुळे वाद झाले, पण मतदारांवर त्याचा परिणाम झाल्याचे दिसत नाही. मतदार ध्रुवीकरणाचे लक्ष्य पूर्णपणे गाठण्यात भाजपला यश आले आहे. भाजपवरही भ्रष्टाचाराचे आरोप झाले. दिमा हसाओ या आदिवासीबहुल जिल्ह्यात सिमेंट कारखाना उभारण्यासाठी एका खासगी कंपनीला तीन हजार बिघा जमीन देण्याच्या निर्णयावर गुवाहाटी उच्च न्यायालयानेही आश्चर्य व्यक्त केले होते. खुद्द मुख्यमंत्री हिमांता बिस्वा सरमा यांच्या लोकप्रियतेत घट झाल्याचे दिसत होते. पण काँग्रेसला याचा फायदा करून घेता आला नाही.

### पायाभूत सुविधा

काँग्रेसच्या कार्यकाळात पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप भाजपाने नेहमीच केला आहे. गेल्या १० वर्षांच्या कालावधीत राज्यात अनेक मोठे पूल, उड्डाणपूल, रस्त्यांची कामे पूर्ण झाली. दिब्रुगड आणि धेमाजीला जोडणारा ब्रह्मपुत्रा नदीवरील बोगीबील हा जवळपास पाच किमी लांबीचा पूल आणि नऊ किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचा भूपेन हजारिका सेतू ही ठळक उदाहरणे आहेत.

बोगीबील पुलाच्या कामाला डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात सुरुवात झाली होती. पण काँग्रेस सरकारला त्याचे श्रेय मिळणार नाही याची पुरेपूर खबरदारी उद्घाटना दरम्यान घेण्यात आली. याबरोबरच रेल्वे, धरणे, विद्युत प्रकल्प असे सहज नजरेत भरणारे प्रकल्पही धडाक्यात सुरू आहेत. काही प्रकल्पांना पर्यावरणवाद्यांनी विरोध केला, पण त्याचा उपयोग झाला नाही.

### कल्याणकारी योजना

महिलांना केंद्रस्थानी ठेवून अनेक योजना आखण्यात आल्या. अरुणोदय योजनेअंतर्गत अल्प उत्पन्न गटातील ३८ लाख कुटुंबांना दरमहा १,२५० रुपये मदत; मुख्यमंत्री महिला उद्यमिता अभियान योजनेअंतर्गत लहान उद्योग उभारण्यासाठी ग्रामीण महिलांना मदत; अरुंधती सुवर्ण योजनेच्या माध्यमातून वधूंना सोने खरेदीसाठी आर्थिक मदत; वीणकाम करणाऱ्या महिलांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी स्वनिर्भर नारी योजना; आसाम आरोग्य निधीच्या माध्यमातून दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना वैद्यकीय मदत, यासारख्या योजनांमुळे महिलांमध्ये आपले स्थान मजबूत करण्यास भाजपला मदत झाली.

तरुणांना रोजगारक्षम करण्यासाठी स्वामी विवेकानंद सक्षमीकरण योजना आणि जीवनज्योती स्वनियोजन योजना, १२वीत पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थिनींना स्कूटरवाटप या योजनांचा पक्षाला फायदा झाला. चहामळ्यांतील कामगार, करोना महासाथीत पतीचे निधन झालेल्या महिला, यासारख्या विविध घटकांपर्यंत पोहोचण्यास योजनांची मदत झाली असे म्हणता येईल.

### राखीव मतदारसंघांमध्ये प्राबल्य

आसामच्या लोकसंख्येमध्ये १२.४ टक्के प्रमाण अनुसूचित जमातींचे आहे. या प्रवर्गासाठी १२६ मतदारसंघांपैकी १६ जागा अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत. २००६पर्यंत भाजपला या प्रवर्गात एकही जागा मिळवता आली नव्हती. मात्र, २०१४मध्ये केंद्रात सत्ता मिळाल्यानंतर २०१६मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने मोठे यश मिळवले. त्या वर्षी भाजपने ६० जागा मिळवताना अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेल्या आठ तर २०२१मध्ये नऊ जागांवर विजय मिळवला होता.

### काँग्रेसपुढील समस्या

भाजप सतत निवडणुकीच्या मन:स्थितीत असतो, असे कौतुक किंवा टीका त्यांच्यावर होते. आसाम हे राज्यही त्याला अपवाद नाही. दुसरीकडे, इतर अनेक राज्यांप्रमाणे आसाममध्येही कमकुवत संघटना हे काँग्रेससमोरील सर्वांत मोठे आव्हान ठरले. लोकसभेत खणखणीत कामगिरी बजावणारे गौरव गोगोई यांच्या पराभवातून पक्षाची अवस्था किती बिकट झाली आहे ते समजू शकते.

केंद्रीय तपास यंत्रणांच्या मदतीने भाजपने काँग्रेसच्या अनेक नेत्यांना जेरीस आणले आहे. वैयक्तिक संघर्ष करताना पक्षासाठी काम करण्याची ताकद किंवा इच्छा किंवा दोन्ही गमावून बसलेले नेते हे अन्य राज्यांप्रमाणेच आसाममधीलही सामान्य चित्र आहे. भूपेन कुमार बोरा या माजी काँग्रेस प्रदेशाध्यक्षांसारख्या काही नेत्यांनी सरळ भाजपचा रस्ता धरला आहे. अशा परिस्थितीत काँग्रेसला यापुढे राज्यात अस्तित्वाची लढाई लढावी लागेल असे दिसते.

**निमा पाटील**

# राजीनामा देण्यास ममतांचा नकार



पश्चिम बंगाल निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत आणि तृणमूल काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला, तरीही ममता बॅनर्जी यांनी राजीनामा न देण्याचा निर्णय घेतला आहे. भाजपच्या नेत्यांनी या निर्णयाला 'लोकशाही तत्त्वांचा विश्वासघात' आणि 'असंवैधानिक' असल्याचे म्हटले आहे. विशेष म्हणजे ममता बॅनर्जी स्वतः भवानीपूर मतदारसंघातून भाजपच्या सुवेंदू अधिकारी यांच्याकडून पराभूत झाल्या आहेत. तांत्रिकदृष्ट्या, विधानसभेचा कार्यकाळ ८ मे रोजी संपत आहे, परंतु राजीनामा न देणे हे लोकशाही मूल्यांच्या विरोधात आहे. भारताच्या राजकारणात आता पर्यंत कोणत्याही निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर मुख्यमंत्र्याने राजीनामा देणार नाही असे म्हटले नाही. ममता बॅनर्जी कायद्याचे जाणकार व अनुभवी राजकारणी असून केंद्रीय मंत्री व तीन वेळा पश्चिम बंगाल च्या मुख्यमंत्री राहिलेल्या आहेत. मुख्यमंत्र्यांचा राजीनामा ही केवळ औपचारिकता नसून एक अनिवार्य घटनात्मक प्रक्रिया आहे. विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर मुख्यमंत्री पदावरील व्यक्तीने राजीनामा दिला नाही तर राज्यपाल प्रशासकीय अधिकाऱ्यांना मुख्यमंत्री कार्यालय आणि सचिवालयात जुन्या मुख्यमंत्र्यांचे आदेश मानण्यापासून रोखू शकतात. कायद्याच्या नजरेत, बहुमत गमावलेली व्यक्ती शासन करण्याचा वैध अधिकार गमावून बसलेली असते. राज्यपालांचे अधिकार हे सुनिश्चित करतात की, लोकशाहीची भावना जपली जावी आणि जनादेशाचा अपमान होऊ नये.

दुसरीकडे, उद्धव ठाकरे गट (उबाठा) चे खासदार संजय राऊत यांनी ममता बॅनर्जी यांच्या राजीनामा न देण्याच्या निर्णयाला पाठिंबा दिला आहे, ज्यावर भाजप नेत्यांनी टीका केली आहे. विरोधी पक्षनेते आणि भाजप नेते, जसे की शुभेंदू अधिकारी, या कृतीला 'दीदींच्या शोकांतिकेचा आणखी एक भाग' म्हणत आहेत. थोडक्यात, हा मुद्दा केवळ राजकीय नसून संवैधानिक प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरत आहे, आणि यावर सध्या मोठ्या प्रमाणात राजकारण तापलेले दिसत आहे.

भारतीय संविधानानुसार, मुख्यमंत्र्यांचे पद राज्यपालांच्या 'मर्जी' असेपर्यंत राहते. अनुच्छेद १६४ स्पष्ट करते की, राज्यपालच मुख्यमंत्र्यांची नियुक्ती करतात. मुख्यमंत्री निवडणूक हरले असतील किंवा त्यांच्या पक्षाने सभागृहात बहुमत गमावले असेल आणि तरीही ते राजीनामा देण्यास टाळाटाळ करत असतील, तर राज्यपालांना त्यांना पदावरून बरखास्त करण्याचा पूर्ण अधिकार आहे. राज्यपाल एक अधिकृत आदेश काढून विद्यमान सरकार तत्काळ प्रभावाने विसर्जित करू शकतात.

मुख्यमंत्री राजीनामा देत नसतील, तर राज्यपाल विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावू शकतात. या अधिवेशनात बहुमत सिद्ध करण्यासाठी अविश्वास प्रस्ताव आणला जातो. निवडणूक निकालांनी हे स्पष्ट केले आहे की, भाजपकडे २०७ जागा आहेत आणि टीएमसीकडे फक्त ८० त्यामुळे ममता बॅनर्जी यांना सभागृहात बहुमत सिद्ध करणे अशक्य होईल. अविश्वास प्रस्ताव मंजूर होताच मुख्यमंत्र्यांना कोणत्याही परिस्थितीत आपली खुर्ची सोडावी लागते. मुख्यमंत्री पराभूत होऊनही पदावर कायम राहिले आणि राजीनामा देण्यास नकार दिला. अशा बिकट परिस्थितीत राज्यपाल केंद्र सरकारला आपला अहवाल पाठवून अनुच्छेद ३५६ अंतर्गत 'राष्ट्रपती राजवट' लागू करण्याची शिफारस करू शकतात. राष्ट्रपती राजवट लागू झाली की, राज्याची संपूर्ण सूत्रे थेट केंद्र आणि राज्यपालांच्या हाती येतात आणि मुख्यमंत्र्यांचे अधिकार संपुष्टात येतात.

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल,** वर्धा
मो.९५६१५९४३०६

# ईडन गार्डनवर भाजपची डबल सेंच्युरी

**ममतांच्या दिड दशकांच्या राजवटीचा मोदी, शहांच्या रणनिती पुढे टिकाव लागला नाही आणि भाजपने ईडन गार्डन वर दणदणीत डबल सेंच्युरी म्हणजेच दोनशेच्या वर जागा जिंकून प.बंगालवर भगवा फडकवला आहे.**

देशभरात नुकत्याच पाच विधानसभा निवडणुका पार पडल्या असून भाजपने ही मालिका ३/२ अशी आपल्या नावे केली आहे. यापैकी प्रचंड चुरशीच्या आणि चित्तथरारक लढतीत भाजपने बंगालची वाघीण अर्थातच पुरोगाम्यांची लाडकी दीदी असलेल्या ममतांचा सपशेल पराभव केला आहे.

प.बंगाल म्हटले की त्यावर पहिले कम्युनिस्ट आणि नंतर ममतांची पोलादी पकड होती.परंतु या दोघांचेही राजकीय तन पोलादी आणि मन अपराधी होते. जणु काही आपल्याला चरायला मोकळे कुरण मिळाल्यासारखे या दोघांनीही राज्याची वाट लावली होती. मग ते बेरोजगारी असो उद्योगधंदे असो की सामाजिक वातावरण असो. मात्र धर्मांधांना कुरवाळण्यात दोघेही एक से बढकर एक होते. कोण धर्मांधांचे जास्त लांगुलचालन करतो यात स्पर्धा असायची. या दोन्ही काळ्याकुट्ट राजवटीत सर्वात जास्त हाल झाले, दमन झाले ते हिंदुंचे.

मां, माटी, मानुषचा नारा देत कम्युनिस्टांकडून सत्ता हस्तगत केल्यावर ममतांनी तिची आभाळागत माया धर्मांध, बांगलादेशी घुसखोर आणि रोहींग्यावर कायम ठेवली.या राष्ट्रद्वेषी त्रिकुटांसाठी ममतांचे राज्य जणुकाही त्यांचे माहेरघर होते. यांच्या एकगठ्ठा मतांमुळे ममतांनी बंगालवर दिड दशक राज्य केले. मात्र या काळात हिंदू, त्यांचे सण, उत्सव आले की त्यावर ममतांची वक्रदृष्टी व्हायची.आपल्या देशात, आपल्या राज्यात हिंदू परांगदा व्हायची वेळ आली होती. धर्मांधांना हाताशी धरून ममतांनी हिंदूंचे मनसोक्त दमन केले होते.

दिवसेंदिवस ममतांची राज्यावर पकड जशी मजबूत होत गेली तशी तिने केंद्रावर वरचढ होण्याचा प्रयत्न केला,केंद्राला डोळे दाखवू लागली होती.'हम करे सो कायदा' या न्यायाने तिने बंगालची पिळवणूक केली होती. ममतांचा शासकीय अत्याचार पाहून सगळेच हतबल झाले होते पण हे चक्रव्यूह तोडणे काळाची गरज होती. एकतर सरळसरळ राष्ट्रपती राजवट लागू करणे किंवा ममतांचा पराभव करणे हे दोन पर्याय होते. राष्ट्रपती राजवट लावली असती तर झाडून पुसून यच्चयावत पुरोगामी, विरोधक देशभर उघडेनागडे नाचले असते. मोदी, शहांनी हिटलरशाही आणली म्हणून दिवसरात्र नंगानाच केला असता.

ममता म्हटले की, 'धरले तर चावते, सोडले तर पळते' अशी अवस्था झाली होती. शेवटी भाजपने सोयऱ्याच्या जोड्याने विंचू मारायचे ठरवले आणि त्यात ते १००३ यशस्वी झाले. परिकथेतल्या राक्षसाप्रमाणे ममतांचे राजकीय प्राण दडले होते अवैध मतदार, धर्मांध, बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्यात. यासोबतच शासन, प्रशासन आणि राज्यभर विणलेले तिचे तृणमूल कॉंग्रेसचे जाळे यामुळे ममतांना तिच्या बालेकिल्ल्यात मात देणे अशक्य कोटीतली बाब होती. मात्र केंद्राने, निवडणूक आयोगाने ममतांची ही खेळी ओळखून एसआयआर नावाचे ब्रह्मास्त्र बाहेर काढले, जे ममता नावाच्या भस्मासूरावर तंतोतंत लागू पडले.



एसआयआर लागू होताच ममतांचा तिळपापड झाला आणि इथेच तिच्या बालेकिल्याचे बुरूज ढासळायला सुरुवात झाली. लाखो अवैध मतदार वगळल्याने मतदार याद्या स्वच्छ झाल्या. मात्र तरीदेखील मिशन बंगाल सर करायला ग्राऊंड लेव्हलवर बरेच काम बाकी होते. शासकीय यंत्रणेव्यतिरिक्त ममतांची तृणमूल फौज निवडणूक प्रक्रियेत हेराफेरी करण्यात पटाईत होती. शिवाय ममता सैनिकांची तिथे इतकी दहशत होती की निर्भयपणे मतदान होणे कठीण होते. जनतेला ममतांच्या क्रौर्याचा अंदाज असल्याने जनतेच्या मनात सुरक्षेची भावना निर्माण होणे गरजेचे होते. निवडणूका शांततेत, निकोप वातावरणात आणि निर्भयपणे पार पाडणे याची जबाबदारी केंद्र आणि निवडणूक आयोगाची होती.

ममतांच्या तृणमुलचे तिलिस्म भेदण्यासाठी अखेर राज्यात केंद्रीय राखीव दलाच्या अनेक तुकड्या तैनात करण्यात आल्या. 'लातों के भुत बातोंसे नहीं मानते' हे सुरक्षा यंत्रणेला वेगळे सांगायची गरज नव्हती. ममतांच्या गुंडांचा पद्धतशीरपणे पाहुणचार करण्यात आला. स्थानिक भ्रष्ट यंत्रणेला या निवडणुकी पासून दोन हात दूर ठेवण्यात आले. जागोजागी सुरक्षा बल तैनात असल्याने जनतेने निर्भयपणे मतदान केले.'न भुतो न भविष्यती' छप्परफाड मतदान झाले. दिड दशकापासून दडपलेल्या जनभावनेचा ज्वालामुखी फुटला आणि प.बंगाल मध्ये कमळ फुलले.

प.बंगाल मध्ये ममतांचे क्रूर संस्थान जनतेने खालसा करताच देशभरातील 'हॅपी इंडेक्स' मध्ये अचानक वाढ झाली. प.बंगाल जिंकणे हे केवळ भाजपसाठीच नव्हे तर देशाच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत गरजेचे होते. कारण ममतांनी प.बंगालला बांगलादेशी घुसखोर, रोहिंग्यासाठी गेटवे ऑफ इंडिया करून ठेवले होते. पुर्वोत्तरातील सात राज्यात समन्वय आणि देशाच्या सुरक्षेसाठी ममतांचा पराभव व्हावा ही देशभरातील राष्ट्रवादी जनतेची इच्छा होती. त्याला प.बंगालच्या जनतेने उदंड प्रतिसाद दिला.

प.बंगाल सर करायला भलेही भाजपला अनेक वर्षे लागलीत पण शेवटी तिथले कार्यकर्ते, नेते आणि जनतेचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमी आहे. सोबतच मा.पंतप्रधान आणि अमित शहांनी जी रणनिती आखली, त्याला मुर्तरूप दिले.सोबतच भाजपचे स्टार प्रचारक योगी आदित्यनाथ, आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा शर्मा यांनी जो घणाघाती प्रचार केला, त्याला तोड नाही. प.बंगाल पाठोपाठ आसाम मध्येही कमळ फुलले असून मुख्यमंत्री हेमंत शर्मा यांची तिथे जादू अजूनही कायम आहे. सोबतच पुडुचेरी विधानसभेतही भाजपला बहुमत मिळाले आहे. एकंदरीत काय तर केरळ, तामिळनाडू वगळता, प.बंगाल आसाम आणि पुडुचेरी येथील जनतेने भाजपला आपला कौल दिला आहे. विरोधकांना पुरून उरत भाजप पुन्हा एकदा राजकारणात धुरंधर ठरला आहे.

**डॉ.अनिल पावशेकर**
मो.९८२२९३९२८७

# वेचक

## जल व्यवस्थापन कृती पंधरवडा यवतमाळात उत्साहात साजरा

यवतमाळ - जिल्ह्यात जलसंपदा विभागाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जल व्यवस्थापन कृती पंधरवडा 15 ते 30 एप्रिल दरम्यान मोठ्या उत्साहात राबविला. जलरथाद्वारे गावागावांत जनजागृती करून पाणी संवर्धनाचा संदेश पोहोचविण्यात आला. समारोप सोहळा 30 एप्रिल रोजी बळीराजा भवन , जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ येथे झाला. कार्यालयाचे प्रमुख म्हणून माननीय श्री योगेश सोनवणे अधीक्षक अभियंता यवतमाळ सिंचन मंडळ यवतमाळ व माननीय श्री. प्रकाश पाटील, अधीक्षक अभियंता यवतमाळ पाटबंधारे प्रकल्प मंडळ यवतमाळ तसेच या कार्यक्रमाचे आयोजक श्री.विनोद बागुल, कार्यकारी अभियंता अरुणावती पाटबंधारे विभाग,दिग्रस यांनी सर्वप्रथम राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून विधिवत पूजा अर्चना केली त्यानंतर दीप ज्योत लावून सर्वांनी कार्यक्रमाची सुरुवात केली पाण्याने भरलेला पितळी घड्याचे म्हणजेच या भांड्यामध्ये भरलेल्या पाण्यातील भांड्याना नदीवरून नाव देण्यात आले होते जसे की अडाण नदी अरुणावती नदी पुस नदी वाघाई नदी व बेंबळा नदी या सर्वांचे मान्यवरांनी पूजन केले त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली सर्वप्रथम या सर्व प्रकल्पावर आधारित डॉक्युमेंटरी फिल्म दाखविण्यात आली त्यानंतर गजानन वानखेडे यांनी प्रकल्पावर आधारित सुंदर पोवाडा सादर केला व उपस्थितांची मने जिंकली. आलेल्या सर्व मान्यवरांचे छोटे आंब्याचे वृक्ष देऊन स्वागत करण्यात आले. जल आहे तर कल आहे यावर पाणीसाठा सांभाळून वापरावा तसेच पाण्याचे नियोजन कसे करावे यावर सर्वांनी शपथ देण्यात आली. यावेळी अधीक्षक अभियंता योगेश सोनवणे यांनी सर्व कर्मचाऱ्यांना संबोधन करून सांगितले की सिंचन ना बद्दल माहिती दिली तसेच अधीक्षक अभियंता प्रकाश पाटील यांनी सुद्धा सर्वांना माहिती दिली सर्व कर्मचारी अधिकारी उपस्थित असताना त्यांना सविस्तर माहिती देण्यात आली तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचारी अधिकारी यांना प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रगीताने झाला आहे.

## महावितरण अमरावती परिमंडळाची उल्लेखनीय कामगिरी


यवतमाळ : महावितरणच्या अमरावती परिमंडळाने मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक वर्ष २०२४- २५ च्या तुलनेत वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. वीज जोडण्या देणे, वितरण हानी कमी करणे आणि शंभर टक्के वीजबिल वसुली या महत्त्वाच्या निकषांवर उत्कृष्ट कामगिरी केली आहे. एवढेच नाही तर मार्च २०२५ च्या थकबाकीपेक्षा मार्च २०२६ ची थकबाकी कमी करणाऱ्या राज्यातील तीन परिमंडळापैकी अमरावती परिमंडळ एक असून ही अभिमानाची बाब आहे. ग्राहकाभिमुख उपक्रमांतर्गत अमरावती परिमंडळात कृतिमानकांनुसार ४१ हजार ६९० नवीन वीज जोडण्या देण्यात आल्या. ही संख्या गेल्या वर्षाच्या तुलनेत १४ हजार ९४६ ने अधिक आहे. पीएम सूर्यघर मोफत योजनेअंतर्गत ३१ हजार ३७५ ग्राहकांच्या घरांच्या छतांवर सौर यंत्रणा बसविण्यात आली असून, मागील वर्षी ही संख्या १२ हजार ५२७ होती. तांत्रिक सुधारणा राबविताना तांत्रिक व वाणिज्यिक हानीत ८.५४ टक्क्यांनी घट झाली असून ती सध्या २१.२६ टक्क्यांवर आली आहे. वितरण हानीतही ०.७० टक्क्यांची घट झाली आहे. वीज चोरी रोखण्यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेत ६,४२२ प्रकरणे उघडकीस आणण्यात आली असून त्यातून २० कोटी ७५ लाख रूपयाचे दंड लावण्यात आले आहे. परिमंडळाने गेल्या वर्षभरात १०० टक्के वीजबिल वसुली साध्य करत मार्च २०२५ मधील थकीत बिलांमधून १९ लाख रुपयांची घट केली. बिलिंग कार्यक्षमतेत ३ टक्क्यांची वाढ झाली असून महसूल कार्यक्षमता १०० टक्क्यांवर पोहोचली आहे.

## कला व वाणिज्य महाविद्यालयात धाडसी चोरी

महागाव : येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी करीत २९ हजार ४५० रुपयांचे संगणक व इतर साहित्य लंपास केले. ही घटना ३ मे रोजी दुपारच्या सुमारास उघडकीस आली आहे. निवृत्ती नामदेव पंतगे (३९) असे फिर्यादीचे नाव आहे. पंतगे हे ग्रंथालय परिचर असून मागील १४ वर्षांपासून या महाविद्यालयात कार्यरत आहेत. सध्या परीक्षा सुरू असल्याने महाविद्यालय बंद असून केवळ शालेय कार्यालय सुरू आहे. दरम्यान, १ मे रोजी झेंडावंदनाचा कार्यक्रम झाल्यानंतर सकाळी ९:३० वाजता पंतगे कार्यालय बंद करून घरी गेले होते. त्यानंतर कॉलेजच्या कामासाठी ते अमरावतीला गेले होते. ३ मे रोजी दुपारी ३ वाजता ते महाविद्यालयात परतले असता, त्यांना कार्यालयाचा कडीकोंडा तुटलेल्या अवस्थेत दिसला. आत जाऊन पाहणी केली असता कार्यालयातील साहित्य अस्ताव्यस्त पडले होते. चोरट्यांनी कार्यालयातील एक कॉम्प्युटर अंदाजे १६ हजार ८०० रुपये, कॅनन प्रिंटर अंदाजे ६ हजार ५०० रुपये, डेल कंपनीचा मॉनिटर ४ हजार रुपये, युपीएस २ हजार १५० रुपये, असा एकूण २९ हजार ४५० रुपयांच्या मुद्देमाल लंपास केला. घटनेची माहिती मिळताच शाळा संस्थापक संभाजी तुकाराम नरवाडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर फिर्यादी निवृत्ती पंतगे यांनी याप्रकरणी महागाव पोलिसांत तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# नागपूर–तुळजापूर महामार्गावर एसटी बसचा अपघात

## १६ जखमी, चालक गंभीर



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - नागपूर–तुळजापूर महामार्गावर सातारा फाट्याजवळ बुधवारी सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास एसटी बसचा भीषण अपघात घडला. यवतमाळहून आर्णीकडे जात असलेली नागपूर–दिग्रस मार्गावरील बस अचानक समोर आलेल्या ट्रकवर आदळल्याने हा अपघात झाला. धडक दिल्यानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून पसार झाला होता.

अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पीएसआय रवींद्र जाधव यांनी स्वतःच्या वाहनातून जखमींना तातडीने आर्णी येथील शासकीय रुग्णालयात हलवून उपचारासाठी दाखल केले. अपघाताची तीव्रता इतकी होती की बसचा चालक स्टेरिंगमध्ये अडकून गंभीर जखमी झाला. स्थानिक नागरिकांनी तत्परतेने मदतकार्य करत सुमारे अर्ध्या तासाच्या प्रयत्नानंतर चालकाची सुटका केली. या दुर्घटनेत चालक व वाहक यांच्या पायांना गंभीर दुखापत झाली असून १६ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. दरम्यान, पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पंचनामा करून दोन्ही वाहने ताब्यात घेतली. फरार झालेल्या ट्रक चालकाचा शोध घेऊन त्याला अटक करण्यात आली असून ट्रकही जप्त करण्यात आला आहे. या अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. मात्र पोलिसांनी तत्परतेने वाहतूक सुरळीत केली असून पुढील तपास सुरू आहे.

# हरदडा–पुसद रस्ता दुरुस्तीचा प्रश्न ऐरणीवर; १२ मे रोजी रास्ता रोकोचा इशारा

जनमाध्यम प्रतिनिधी

उमरखेड : हरदडा ते पुसद दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे नागरिकांचा त्रास वाढला असून रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. हायब्रिड ॲन्युइटी (हॅम) योजनेअंतर्गत सुरू असलेल्या या कामात संपूर्ण रस्ता खोदून ठेवण्यात आल्याने मोठमोठे खड्डे निर्माण झाले आहेत. परिणामी, हा मार्ग वाहनधारकांसाठी धोकादायक ठरत आहे.

दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक असलेल्या या मार्गावर धुळीचे प्रचंड प्रमाण वाढले असून अपघातांचा धोका तीव्र झाला आहे. विशेषतः अवजड वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे रस्त्याची परिस्थिती आणखी बिकट होत आहे. वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. दरम्यान, या रस्त्यावर असलेल्या अमृतेश्वर महादेव मंदिरात दररोज शेकडो भाविक येत असतात. मात्र रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे वयोवृद्ध व भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नागरिकांनी संबंधित विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने संताप वाढत आहे. या पार्श्वभूमीवर परिसरातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी एकत्र येत उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन रस्त्याचे काम तातडीने सुरू करून पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याची मागणी केली आहे.

अन्यथा १२ मे रोजी हरदडा फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांना दिलेल्या निवेदनावर काँग्रेसचे बाळासाहेब चंद्रे पाटील, शिंदे शिवसेनेचे दत्तदिगंबर वानखेडे, मनसेचे तालुकाध्यक्ष सादिक शेख, रामराव गायकवाड माजी जिल्हा परिषद सदस्य तंटामुक्ती अध्यक्ष, आझाद समाज पार्टीचे जॉन्टी, संजय सल्लेवाड, विणकरे, (उबाठाचे) कांता वासमवार, संभा गोरटकर, प्रशांत जोशी, शेख बशीर, अमोल तुपेकर, संतोष मंतेवाड, समृद्धी गायकवाड, अमोल तुपेकर, बंटी वाळके उपस्थित होते. या आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे प्रशासनावर दबाव वाढला असून आता संबंधित विभाग कोणती भूमिका घेतो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# रेती तस्करीचे दोन टिप्पर पकडले

जनमाध्यम प्रतिनिधी

राळेगाव : अवैधरीत्या रेतीची तस्करी करणारे दोन टिप्पर पोलिसांनी पकडले. यामध्ये चौघांवर गुन्हे दाखल करून ६ ब्रास रेतीसह टिप्पर असा एकूण ८ लाख ४४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई कळम राळेगाव चौफुलीवर करण्यात आली.

बादल कडू राठोड (४०), प्रज्योत आतसिंग चव्हाण (३६), सतीश महादेव सावसाकडे (४७) तिघेही रा. घाटंजी आणि उदय रमेश ब्राह्मणे (४४) रा. यवतमाळ अशी आरोपींची नावे आहेत. संबंधित आरोपीं हे आपल्या एमएच ४० बी एल ९३०६ आणि एमएच ३१ सीबी ९०८६ क्रमांकाच्या टिप्पर मध्ये रेतीची चोरटी वाहतूक करताना मिळून आले. पोलिसांच्या चौकशीत त्यांच्याजवळ रेती वाहतुकीचा कुठलाही वैध परवाना नव्हता. त्यामुळे पंचासमक्ष रेतीसह टिप्पर असा एकूण ८ लाख ४४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी मिलिंद रतिरामत मडावी (४७) यांनी राळेगाव पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी रीतसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी संबंधित आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# “१५ दिवसांत निर्णय घ्या अन्यथा पांढरकवडा ठप्प !”

## युवा टायगर फोर्सचा अल्टिमेटम ; २१ मे पासून रणसंग्रामाचा इशारा



### २१ मे पासून टप्प्याटप्प्याने आंदोलन

युवा टायगर फोर्सने आंदोलनाची रूपरेषा जाहीर केली असून त्यामध्ये प्रशासन कार्यालयांसमोर धरणे, शहरातून मोर्चा व रास्ता रोको, जनआक्रोश आंदोलन गरज पडल्यास उपोषण यासोबतच, प्रशासनाने दुर्लक्ष कायम ठेवल्यास न्यायालयीन मार्गाचा अवलंब करण्याचाही इशारा देण्यात आला आहे. संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, “१५ दिवसांत निर्णय न झाल्यास आंदोलन तीव्र केले जाईल. त्यानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील.”

### सरकारकडे मागण्या

तात्काळ आढावा बैठक घ्यावी, सर्व विभागांना स्पष्ट आदेश द्यावेत, निष्क्रिय अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, पांढरकवड्यातील वाढत्या असंतोषामुळे आता याआंदोलनाकडे जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागले आहे.


जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा - पांढरकवडा शहर व केळापूर तालुक्यातील प्रलंबित समस्यांकडे प्रशासनाने सातत्याने केलेल्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला असून, युवा टायगर फोर्स, पांढरकवड्याने प्रशासनाला थेट १५ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे.

“निर्धारित कालावधीत ठोस निर्णय न झाल्यास २१ मेपासून व्यापक आंदोलन छेडले जाईल,” असा इशारा देण्यात आला आहे. नुकत्याच नियुक्त उपविभागीय अधिकाऱ्यांना वेळ मागूनही भेट न मिळाल्याने कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली. “सामान्य नागरिक तासन्तास प्रतीक्षा करतो; मात्र अधिकारी ‘बैठकी’च्या कारणावरून टाळाटाळ करतात. ही भूमिका आता सहन केली जाणार नाही,” असे संघटनेतर्फे स्पष्ट करण्यात आले. पांढरकवड्यातील मूलभूत प्रश्न अधिक तीव्र होत चालले असून, प्रशासनावर बेफिकीरीचे आरोप करण्यात येत आहेत. उपजिल्हा रुग्णालयात ट्रॉमा केअर व डायलिसिस सेवा प्रभावी नाही. रस्त्यांची दुरवस्था; अपघातांचे प्रमाण, वारंवार लोडशेडिंगमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. वाहतूक कोंडीची समस्या तीव्र असून स्वच्छता व स्ट्रीट लाईट व्यवस्थेचा बोजवारा झाला आहे. अनेक वेळा निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याची खंत व्यक्त करण्यात आली. “उदघाटन, भूमिपूजन व फोटोपुरतेच मर्यादित न राहता लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष समस्यांवर लक्ष द्यावे,” अशी मागणी संघटनेने केली आहे.

# महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने विशेष चित्ररथाचे यवतमाळमध्ये आगमन

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ : चित्ररथात महात्मा फुले यांचे साहित्य, भिडे वाड्याची प्रतिकृती, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांचा समावेश दिनांक 06/06/2026 ते 07/05/36 दोन दिवस चित्ररथाचे यवतमाळमध्ये ठिकठिकाणी स्वागत महाराष्ट्रभर फिरणाऱ्या या चित्ररथाचे यवतमाळ जिल्हाच्या पुसद या शहरापासून चित्ररथाचे आगमन होत आहे तर दारव्हा या ठिकाणी मुक्काम परत दुसऱ्या दिवशी यवतमाळ शहरात आगमन होऊन ठीक ठिकाणी अतिशय जल्लोषात या मुलींच्या पहिल्या शाळेचे स्वागत अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद जिल्हा यवतमाळ च्या वतीने स्वागत करण्यात येत आहे.

यवतमाळतल्या अनेक तालुक्यांमध्ये व दलित वस्तींमध्ये आगमन व दर्शनासाठी ठेवण्यात येत आहे तरी सर्व महिला वर्गाला बंधनातून मुक्त करून यांचा शिक्षणाचा मार्ग मोकळा करणाऱ्या भिडे वाड्याचे दर्शन घेण्यासाठी यवतमाळकर स्वागतासाठी सज्ज आहेत यासाठी समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र घाटे, विनोद भाऊ इंगळे, महिला जिल्हाध्यक्ष सुनयना संजय येवतकर (अजात) शहर अध्यक्ष मनोज भबुतकर(यवतमाळ) कार्यक्रमासाठी विशेष मेहनत घेत आहे सर्व स्तरातून आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरलेल्या हा समतेचा रथ आहे सर्व फुले शाहू आंबेडकर विचाराचे लोक सर्व यवतमाळकर हा रथ बघण्यास उत्सुक आहेत. क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती महोत्सवाच्या निमित्ताने ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ या वर्षात केंद्र व राज्य सरकारच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यानिमित्ताने अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदचे संस्थापक अध्यक्ष मंत्री छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, माजी खासदार समीरभाऊ भुजबळ व आमदार पंकजभाऊ भुजबळ यांच्या संकल्पनेतून महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित चित्ररथाची निर्मिती करण्यात आली आहे. महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने हा चित्ररथ महाराष्ट्रभर फिरविण्यात येत आहे. या चित्ररथामध्ये क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले, ज्ञानज्योती क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे अर्धाकृती पुतळे तसेच महात्मा फुले यांचा पूर्णाकृती पुतळा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. यासोबतच समतेचे महामेरू छत्रपती शाहू महाराज आणि घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेही पुतळे चित्ररथात साकारण्यात आले आहेत. विशेष म्हणजे महात्मा फुले लिखित पुस्तक व पेन या ज्ञानाच्या प्रतीकांची प्रभावी मांडणी करून समाजप्रबोधनाचा संदेश दिला जात आहे.

# शेतक-यांची लूट थांबवा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडणार

## वणी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

जनमाध्यम प्रतिनिधी



वणी - खरीप हंगाम तोंडावर असताना शेतकरी मशागत आणि खत-बियाणे खरेदीच्या तयारीत गुंतला आहे. मात्र, याचाच गैरफायदा घेत वणी उपविभागातील अनेक कृषी केंद्र चालकांनी खतांसोबत इतर अनावश्यक वस्तूंची विक्री (लिंकिंग) करून शेतकऱ्यांची आर्थिक लूट सुरू केली आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे वणी तालुकाध्यक्ष फाल्गुन गोहोकार यांनी उपविभागीय अधिकारी (SDO) यांना निवेदन देऊन कृषी केंद्र चालकांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांकडून मिळालेल्या तक्रारीनुसार, कृषी केंद्र चालक "आमच्याकडून बी-बियाणे खरेदी केले तरच खत दिले जाईल" अशी अट घालत आहेत. मुख्य खतांसोबत (उदा. DAP, युरिया) गरज नसलेले बोगस टॉनिक, कीटकनाशके किंवा दुय्यम दर्जाची खते घेण्याची सक्ती केली जात आहे. अनेक ठिकाणी खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करून जादा दराने विक्री करण्याचे नियोजन सुरू असल्याचे निवेदनात म्हटले आहे. वणी उपविभागातील सर्व कृषी केंद्रांची तातडीने तपासणी करण्यासाठी भरारी पथके नेमण्यात यावीत. जे दुकानदार 'लिंकिंग'ची सक्ती करत आहेत, त्यांचे परवाने तात्काळ रद्द करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावे, प्रत्येक कृषी केंद्राबाहेर उपलब्ध खतसाठा आणि शासकीय किंमत (MRP) यांचा फलक लावणे अनिवार्य करावे. येत्या ८ दिवसांच्या आत यावर ठोस कार्यवाही करून शेतकऱ्यांना दिलासा न दिल्यास, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने उपविभागीय अधिकारी कार्यालय व संबंधित कृषी केंद्रांवर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा फाल्गुन गोहोकार यांनी दिला आहे.

या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीला प्रशासन जबाबदार राहील, असेही त्यांनी ठणकावून सांगितले आहे. निवेदन देतांना शेतकरी सेना जिल्हा अध्यक्ष रमेश पेचे, गोविंदराव थेरे, विलन बोदाडकर, विठ्ठल हेपट, रवि आगसकांडे, लक्ष्मण उपरे, दिनेश डोंगे, मारोती पडवे, मंगेश झाडे, खुशाल पानघाटे, गौरव काकडे, कुणाल पायघन, राहुल बोधाने आणि शेतकरी उपस्थित होते.

# दिवसाच्या वीजवापरात ७० लाख ग्राहकांना २२३५ कोटी रुपयांचा लाभ

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - राज्यातील वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजवापरासाठी टीओडी (टाइम ऑफ डे) सवलत जुलै २०२५ मध्ये लागू केल्यापासून आतापर्यंत ७० लाख ग्राहकांना एकूण २२३५ कोटी रुपयांचा लाभ झाला असून त्यामध्ये १५,९०७ उच्चदाब औद्योगिक ग्राहक एकूण १५३४ कोटी रुपयांच्या लाभासह प्रथम स्थानावर आहेत, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली.

विजेचा वापर कोणत्या वेळेत झाला त्याच्या आधारे वीजदरात सवलत दिली जाते त्याला टीओडी सवलत म्हणतात. राज्यात जुलै २०२५ पासून १० किलोवॅटपेक्षा जास्त भार असलेल्या औद्योगिक व वाणिज्यिक वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीज वापरासाठी सवलत देण्यात आली. या ग्राहकांना एप्रिल ते सप्टेंबर या महिन्यांसाठी १५ टक्के तर ऑक्टोबर ते मार्च या महिन्यांसाठी २५ टक्के इतकी मोठी सवलत देण्यात येत आहे. सर्व घरगुती ग्राहकांनाही प्रथमच टीओडी सवलतीचा लाभ देण्यास सुरुवात झाली असून चालू आर्थिक वर्षात सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजवापरासाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत देण्यात येते. स्मार्ट मीटरमध्ये कोणत्या वेळी किती वीजवापर झाला हे मोजण्याची सुविधा असल्याने स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती ग्राहकांना या सुविधेचा लाभ होत आहे. औद्योगिक ग्राहकांमध्ये उच्च दाब औद्योगिक ग्राहक, उच्चदाब हंगामी औद्योगिक ग्राहक, लघुदाब औद्योगिक ग्राहक आणि यंत्रमाग असा एकत्रित विचार केला तर ४३,९११ औद्योगिक ग्राहकांना एकूण १,७७४ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. राज्यातील उच्चदाब व लघुदाब अशा ११,०१७ वाणिज्यिक ग्राहकांना एकूण २३९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. घरगुती ग्राहकांना टीओडीचा लाभ मिळण्यास सुरुवात झाल्यापासून त्यांना १,०९६ दशलक्ष युनिट इतक्या विजेसाठी ८९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. या कालावधीतील लाभधारक घरगुती ग्राहकांची संख्या ६९,३५,३८८ इतकी होती. राज्यात घरोघरी स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेने वेग घेतला आहे. त्यासोबत टीओडी लाभ मिळणाऱ्या घरगुती वीज ग्राहकांची संख्याही वाढत आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजदरातील सवलतीचा लाभ सार्वजनिक पाणीपुरवठा आणि अन्य सार्वजनिक सेवांसाठीही झाला आहे.

# हक्क, सुरक्षा आणि सन्मानासाठी संघर्ष तीव्र करण्याचा निर्धार !

## यवतमाळात पहिली ‘कामगार हक्क परिषद’ संपन्न

जनमाध्यम प्रतिनिधी




यवतमाळ - इक्वेरा इन्स्टिट्यूट फॉर इन्क्लुझिव्ह अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट फाउंडेशन (EQUERA) यांच्या वतीने आणि पीपल्स ॲक्शन फॉर रुरल अवेकनिंग (PARA) यांच्या सहकार्याने यवतमाळ येथे “कामगार हक्क परिषद” उत्साहात संपन्न झाली. अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांसह इतर कामगारांच्या हक्क,सामाजिक सुरक्षा,आरोग्य,सुरक्षितता आणि सन्मानजनक उपजीविका संधी याबाबत व्यापक जनजागृती करणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश होता. या परिषदेत कामगारांच्या न्याय हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच कामगारांच्या प्रश्नांकडे शासनाने दुर्लक्ष केल्यास व्यापक आंदोलन उभारण्याची तयारीही यावेळी स्पष्टपणे दर्शविण्यात आली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मंगला मून (सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,यवतमाळ),राहुल काळे (सहाय्यक आयुक्त,कामगार विभाग,अमरावती),विक्की प्रकाश बढेल (महाराष्ट्र सचिव,अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस),ॲड. इमरान देशमुख (यवतमाळ) उपस्थित होते. तसेच यवतमाळ डॉ.निरज वाघमारे, संचालक इक्वेरा फाउंडेशन आणि प्राची साळवे,संचालिका इक्वेरा फाउंडेशन,राज्य समन्वयक (महाराष्ट्र),PARA यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करून करण्यात आली.त्यानंतर २५ मार्च २०२६ रोजी कामावर असताना ट्रॅक्टर-ट्रॉली अपघातात मृत्यू झालेल्या सफाई कर्मचारी आदरणीय किशोर शेंडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्राची साळवे यांनी प्रास्ताविकात इक्वेरा संस्थेचे कार्य स्पष्ट करताना सांगितले की,संस्था वंचित घटक, असंघटित कामगार,महिला आणि सफाई कर्मचाऱ्यांच्या हक्क, सामाजिक सुरक्षा व सन्मानजनक उपजीविका संधींसाठी सातत्याने कार्यरत आहे. या परिषदेत “सफाई कामगारांचे हक्क” या माहितीपर पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.ही पुस्तिका प्राची साळवे यांनी लेखनबद्ध केली असून संकल्पना व मार्गदर्शन डॉ.निरज वाघमारे यांनी केले आहे. सफाई कर्मचाऱ्यांना घटनात्मक हक्क,कायदेशीर संरक्षण,सामाजिक सुरक्षा योजना,किमान वेतन,आरोग्य व सुरक्षितता याविषयी मार्गदर्शन करणारी ही पुस्तिका अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. परिषदेचे प्रास्ताविक करताना डॉ.निरज वाघमारे यांनी सफाई कामगारांना भेडसावणाऱ्या समस्या मांडत सुरक्षा साधनांचा अभाव, किमान वेतन, साप्ताहिक सुट्टी व सुरक्षित कामाच्या वातावरणाचा प्रश्न अधोरेखित केला.कामगार, सामाजिक संस्था आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे संघर्ष केल्याशिवाय न्याय मिळणार नाही, असे ठामपणे त्यांनी नमूद केले. मंगला मून यांनी सफाई कर्मचाऱ्यांचे समाजातील महत्त्व अधोरेखित करत विविध शासकीय योजना, शैक्षणिक सुविधा व सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती दिली. राहुल काळे यांनी ई-श्रम कार्ड,कामगार नोंदणी व विविध योजनांविषयी मार्गदर्शन केले. विक्की प्रकाश बढेल यांनी ठेकेदारी पद्धतीवर टीका करत सफाई सेवा कायमस्वरूपी करण्याची गरज व्यक्त केली.

# पारधी विकास योजनेअंतर्गत ‘स्वच्छ बेडा, सुंदर बेडा’ स्पर्धा

## सुशिक्षित बेरोजगारांनाही स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य, २२ मेपर्यंत अर्ज करण्याची मुदत

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा यांच्या मार्फत सन २०२५-२६ या वर्षासाठी ‘पारधी विकास योजना’ अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येणार असून लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. या योजनेत स्वच्छता आणि रोजगार या दोन महत्त्वाच्या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे.

पारधी समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी ‘स्वच्छ बेडा, सुंदर बेडा’ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी तीन बेड्यांची निवड करण्यात येणार आहे. संबंधित बेड्यावर ४० पेक्षा अधिक कुटुंबे असणे आवश्यक असून ग्रामपंचायतीचा ठराव घेणे बंधनकारक राहणार आहे. स्पर्धेचा परीक्षण कालावधी सहा महिन्यांचा असेल. तसेच ग्रामपंचायत स्तरावर समिती नेमून नोडल अधिकाऱ्यांमार्फत कार्यवाही केली जाणार आहे. ही योजना टीएसपी क्षेत्रातील पारधी बेडा असलेल्या ग्रामपंचायतींसाठी लागू राहील. याचबरोबर पारधी समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य देण्याची योजना देखील राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत ४० लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. अर्जदार हा पारधी जमातीचा असावा, त्याचे वय १८ ते ४५ वर्षे दरम्यान असावे तसेच किमान दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. या योजनांचे अर्ज सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा येथे उपलब्ध आहेत. तसेच इच्छुक उमेदवारांना https://itdp-pandharkawada.in या संकेतस्थळावरूनही अर्ज डाउनलोड करता येणार आहेत. भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह दि. २२ मे २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत पांढरकवडा येथील कार्यालयात स्वीकारले जाणार आहेत. अधिक माहितीसाठी नागरिकांनी ०७२३५-२२७४३६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी रेवैयाह डोंगरे (भा.प्र.से.) यांनी केले आहे.

# ‘हे सुरांनो चंद्र व्हा’ कार्यक्रम हाऊसफुल्ल

## -सोमेश्वर पुसदकरांना वाहिली स्वरांजली
## -सांस्कृतिक भवन श्रोत्यांनी तुडूंब

**अमरावती/का.प्र.**

सोमेश्वर पुसतकर स्मृती प्रित्यर्थ अमरावती शहरात आझाद हिंद मंडळ, सोमेश्वर पुसतकर मित्रपरिवार आणि आम्ही सारे फाउंडेशनच्या वतीने ‘हे सुरांनो चंद्र व्हा’ या बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अनिरुद्ध जोशी, राधिका भिडे, मंगेश बोरगावकर आणि मधुरा कुंभार या तरुण गायकांनी सादर केलेल्या हिंदी मराठी गीतांनी अमरावतीकर रसिक अगदी भारावून गेले होते.



मराठी संगीत आणि चित्रपटसृष्टीतील अत्यंत लोकप्रिय आणि हरहुन्नरी पार्श्वगायक मंगेश बोरगावकर याने विठू नामाचा गजर करत कार्यक्रमाला सुरुवात केली, त्या नंतर ‘येई हो विठ्ठले’..‘ अबीर गुलाल’,‘नाही कळले कधी’,‘डौल मोराच्या’,‘मनाच्या धुंदीत’ आणि ‘मन उधाण वाऱ्याचे’ गाणें सादर करून कार्यक्रमाची दमदार सुरुवात केली.

५७ व्या महाराष्ट्र राज्य चित्रपट व स्त्रीशक्ती सन्मान या पुरस्कारांच्या विजेत्या सारेगामा सिंगिंग सुपरस्टार आणि सुर नवा ध्यास नवा या लोकप्रिय कार्यक्रमांमुळे उदयास आलेल्या नव्या दमाच्या गायिका मधुरा कुंभार ने ‘जगण हे न्यार झालं जी ’,‘ दमादम मस्त कलंदर ’,‘लाल मेरी पत राखियो’,‘चाप तिलक’,‘निगाहे मिलाने को जी चाहता है’ असे एक से एक बढकर एक गाणे सादर केले.

सुर नवा ध्यास नवा या स्पर्धेत विजेतेपद पटकावत महाराष्ट्राचा महागायक ही मानाची ओळख निर्माण करणारा अनिरुद्ध जोशी याने अभी मुझ में कहीं, बदन पे सितारे लपेटे हुए,राधा ही बावरी, खंडेरायाच्या लग्नाला आणि मितवा हे गाणं सादर करून प्रेक्षकांमध्ये उत्साह निर्माण केला.आय पॉप स्टार या हिंदी म्युझिक रियालिटी शो मुळे प्रकाश झोतात आलेली राधिका भिडे ने ‘सुंबरान मांडल’,‘बाहों में चले आओ’,आणि ज्या गाण्यांने तिची ओळख निर्माण झाली ‘मन धावतया’हे गीत सादर करून वाह वा लुटली.

‘अभी ना जाओ छोडकर’,‘केव्हा तरी पहाटे’, धुंदी कळ्यांना, पिया पिया पिया... अशी अजर अमर गीते सादर करून आशाताई भोसले यांना श्रद्धांजली देण्यात आली.की बोर्ड वर असणारे परिमल जोशी, प्रवीण जोंधळे, गिटार वाजविणारे अभिजीत भावे, तबल्यावर साथ देणारे प्रवीण बावणे, ढोलक वादक अनिकेत दहीकर, ऑक्टोपॅड वर असणारे अक्षय हरले यांच्या सात संगीतानं हा संपूर्ण सोहळा रंगला.प्रस्ताविक अविनाश दुधे यांनी केले. कार्यक्रमाला महापौर श्रीचंद तेजवानी, अमरावती च्या आमदार सुलभा खोडके, बडनेरा चे आमदार रवी राणा, माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख, नगरसेवक विलास इंगोले, दिनेश बूब,बबलू शेखावत भोजराज काळे , डॉ प्रफुल्ल कडू, निलेश लाठीया, यांच्यासह राजकीय, कला, शिक्षण आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानेश्वर हिवसे, प्रदीप देशपांडे, सुनील जयवंत देशमुख,अॅड श्रीकांत खोरगडे, दिलीप दाभाडे, अविनाश भडांगे, महेश गट्टाणी, प्रवीणसिंह रघुवंशी, भूषण पुसतकर, दिलीप पाटील, मयूर जलतारे ,वैभव कोंणलाडे , प्रवीण चौधरी , दिपक तायडे, संजय मुचळंबे, अरुण जोशी,शशांक लावरे, दत्तात्रय पुसदकर महाविद्यालयाचे प्रा. विजय दरणे, प्रा.विकास अडलोक, प्रा.गोविंद तिरमनवार,रेवण पुसतकर कृष्णा हिवसे, वेदांत डांगे यांनी परिश्रम घेतले.संगीत प्रेमी अमरावतीकरांनी या सोहळ्याला भरभरून प्रतिसाद दिला.

सभागृहातील मंचावरून सदाबहार गाण्यांचे फवारे उडत असताना या क्षणी अमरावती शहरातील ख्यातनाम चित्रकार विजय राऊत यांनी स्व आशा भोसले आणि सोमेश्वर पुसतकर यांचे सुंदर असे चित्र रेखाटून आपल्या कुंचल्यातून आशाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.या चित्रांची उपस्थित आणि मुक्त कंठाने प्रशंसा केली.कार्यक्रमाचे निवेदन आसावरी देशपांडे, संचालन विशाल तराळ आणि आभार प्रदर्शन वैभव दलाल यांनी केले. हा संपूर्ण सोहळा अमरावतीकरांसाठी विशेष असा यादगार ठरला.

# संरक्षण भिंतीमुळे इतर मंदिरे पाण्याखाली जाण्याची भीती

## काम स्थगित करण्याची श्री विठोबा संस्थानची मागणी

**चांदूर रेल्व/वार्ताहर**

तालुक्यातील प्रसिद्ध कापुराची यात्रा म्हणून ओळख असलेल्या सावंगा विठोबा येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे सुरू असलेल्या ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास कामांमध्ये अनियमितता व तांत्रिक त्रुटी असल्याचा गंभीर आरोप संस्थानच्या वतीने करण्यात आला आहे. यासंदर्भात संस्थानने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत गट क्रमांक ५ मधील संरक्षण भिंतीचे काम तात्काळ स्थगित करून सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.



संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या कामांमध्ये गट क्रमांक ५ मध्ये संरक्षण भिंतीचे बांधकाम सुरू आहे. मात्र गट क्र.५चे प्रत्यक्ष मोजमाप व सिमांकन न केल्यामुळे या बांधकामात अनेक विसंगती आढळून आल्या आहेत. बांधकामासाठी चुकीची जागा निवडल्यामुळे परिसरातील लहान मंदिरांना धोका निर्माण झाला असून, काही मंदिरे पाण्याखाली जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

तसेच, संरक्षण भिंतीसाठी खोदण्यात आलेला पाया नियोजित ठिकाणाऐवजी अन्यत्र खोदण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे गट क्रमांक ५ मध्ये अनावश्यक विभागणी होऊन मंदिर परिसरातील व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. परिणामी भाविकांना पूजाअर्चा करताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही निवेदनात नमूद आहे. विशेष म्हणजे संबंधित विभागाने संस्थानला कोणतीही पूर्वसूचना न देता कामे सुरू केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर गट क्रमांक ५ मधील संरक्षण भिंतीच्या कामाची तात्काळ चौकशी करून काम थांबवावे व दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी संस्थानच्या वतीने करण्यात आली आहे.दरम्यान, या प्रकरणामुळे संबंधित विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासन यावर काय भूमिका घेते याकडे स्थानिक नागरिकांचे व भाविकांचे लक्ष लागले आहे.

# शहरातील विजेच्या समस्यांचे सूक्ष्म नियोजन करून तातडीने सोडवा

## खा.वानखडे यांचे विद्युत विभागाच्या आढावा बैठकीत आधिकाऱ्यांना सूचना

## विलास इंगोले , मिलिंद चिमोटे , बबलू शेखावतसह मनपातील नगरसेवकांनी उपस्थित केले प्रश्न

**अमरावती/का.प्र.**

शहरात दिवसेंदिवस विद्युत विषयक समस्या वाढत आहे , शहरातील वडाळी , बुधवारा , बिच्चू टेकडी , जवाहर स्टेडियम , फ्रेजरपुरा , चपराशीपुरा, पश्चिम क्षेत्र या भागात मोठ्या प्रमाणात लाईन जाणे, रोहित्र ओव्हरलोड होणे, विद्युत दाब कमी जास्त होणे अशा समस्याच निर्माण होत आहे.याबाबत नागरिकांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत असल्याने खासदार बळवंत वानखडे यांनी अधीक्षक अभियंता,म.रा. वि. वि. क. अमरावती यांच्या कार्यालयात आढावा बैठक घेतली.

उन्हाळ्याचे दिवस सुरु असताना विजेची मागणी जास्त असून अमरावती शहरात विद्युत विभागाच्या विविध विद्युत विषयक समस्या तसेच तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त होत आहे. सदर तक्रारींचे निवारण स्थानिक स्तरावर होत नसून नागरिकांचे समाधान होत नाही आहे.यामुळे सर्वसामान्य नागरिकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे.याबाबत विलास इंगोले, बबलू शेखावत यांच्या देखील तक्रारी प्राप्त होत आहे. याबाबत या समस्यांचे निराकरण होण्याच्या दृष्टीने विद्युत विभागाच्या आढावा बैठकित नगरसेवक तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या रोषाला विद्युत विभागाच्या अधिकार्यांना सामोरे जावे लागले. अमरावती शहरात एकूण तीन उपविभाग कार्यरत असून शहरात एकूण २,०६,००० विद्युत ग्राहक आहेत. तसेच अंदाजे ३६ कोटी रुपयांची वसुली वीज बिलांच्या माध्यमातून विभागास होते. परंतु त्या तुलनेत विभागामार्फत कोणत्याच सुविधा ग्राहकांना उपलब्ध होत नाही आहे.



शहरात दिवसा तसेच रात्री मोठ्या प्रमाणात विजेची मागणी असून विद्युत विभागाच्या नियोजन शून्य कारभारामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्याचा फटका बसत आहे. शहरातील नागरिकांना अखंडित वीज देणे हे विद्युत विभागाची नैतिक जबाबदारी असताना बऱ्याच ठिकाणी अनेक तास वीज पुरवठा खंडित राहत आहे. याबाबत सर्वसामान्य नागरिक विद्युत विभागाच्या कर्मच्यार्याना जाब विचारायला गेल्यास त्यांना उलटसुलट उत्तरे देऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण देखील करत नाही. यामुळे विद्युत विभागाबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. मनपातील कॉंग्रेस पक्षाच्या सर्व नागरसेवकांनी देखील त्यांच्या प्रभागातील नागरिकांच्या समस्यांची कैफियत त्यांनी मांडली.

यावर तातडीने कार्यवाही करून विद्युत विभागाचे सर्व अधिकारी कर्मच्याऱ्याचे संपर्क क्रमांक वृत्तपत्रात देऊन सूक्ष्म नियोजन करून सर्व समस्यां एक आठवड्यात सोडवण्याचे निर्देश खासदार बळवंत वानखडे यांनी दिले.सदर बैठकीला विलास इंगोले, विरोधी पक्षनेता, मनपा अमरावती , मिलिंद चिमोटे ,नगरसेवक बबलू शेखावत , अचर्ना आत्राम , फिरोज खान , संजय शिरभाते , सुरेश रतावा , मोहम्मद रेहान मोहम्मद यासीन (बल्ला भाई ) विक्की वानखडे , राजू भेले , नितीन काळे , जावेद साबीर , आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्यास दहा वर्षांची शिक्षा

## अचलपूर न्यायालयाचा निकालः ५ हजार रुपये दंड

**अमरावती/का.प्र.**

करजगाव येथील अल्पवयीन मुलीला खाऊचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या नराधम आरोपीला अचलपूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश (२) एस. एन. पाटील यांच्या न्यायापीठाने यांनी मंगळवारी १० वर्षे सक्तमजुरी आणि ५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.गोलू ऊर्फ अजय तुळशीदास सिरसाम (३२, रा. संतोषीनगर, खरपी, ता. चांदूरबाजार) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ६ मे २०१९ रोजी रात्रीच्या सुमारास आरोपीने पीडित मुलीला पोंगे घेऊन देतो, असे सांगून गावाजवळील शेतात नेले. तिथे तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. याप्रकरणी शिरजगाव कसबा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास केला होता. तत्कालीन सहायक पोलिस निरीक्षक अशोक कांबळे यांनी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

सरकारी पक्षातर्फे अभियोक्ता जी. ए. विचोरे यांनी प्रबळ युक्तिवाद केला. त्यांनी एकूण ७ साक्षीदार तपासले. पीडितेची साक्ष आणि तांत्रिक पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला पोक्सो कायद्याच्या कलम ४ अंतर्गत १० वर्षे सक्तमजुरी व ५ हजार रुपये दंड, तसेच भादंवि ५०६ अंतर्गत ३ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास नराधमाला अतिरिक्त कारावास भोगावा लागणार आहे.

या खटल्यात शिरजगाव कसबा पोलिस ठाण्याचे पोलिस हेड कॉन्स्टेबल अनिल अखंडे (ब. नं. १८८५) यांनी पैरवी अधिकारी म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. न्यायालयाच्या या निकालामुळे परिसरात समाधान व्यक्त होत आहे.

# चक्रभेदन योग साधना शिबीर सप्ताहाचे उद्घाटन

**अमरावती/का.प्र.**

शहिद भगतसिंह ग्रामिण सार्वजनिक वाचनालय बेलोरा येथे डॉ. पंजाबराव देशमुख योग महाविद्यालय व योग निसर्गोपचार चिकित्सा केंद्राचे संचालक योग प्रशिक्षक आर. के. देशमुख यांचे मार्गदर्शनपर प्रशिक्षणाखाली चक्रभेदन योगसाधना शिबीर सप्ताह आयोजित केलेला आहे.



शिबिराचे उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमास उद्घाटक म्हणून सरपंच भैय्यासाहेब कडू यांनी दिपप्रज्वलन व शहिद भगतसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करुन आयोजित चक्रभेदन योगसाधना आपल्या दैनंदिन जीवनात अतिशय महत्वपूर्ण असल्याचे सांगून गावकऱ्यांनी या योगसाधना शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन करुन उद्घाटन केले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अशोक देशमुख, तर प्रमुख अतिथी म्हणून सुरेश विधाते, विश्वास भोजने,विजय पुंडकर उपस्थित होते.शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी नंदकुमार चौधरी (वायुसेना), इंजि. बंडू चौधरी, डॉ. इखार, रोडे, भेटाळू यांनी सुध्दा प्रामुख्याने उपस्थिती दर्शवून योग साधना वर्गाचा लाभ घेतला. योग प्रशिक्षक आर. के. देशमुख यांनी चक्रभेदन योगसाधना वर्गास सुरवात केली. उद्घाटन प्रसंगीच्या योगसाधना वर्गात प्रात्याक्षिक करवून घेतले.प्रास्ताविक डॉ. पंजाबराव देशमुख योग महाविद्यालय व योग निसर्गोपचार केंद्र चांदूर बाजार चे योग निसर्गोपचार चिकित्सक प्राचार्य विजय एम.मते यांनी केले.आभार प्रदर्शन गिरिष देशमुख यांनी केले.उपस्थित सर्व प्रमुख अतिथींनी योग साधना ही काळाची गरज आहे व गावकऱ्यांनी आपले आरोग्य स्वस्थ ठेवण्यासाठी ह्या योग साधना शिबिराचा लाभ घ्यावा असे सांगून नोंदणी केली.यशस्वीतेकरीता उदय देशमुख, गिरीष देशमुख, मधुकर जांगजोळ यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

## संक्षिप्त

### विद्यार्थ्यांना एचएससी परीक्षेत प्राविण्य



**गुरुकुंज(मोझरी)**-तिवसा तालुक्यातील ग्रामीण भागातून अथक परिश्रम,जिद्द,चिकाटीच्या जोरावर एचएससी परीक्षेमध्ये विज्ञान शाखेतून विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांनी यशस्वी मजल गाठली. दरवर्षी प्रमाणे ग्रामीण भागातून जेमतेम परिस्थितीत अभ्यासाची जोड देऊन उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली याकरीता त्यांना नियमित शालेय अभ्यासोबतच विशेष मार्गदर्शन प्राप्त झाले यंदाच्या एच एस सी निकालात सृष्टी तिखे हिला ८२.६७टक्के,नकुल पोजगे याला ८१.०० गुण प्राप्त झाले असून मराठी विषयात शाळेतून सर्वाधिक ९३ गुण मिळाले आहे.पुर्वेश ढबाले याला ७९.०० टक्के गुण प्राप्त झाले. अनुज देवघरे ७६.५० टक्के गुण मिळाले असून गणित विषयात तालुक्यातून सर्वाधिक ९८ गुण प्राप्त झाले आहे.वैदही रोही ७२.५० टक्के सानिका भोजने ७०.८३ टक्के ध्रुप माळोदे ६८.०० टक्के गुण प्राप्त झाले या सर्वांचे सुशील निमकर,राहुल निमकर आदी शिक्षकवृंदांचे विशेष मार्गदर्शन यंदाच्या शैक्षणिक सत्रात लाभले.

### गर्भसंस्कार शिबीर रविवारी

**अमरावती-**वैद्यकीय क्षेत्रामध्ये सामाजिक बांधिलकी व सेवेचा वसा जोपासत आरोग्यम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व ओलावा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गर्भसंस्कारांचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात येत आहे. दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी सामाजिक बांधिलकी या नात्याने येत्या रविवार दि.१० मे रोजी सकाळी ९ वा. निःशुल्क गर्भ संस्काराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरामध्ये मधुमेह व प्रसव पीडा या विषयावर आरोग्यम च्या स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ डॉ. उर्वशी हातगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली, गर्भ संस्कार मार्गदर्शक डॉ. मृणाल पाटकर, आहारतज्ञ डीटी. ऋतुजा शिंगरूप, फिजिओथेरेपिस्ट डॉ. शिखा चावला व अन्य तज्ञ डॉक्टर मार्गदर्शन करणार आहेत.प्रसूतीसाठीची तयारी या अंतर्गत योग्य आहार, व्यायाम, श्वसन तंत्र, मानसिक तयारी व प्रसूती दरम्यान घ्यावयाची काळजी याबाबतही सविस्तर माहिती देण्यात येणार आहे.

# शहरातील बहुतेक उद्याने कोट्यवधींच्या खर्चानंतरही उजाडच!

## अनेक उद्यानांतील साहित्य मोडले

**अमरावती/का.प्र.**

महापालिका प्रशासनाकडून उद्यानांच्या देखभाल व सौंदर्यीकरणासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जात असला, तरी प्रत्यक्षात बहुतांश उद्याने दुर्लक्षित व अपुरी सुविधा असलेलीच आहे. त्यामुळे चिमुकल्यांचा खेळण्याचा हक्क हिराव हिरावला जात आहे. शहरातील २१८ उद्यानांपैकी केवळ ६५ ठिकाणीच लहान मुलांना खेळण्याचे साहित्य उपलब्ध असून, अन्य उद्याने केवळ शोभेची वास्तू बनली आहेत.



उद्यान म्हटले की, निसर्गरम्य वातावरण व लहान मुलांची खेळण्या-बागण्याची आठवण येते. लहान मुले, युवक व ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्याने विरंगुळ्याचे महत्त्वाचे ठिकाण मानले जाते. मात्र, अमरावती शहरातील ६५ उद्यानांमध्येच खेळण्याचे साहित्य उपलब्ध असून, यामध्येही काही उद्यानांतील खेळणी नादुरुस्त अवस्थेत आहे. शहरातील ६५ उद्यानांत घसरगुंडी, झुले, जिराफ, बदक, सिंगल-डबल बार, सीसॉ, बॅलन्स पट्टी, पाळणे, शिडी आदी साहित्य उपलब्ध आहे. परंतु काही ठिकाणी झुला आहे, तर काही ठिकाणी घसरकुंडीच आहे. कुठेही परिपुर्ण असे खेळणे नाहीत. तर काही ठिकाणचे खेळणे सुध्दा नादुरूस्त आहे. अशी उद्याने ही केवळ नावापुरती उभी असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

स्वस्तीक नगरातील उद्यानात झुला, घसरगुंडी गेल्या अनेक दिवसांपासून नादुरुस्त अवस्थेत आहे. तेथे बसण्यासाठी असलेले बेंच सिमेंटसह बाहेर निघाले आहेत. तर या उद्यानात स्वच्छतेचा अभाव आहे. या उद्यानाचा उपयोग तर आता लहान मुले क्रिकेट खेळण्यासाठी सुध्दा करीत आहेत. तसेच प्रसादनगर, वृंदावन कॉलनीतील उद्यानात तर खेळण्याचे एकही साहित्य नाही. अशाप्रकारची अनेक उद्याने नागरिकांसाठी आकर्षण न ठरता ‘शोभेच्या वास्तू’ बनल्याचे चित्र आहे. शहरात आधीच २१८ उद्याने असताना त्यातील बहुतांश उद्याने सुविधांविना आहेत. महापालिकेच्या उद्यान विभागाकडे सुमारे ४० नवीन उद्याने तयार करण्यासाठी अर्ज आल्याची माहिती समोर आली आहे.



# दिव्याखालील अंधार दुर्लक्षित

**बालकांवरील अत्याचार हा केवळ गुन्हा नाही, तो समाजाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करतो. जर आपल्या मुलांना सुरक्षित वातावरण देण्यात आपण अपयशी ठरत असू, तर आपल्या विकासाच्या सर्व दाव्यांना काहीही अर्थ उरत नाही.**

महाराष्ट्रासारख्या प्रगत औद्योगिक, शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीचा दावा करणाऱ्या राज्यात दर ५३ मिनिटांनी एका चिमुकलीवर अत्याचार होतो, ही वस्तुस्थिती केवळ धक्कादायक नाही, तर अस्वस्थ करणारी आहे. २०२३ ते २०२५ या कालावधीत नोंदविलेल्या गुन्हांची वाढ ही केवळ संख्यात्मक नाही तर ती आपल्या सामाजिक संरचनेतील खोलवर रुजलेल्या विकृतीचे प्रतिबिंब आहे. अर्थात, एकीकडे प्रगत व्यवस्थेची दिवास्वप्ने पाहताना आपल्याच दिव्याखालील अंधाराकडे मात्र दुर्लक्ष होताना दिसत आहे.

भारतात बालकांवरील लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी 'पोस्को' सारख्या कठोर कायदा आहे. या कायद्यांमध्ये दोषींना कठोर शिक्षा देण्याच्या तरतुदी आहेत. तरीदेखील गुन्हयांचे प्रमाण कमी होण्याऐवजी वाढत आहे. ही वाढ केवळ आकडेवारी नाही, तर ती प्रत्येकाच्या सुरक्षिततेवर, प्रत्येक पालकाच्या विश्वासावर आणि प्रत्येक बालकाच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. 'बालसुरक्षा' हा शब्द धोरणांमध्ये, घोषणांमध्ये आणि निवेदनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरला जातो; परंतु प्रत्यक्षात बालक सुरक्षित आहेत का, हा प्रश्न अधिकाधिक तीव्र होत चालला आहे. जर एखाद्या राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणावर बालकावरील अत्याचार होत असतील, तर त्या राज्याच्या विकासाच्या दाव्यांना काहीही अर्थ उरत नाही. या परिस्थितीचे विश्लेषण करताना सर्वप्रथम राज्याच्या कायदा-सुव्यवस्थेच्या यंत्रणेकडे लक्ष द्यावे लागते, अशा संतापजनक घटनांमधून कायद्यांची अंमल बजावणी प्रभावी नाही असेच दिसते. अनेक प्रकरणांमध्ये गुन्हा नोंदविण्या स विलंब होतो, तपास प्रक्रियेत त्रुटी राहतात, पुरावे गोळा करण्यात हलगर्जीपणा होतो आणि न्यायालयीन प्रक्रियेत विलंब होतो. परिणामी, आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण कमी राहते.

पोलीस यंत्रणेची भूमिका या संदर्भात अत्यंत महत्वाची आहे. परंतु या यंत्रणेवर अनेक प्रकारचे ताण आहेत, हेमान्य असले तरी मनुष्यबळाची कमतरता संसाधनांचा अभाव, प्रशिक्षणाची कमतरता आणि काही वेळा राजकीय हस्तक्षेप हे आलेच बालकांवरील अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये विशेष संवेदनशीलता आणि कौशल्य आवश्यक असते परंतु अनेकदा तपास करताना ही संवेदनशीलता दिसून येत नाही. काही प्रकरणांमध्ये पीडितांच्या कुटुंबालाच न्याय मिळविण्यासाठी आंदोलन करावे लागते, हे अत्यंत लज्जास्पद आहे. न्यायप्रणालीतील विलंब हा या समस्येचा आणखी एक गंभीर पैलू आहे. बालकांकरील अत्याचाराच्या प्रकरणांसाठी विशेष न्यायालये असली, तरी त्यांची संख्या अपुरी आहे आणि प्रकरणांचा ताण प्रचंड आहे अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. या विलंबामुळे पीडित आणि त्यांच्या कुटुंबावर मानसिक ताण वाढतो, तसेच आरोपींना सुटण्याची संधी मिळते.

**प्रतिबंधात्मक दृष्टिकोन कधी?**

ग्रामीण भागात शिक्षणाचा अभाव, आर्थिक असुरक्षितता आणि सामाजिक संरक्षणाची कमतरता यामुळे बालके अधिक असुरक्षित ठरतात. शहरी भागातही परिस्थिती वेगळी नाही; येथे डिजिटल माध्यमांचा अतिरेक, एकल कुटुंब पद्धती आणि सामाजिक तुटकता यामुळे नवीन प्रकारचे धोके निर्माण झाले आहेत तांत्रिक आयाम हा या समस्येचा नवा आणि वाढता पैलू आहे. इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे बालकांपर्यंत पोहोचणे गुन्हेगारांसाठी अधिक सोपे झाले आहे. परंतु सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा आणि कौशल्ये अद्याप पुरेशी विकसित झालेली नाहीत.

शासनाच्या धोरणांवर नजर टाकल्यास अनेक योजना आणि मोहिमा दिसतात यामध्ये 'बेटी बचाओं', 'महिला सुरक्षा अभियान', बालकल्याण योजना इत्यादी, परंतु या योजत प्रत्यक्षात किती प्रभावी ठरतात, हा प्रश्न कायम आहे. अनेकदा या योजना कागदावरच राहतात. जनजागृती मोहिमा राबविल्या जातात.परंतु त्या सातत्यपूर्ण आणि परिणामाकारक नसतात. या मोहिमांमध्ये स्थानिक गरजांचा विचार केला जात नाही. याशिवाय प्रशासनाची प्रतिक्रिया प्रामुख्याने 'घटना 'घडल्यानंतरची असते. एखादी घटना घडली की निषेध, निवेदने, चौकशी समित्या आणि काही दिवसांनी सर्व काही शांत. या प्रतिक्रियात्मक दृष्टिकोनामुळे मूळ समस्या कायम राहतात. परंतु त्या सातत्यपूर्ण आणि परिणामकारक राहते. गरज आहे तो प्रतिबंधात्मक दृष्टिकोनाची. शिक्षण व्यवस्थेची भूमिका या संदर्भात महत्वाची आहे. शाळांमध्ये लैंगिक शिक्षण, स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण आणि बालकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत कायद्याला अधिक कडक आणि बळकट करण्याचीही आवश्यकता आहे. कारण महिला मुलीबाबत अत्याचार, विनयभंग, बलात्कार या घटना वर्तमानपत्रात आल्या, की काहींना त्या नित्याच्याच वाटतात.एखादी घटना अधिक पेटलीच तर त्याबाबत विशेष तपास पथक किंवा तत्सम यंत्रणा कामी लावल्या जातात.

**काही ठोस उपाय**

सर्वप्रथम, कायद्याची अंमल बजावणी कठोरपणे करणे गरजेचे आहे. प्रत्येक प्रकरणात, तपासासाठी निश्चित कार्यमर्यादा ठरवणे आणि त्याचे पालन करणे आवश्यक आहेत. तपास प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढला पाहिजे.न्यायप्रणालीत सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. बालकांवरील अत्याचाराचा प्रकरणा साठी स्वतंत्र आणि पुरेशा संख्येने जलदगती न्यायालये उभारली पाहिजेत. प्रत्येकाचा प्रकरणाचा निकाल ठरावीक कालावधीत लागणे बंधनकारक केले पाहिजे. पोलिस यंत्रणेचे आधुनिकीकरण करणे गरजेचे आहे. विशेष प्रशिक्षण, आधुनिक साधने आणि उत्तरदायित्वाची स्पष्ट रचना यामुळे तपास अधिक प्रभावी होईल. प्रत्येक जिल्हयात बालसुरक्षा कक्ष सक्रिय असणे आवश्यक आहे. शिक्षण आणि जनजागृती यावर भर देणे आवश्यक आहे. शाळांमध्ये नियमितपणे जागरूकता कार्यक्रम, कार्यशाळा प्रशिक्षण सत्रे आयोजित केली पाहिजेत.

पालकांसाठी ही मार्गदर्शन कार्यक्रम आवश्यक आहेत. सायबर गुन्हयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष पथके तयार करणे आणि तांत्रिक क्षमता वाढविणे आवश्यक आहे. सोशल मीडियावर देखरेख करून संशयास्पद हालचालींवर त्वरित कारवाई करणे गरजेचे आहे समाजाच्या सहभागाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. नागरिकांना अशा घटनांना विरूध्द आवाज उठवणे, माहिती देणे आणि पीडितांना आधार देणे ही जबाबदारी स्विकारली पाहिजे. राजकीय इच्छाशक्तीही महत्वाची आहे रक्षण करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाचे समाज व्यवस्थेतील कर्तव्यदेखील आहे याची जाणीव होऊन आपण सर्वांनी एकात्रितपणे प्रयत्न केले तरच या भीषण वास्तवातून बाहेर पडणे शक्य होईल.(साभार ॲग्रोवन)

**सत्यसाई पी. एम.**
७२४८९९२३२३


# दोन राष्ट्रगीतांचे जनक; गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

आज ७ मे, भारत मातेचे महान सुपूत्र , चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची जयंती. रवींद्रनाथ टागोरांनी शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबददूल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला.

गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होते. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने 'सर' ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला.

रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केद्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता.

संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी,




विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

**श्याम ठाणेदार**

# 'शिवाजी कोण होता' असा प्रश्न का पडावा!

(शिवरायांचा असा एकेरी उल्लेख करून कॉंमरेड गोविंद पानसरे यांनी लिहिलेले पुस्तक)'शिवाजी कोण होता'?शिवाजी महाराज हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रोहिडेश्वराच्या मंदिरात जाऊन मुठभर मावळ्यांसह हिंदवी स्वराज्याची शपथ घेणारे शिवाजी महाराज होते. आपल्या गनिमीकाव्याने बलाढ्य शत्रूला नामोहरम करणारे वीर योद्धा शिवाजी महाराज होते. शिवाजी महाराज नसते तर सगळ्यांची सुंता झाली असती कवी कलशांनी आपल्या काव्यात शिवराजांविषयी असे गौरवोद्गार काढले आहेत.कीर्तनाला उपस्थित असलेल्या शिवरायांना पकडून नेण्यासाठी यवन सरदार आले तेव्हा साक्षात गरुड विमानात बसून वैकुंठागमन केलेल्या जगद्गुरु तुकाराम महाराज यांनी देवाकडे फक्त शिवरायांच्या रक्षणासाठी धावा केला आणि शिवरायांना संकटातून मुक्त केले. आलेल्या यवनांना सर्वत्र शिवाजी महाराजच दिसत होते कोणाला पकडावे हे त्यांना कळले नाही संभ्रमित होऊन हात हलवत ते परत गेले. क्रूरकर्मा अफजलखानाचे कपट ओळखून त्याला यमसदनी धाडणारे पराक्रमी शिवाजी महाराज ,दिल्लीच्या तकतथापुढे मान न तुकवता बादशाहाला त्याच्या चुकीच्या वर्तनाची जाणीव करून देऊन त्याचा धिक्कार करणारे यशवंत ,कीर्तीवंत शिवाजीराजे,अशा अनेक




बिरुदांनी गौरवान्वित झालेल्या शिवरायांबद्दल महाराष्ट्रातील व्यक्तीला शिवाजी कोण होता हा प्रश्न पडावा हे तर्कसंगत वाटत नाही.


आजही युगपुरुष शिवाजी महाराज यांची कूटनीती, राजनीती ,युद्धकौशल्य. गनिमीकावा याचा अभ्यास देशात आणि परदेशात असलेल्या संरक्षणप्रबोधीनीतून केला जतो. सैन्य दलाला स्फूर्ती आणि शक्ती मिळावी म्हणून भारताच्या उत्तर सीमेवर छत्रपती शिवरायांचा अश्वारूढ पुतळा शासनानेअलीकडेच स्थापन केलेला आहे. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी छत्रपती शिवरायांचा इतिहास महाराष्ट्रातील घराघरात पोहोचवला आहे. पानसरे यांच्या पुस्तकाच्या मांडणी वरून, त्यांनी केलेल्या विधानांवरुन इतिहासाचे विकृतीकरण करण्याचा हा त्यांचा अश्लाघ्य प्रयत्न आहे, असे लक्षात येते. विधानसभा अधिवेशतर अत्यंत हीन विधान केले .ते म्हणाले 'गागाभट्टांनी महाराजांना पायाच्या अंगठ्याने टिळा लावला'(गागाभट्ट हे काशीचे विद्वान पंडित होते,) शिवरायांच्या राज्याभिषेकाच्या धार्मिक विधींचे उत्तरदायित्व त्यांच्याकडे होते.गागाभट्टांविषयी असे हीन विधान करून शिवाजी महाराजांना आपण कमीपणा देत आहोत हेही त्यांच्या लक्षात येत नाही. महाराजांना माणसांची पारख नव्हती की काय? महाराजांचा असा अवमान अष्टप्रधान मंडळाने आणि रयतेने सहन केलाच नसता. स्वतःला राज्याभिषेक करून घेण्याचा महाराजांचा उद्देश एक 'धर्माधिष्ठित' राज्य,हिंदवी निर्माण व्हावे हा होता. महाराजांनी स्वतःकडे कधीही मोठेपणा घेतला नाही. हे राज्य व्हावे ही तो 'श्रीं'ची इच्छा असाच त्यांचा विचार होता. एका विशिष्ट वर्गाबद्दल मनातील द्वेषभावना व्यक्त करण्यासाठी महाराजांना कमीपणा देणे हे निंदनीय आहे. जो दुसऱ्यासाठी खड्डा खणतो त्यात तो स्वतःच पडतो,अशी म्हण आहे.आपले घोडे पुढे दामटण्यासाठी शिवरायांना अवमानीत, अपमानित करणारी विधाने देशभक्त जनता मान्य करणार नाही खपवून घेणार नाही.

**संध्या काटदरे**

# आजची तरुणपिढी रीब्स व्हिडिओच्या विळख्यात

आधुनिक साधनांमुळे सध्या समाजमाध्यमे वेडाचार पसरला की काय, अशी शंका येते. कारण आज अनेकजण मोबाईलमध्ये तासनतास डोके घालून बसतात.त्याचप्रमाणे कुठल्याही छोट्या प्रसंगाचे रील्स काढण्याचेही व्यसन प्रचंड प्रमाणात वाढले आहे.मोबाईलवर रील्स काढण्यासाठी सध्याची तरुणाई कुठल्याही थराला जात आहे. त्यासाठी आपला जीवदेखील धोक्यात घालायला ते मागेपुढे पाहात नाही. जीवघेणे स्टंट करण्याची स्पर्धाच सध्या सुरु आहे. सोशल मीडियावरील लाइक्स आणि फॉलोअर्ससाठी तरुण पिढी वेडावून गेली आहे. स्मार्ट फोनसारख्या साधनांचा कितीतरी उपयोग होऊ शकतो. अशा अत्याधुनिक साधनांमुळे मानवी जीवन अनेकपटीने सुसह्य झाले आहे. अनेकवेळा साधने आपण वापरत आहोत क ती साधने आपणास वापरत आहेत हेच लोकांना समजत नाही. इंटरनेटच्या मुबलक उपलब्धतेमुळे मोबाईलवर रील्स आणि व्हिडीओ पाहाणे अतिसामान्य बाब झाली आहे.

लहान मुलांपासून ते तरुण आणि वृद्ध व्यक्तींपर्यंत प्रत्येकजण आज मोबाईलच्या आहारी गेल्याचे दिसत आहे. आपल्या घटकाभर मनोरंजनासाठी अशी साधने वापरण्यास काहीच हरकत नाही. परंतु त्यासाठी स्वतःचा जव धोक्यात घालून रील्स बनवणे अतिशय गैर आहे. अनेक तरुणांनी अशा वेडापाई आपले जीव गमावले आहेत. आभासी जगातील प्रसिद्धीच्या मागे न लागता तरुण पिढीने वास्तव जगात वावरण्याची सवय लावून घेतली पाहिजे. वाहने चालवताना किंवा पाण्यातून प्रवास करताना तसेच रेल्वेमधूनसुद्धा तरुण मुला-मुलींना रील्स बनवण्याचा छंद जडला आहे. आपल्या जीवघेण्या छंदामुळे आपल्या सोबत असलेल्या इतरांचाही जीव




धोक्यात येतो याची जाणीवच राहिलेली नाही. अशा तरुण-तरुणींना त्यांचे पालक देखील काही बोलण्याचे धाडस करत नाहीत. कारण काही बोलले तर स्वतःच्या जीवाचे बरेवाईट करून घेण्याची भीती व्यक्त होते. त्यामुळे तरुणाईला जडलेल्या रील्स वबनवण्याच्या व्यसनाला कुठेतरी अंकुश येणे आवश्यक झाले आहे.

कर्नाटक सरकारकडून अलीकडेच अल्पवयीन मुलांना मोबाईल हाताळण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. याच प्रकारचे निर्बंध संपूर्ण देशपातळीवर घातले गेल्यास तरुण पिढी अशा व्यसनांच्या विळख्यातून बाहेर पडू शकेल. केवळ अल्पवयीनच नव्हे तर सज्ञान तरुण मुले-मुलीसुद्धा मोबाईलसाठी वाट्टेल ते धाडस करत आहेत. मोबाईल वापरणे आजच्या काळातील गरजेचे झाले आहे. असे असले तरी त्याच्या आहारी जाणे केव्हाही वाईटच ठरेल. रील्ससाठी स्टंट करणे महागात पडू नये याची काळजी वारकर्त्यांनी घेतली पाहिजे.

**प्रा. मधुकर चुटे**

# रिल्सची आभासी दुनिया !

सध्याचे युग हे स्मार्ट फोन आणि इंटरनेटचे युग आहे. हातात स्मार्ट फोन नाही असा तरुण आज शोधूनही सापडणार नाही. इंटरनेटचा डाटा पॅकही परवडणारा असल्याने प्रतिदिन २ जीबी मिळणारा डाटा आजचा तरुण कामासाठी कमी आणि मनोरंजनासाठीच अधिक व्यय करताना दिसतो. ऑनलाईन गेम्स खेळण्यासोबतच आजच्या पिढीला वेड लागले आहे ते रिल्स पाहण्याचे. आजमितीला इंस्टाग्राम आणि युट्युबवर विविध विषयावरील कोट्यवधी रिल्सचे भांडार उपलब्ध आहे. विविध शासकीय योजनांची माहिती देणारे, तांत्रिक युक्त्या शिकवणारे, नवनवीन पदार्थांच्या रेसिपी सांगणारे, फिल्मी जगताची माहिती देणारे,क्रीडा क्षेत्रातील निवडक आणि वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग दाखवणारे, प्रतिष्ठित व्यक्तींच्या खासगी आयुष्यातील घडामोडींची माहिती देणारे, नृत्याचे प्रशिक्षण देणारे, शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय स्तरावरील घडामोडी टिपणारे, मधुचंद्राला कुठे जावे इथपासून तर कुटुंबासह सुट्टी साजरी करण्यास जाण्यासाठी विविध पर्यटन स्थळांची आणि धार्मिक स्थळांची माहिती देणारे, लाखो रिल्स आज सहज उपलब्ध आहेत. यासोबतच चित्रपटातील एखाद्या गाण्यातील हुक स्टेपवर थिरकणारे तरुण तरुणींचे रिल्स, मालिका आणि चित्रपटांतील विनोदी प्रसंगांचे रिल्सही पुष्कळ प्रमाणात उपलब्ध आहेत. खास प्रौढांसाठी तयार करण्यात आलेले रिल्सही आज वयाची कोणतीच अट न बाळगता सहजपणे सर्वांना पाहता येतात. अशा रिल्समध्ये शिव्यांचा आणि अश्लील शब्दांचा मुक्तपणे वापर तर असतोच शिवाय अशा रिल्स बनवणाऱ्या तरुणी अंगप्रदर्शन करून रिल्सवर प्रतिदिन लाखो लाईक्स कमावत असतात. मनोरंजनासाठी तयार करण्यात आलेल्या, विनोदी मसाला असलेल्या, द्विअर्थी संवादांचा भरणा असलेल्या आणि अश्लील कंटेंट असलेल्या रिल्स पाहण्यात आजचा तरुण अधिक रुची दाखवत असल्याने अशा प्रकारच्या रिल्स बनवणाऱ्या युट्युबर्सची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ठराविक सबस्क्राइबर झाल्यावर, रिल्सना ठराविक लाईक्स आणि शेअर्स मिळाल्यावर ते बनवणाऱ्यांना आर्थिक कमाईसुद्धा होत असल्याने रिल्स बनवणाऱ्यांची संख्या आज वारेमाप वाढली आहे.

शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनी, विवाहित तरुणी विविध गाण्यांवर अंगविक्षेप करत रिल्स बनवतात आणि त्या इंस्टाग्राम आणि युट्युबवर अपलोड करतात. अशा रिल्सवर येणाऱ्या आंबट शौकिनांच्या कमेंट्स वाचून या तरुणींच्या आई वडिलांना, जवळच्या जिवाभावाच्या नातेवाईकांना काय वाटत असेल, याचा विचार या तरुणी करणार आहेत का? रिल्स बनवण्याच्या आहारी गेलेला मोठा वर्ग आज समाजात पाहायला मिळतो आहे. सध्याच्या युगात यशस्वी व्हायचे असेल, प्रसिद्धी मिळवायची असेल आणि पैसा कमवायचा असेल, तर त्यासाठी शिक्षण अनिवार्य नसून लोकांना आवडतील अशा रिल्स बनवता आले पाहिजे असा चुकीचा संदेश आजच्या तरुण पिढीवर बिंबु लागला आहे.आज आर्थिक फसवणुकीला बळी पडू लागले आहेत. केवळ तरुण वर्गालाच नव्हे, तर शालेय विद्यार्थ्यांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांनाच आज रिल्स पाहण्याचे वेड लागले आहे. रिल्स पाहण्यात तासन तास कसे निघून जातात याचा पत्ताही लागत नाही. आपणा सर्वांना प्रतिदिन खरोखरच मनोरंजनाची एव्हढी आवश्यकता आहे का ? मनोरंजनाच्या नादात आपला कितीतरी बहुमुल्य वेळ आपण असाच वाया घालवत असतो. विज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे आज सुखाची अनेक साधने आपल्या पायाशी लोळण घेत आहेत मात्र या सर्वांचा उपभोग घेत असताना आपण अनेक शारीरिक-मानसिक विकारांना आणि दोषांना निमंत्रण देत आहोत.

**जगन घाणेकर**

■ गुरुवार, ७ मे २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला
जिल्हा विशेष

## ...थोडक्यात...

### मारवाडी युवा मंचचे रक्तदान शिबिर संपन्न



**अकोला :** गेल्या वीस वर्षांपासून सामाजिक सेवेत कार्यरत असलेल्या मारवाडी युवा मंच च्या वतीने व श्री रामदेवबाबा व श्यामबाबा सेवा समिती तसेच हेडगेवार रक्तपेढीच्या सहकार्याने महाराष्ट्र दिनानिमित्त स्थानिक रामदेवबाबा श्यामबाबा मंदिर परिसरात भव्य रक्तदान शिबिर संपन्न झाले. मंचचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष निकेश गुप्ता यांच्या अध्यक्षतेत पार पडलेल्या या शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून श्री रामदेवबाबा श्यामबाबा सेवा समितीचे अध्यक्ष ओमप्रकाश गोयनका यांच्यासह मुख्य शाखेचे अध्यक्ष जितेंद्र बोरा, सचिव केतन गुप्ता, महिला मिडटाउन शाखेच्या अध्यक्षा निधी मित्तल, सचिव प्रीती अग्रवाल, उदय शाखे चे अध्यक्ष मानव भट्टड, सचिव अर्जुन अग्रवाल उपस्थित होते. रक्तदान संयोजक रितेश चौधरी यांच्या मार्गदर्शनात व प्रकल्प प्रमुख यश भट्टड, शुभम सुरेका, नेहा सोनालावाला, सौ. अर्चना अग्रवाल आदी उपस्थित होते. या शिबिरात रामदेवबाबा श्यामबाबा सेवा समितीचे माजी अध्यक्ष कमलकिशोर अग्रवाल, उपाध्यक्ष राजकुमार शर्मा, विदर्भ चेंबरचे राहुल मित्तल व श्रीकांत गोयनका यांनी भेट देत उपक्रमाची प्रशंसा केली. या शिबिरात मारवाडी युवा मंचचे प्रांतीय उपाध्यक्ष रोहित रुंगटा, प्रांतीय संयुक्त मंत्री स्वप्निल जैन, उपाध्यक्ष सर्वेश सोनालावाला आदी उपस्थित होते.

### वंडर किड्स स्कूलमध्ये डिजिटल क्लासरूम प्रारंभ



**अकोला :** वंडर किड्स स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, कापशी रोड येथे वार्षिक निकाल वितरण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी शाळेच्या नव्या डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन शाळेचे शिक्षक आणि पालक यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या आधुनिक शिक्षणासाठी शाळेने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल उपस्थितांनी स्वागतार्ह मानले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सी. के. इंगळे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून युवा वक्ते विशाल नंदागवळी, प्रथम एज्युकेशन फाउंडेशन चे ज्ञानेश्वर डिवरे, शाळेचे संचालक शशिकांत इंगळे उपस्थित होते. कार्यक्रमात शाळेच्या मुख्याध्यापिका प्रा. दिपाली गवई यांनी मनोगत व्यक्त करीत 'पालक आणि शिक्षक यांच्या सहकार्यामुळेच शाळेची प्रगती शक्य होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक शैक्षणिक साधनांचा प्रभावी वापर करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

### डॉ. प्रवीण चौहाण केंद्रीय होमिओपॅथी परिषदेच्या आर्थिक समितीवर



**अकोला :** स्थानिक होमिओपॅथी तज्ज्ञ व केंद्रीय होमिओपॅथी संशोधन परिषदेचे सदस्य डॉ. प्रवीण चौहाण यांची आयुष मंत्रालयाने केंद्रीय होमिओपॅथी संशोधन परिषदेच्या आर्थिक समितीवर सदस्य म्हणून नेमणूक केली. ही नेमणूक नवी दिल्ली येथील आयुष मंत्रालयाने केली. आंतरराष्ट्रीय होमिओपॅथी दिनानिमित्त नवी दिल्लीत झालेल्या समारंभात आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री प्रतापराव जाधव, वैद्य, पद्मश्री राजेश कोटेचा यांनी डॉ. चौहाण यांना नियुक्ती पत्र देऊन सन्मानित केले. यावेळी होमिओपॅथिक संशोधन परिषदेचे चेयरमन डॉ. सुभाष कौशिक, एनसीएच नवी दिल्लीचे चेयरमन डॉ. तारकेश्वर जैन, होमिओपॅथिक कौन्सिल महाराष्ट्राचे प्रशासक डॉ. बाहुबली शाह व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या समारंभात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन, योजना विकास आदी विषयांवर राष्ट्रीय तज्ज्ञांचे चर्चासत्र झाले. यात डॉ. प्रवीण चौहाण यांनी 'रोड मॅप फॉर सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन होमिओपॅथी इन इंडिया' या विषयावर संबोधन केले.

### वाढत्या तापमानामुळे आरटीओ कामकाजाच्या वेळेत बदल

**अकोला :** जिल्ह्यातील वाढत्या तापमानामुळे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) कामकाजाच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. शुक्रवार, दि. ८ मेपासून पक्की अनुज्ञप्ती, वाहनांची योग्यता प्रमाणपत्रे, नवीन वाहन नोंदणी तसेच जुन्या वाहनांच्या पुनर्नोंदणीसंबंधी कामकाज सकाळी ७.३० ते दुपारी १२.३० या वेळेत करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांनी या बदललेल्या वेळेनुसार आपले कामकाज नियोजित करावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १५२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# नसरापूर अत्याचार प्रकरणी आरोपीला फाशी द्या

## आमदार साजिद खान पठाण मागणी : महिला कॉंग्रेसच्या वतीने जिल्हाधिका-यांना निवेदन

■ प्रतिनिधी | अकोला ■

नसरापूर येथे ४ वर्षीय बालिकेवरील अत्याचार व निर्घृण खून प्रकरणामुळे राज्यभर संताप व्यक्त होत आहे. या घटनेचा तीव्र निषेध करत अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांनी आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे.



महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या अध्यक्षा संध्या ताई सव्वालाखे यांच्या मार्गदर्शनाखाली व आमदार पठाण यांच्या नेतृत्वात अकोला महानगर काँग्रेसच्या महिला अध्यक्षा कशीश खान यांनी जिल्हाधिकारी, अकोला यांना निवेदन सादर केले. या निवेदनात प्रकरणाची सखोल व तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

आमदार पठाण म्हणाले, अशा अमानवी घटनांमुळे समाजात भीतीचे वातावरण निर्माण होत असून महिला व बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर होत आहे. त्यामुळे या प्रकरणाची जलदगती न्यायालयात सुनावणी करून शक्य तितक्या लवकर निकाल देण्यात यावा. दोषींना कायद्यानुसार सर्वाधिक कठोर शिक्षा फाशी देण्यात यावी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.


निवेदनात पुढे नमूद करण्यात आले की, अशा गुन्ह्यांतील संशयितांवर प्रशासनाने विशेष लक्ष ठेवावे व कोणतीही सवलत देऊ नये. तसेच शहरासह ग्रामीण भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची गरज व्यक्त करण्यात आली. यामुळे गुन्हेगारीवर आळा बसेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी नगरसेविका सुवर्णरेखा जाधव, नगरसेवक आकाश कवडे, अब्दुल सलाम खान, आसिफ खान, याकुब खान, शेख अब्दुल्ला, डॉ. सुभाषचंद्र कोरपे, विजय जामनिक तसेच महिला पदाधिकारी ताबींदा अहमद अली, ॲनी इंगळे, रेखा डोंगरे, वर्षा चंद्रशेखर, मंजू चावरे, ज्योती डोंगरे, रंजना चावरे, संगीता सावद आदींसह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वसंतराव नाईक विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय पातुरचा १०० टक्के निकाल

■ प्रतिनिधी | पातूर ■

नुकतेच महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ पुणे चा इयत्ता १२ वीचा निकाल ऑनलाईन जाहीर झाला असून यामध्ये वसंतराव नाईक विद्यालय व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय पातुर चा निकाल १०० टक्के लागला असून यावर्षी सुद्धा महाविद्यालयाने आपली यशाची परंपरा कायम राखली आहे.

वसंतराव नाईक विद्यालय व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय पातुर मधून एकूण ८३ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते, यापैकी सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. महाविद्यालया



मधून कु.साक्षी अमर वानखेडे हिने ८५.१७ टक्के गुण प्राप्त करून महाविद्यालयातून प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे तसेच यश विनोद चव्हाण यांनी ७७.८० टक्के गुण प्राप्त करून महाविद्यालयातून द्वितीय क्रमांक पटकावला आहे व कुमारी आरती सुरेंद्र तायडे हिने ७५.८४ टक्के गुण प्राप्त करून महाविद्यालयातून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. या कनिष्ठ महाविद्यालयातून एकूण ०३ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण झाले असून ५० विद्यार्थी हे प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत तसेच २७ विद्यार्थी हे द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. महाविद्यालयाच्या या उत्कृष्ट यशाबद्दल संस्थेचे संस्थापक/ सचिव मा.श्री रामसिंगजी जाधव साहेब यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्राचार्या सौ. मीरा ढोकणे मॅडम व सर्व मार्गदर्शक शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरावरून कौतुक केले जात आहे.

# कडक उन्हाळा, सुट्ट्यांचा फटका; जनगणना २०२६ साठी मुदतवाढीची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरात सुरू असलेल्या जनगणना २०२६ प्रक्रियेला कडक उन्हाळा, शाळा-महाविद्यालयांच्या सुट्ट्या आणि मोठ्या प्रमाणात बाहेरगावी तसेच परदेशात गेलेल्या नागरिकांचा फटका बसत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर गटनेता तथा नगरसेवक निलेश देव यांनी अकोला महानगरपालिकेकडे जनगणनेसाठी मुदतवाढ देण्याची मागणी पुढे रेटली आहे.

१ मेपासून सुरू झालेली जनगणना ही देशाच्या भविष्यातील धोरणात्मक नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. मात्र, अकोल्यातील तीव्र उष्णतेमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. परिणामी घराघर जाऊन माहिती संकलन करणे तसेच नागरिकांकडून सेल्फ जनगणना पूर्ण करून घेणे अवघड ठरत असल्याचे निदर्शनास येत आहे. उन्हाळी सुट्ट्यांमुळे अनेक कुटुंबे पुणे, मुंबई, नाशिकसह विविध शहरांत किंवा नातेवाईकांकडे गेलेली आहेत. काही नागरिक परदेशात वास्तव्यास असल्याने शहरातील अनेक घरे सध्या कुलूपबंद आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष जनगणना मोहिमेदरम्यान कर्मचाऱ्यांना वारंवार बंद घरे आढळत असल्याची माहिती समोर येत आहे. या परिस्थितीत सध्याच्या कालमर्यादेत संपूर्ण आणि अचूक जनगणना पूर्ण होणे कठीण असल्याचे निलेश देव यांनी

### नागरिक बाहेरगावी, बंद घरे; निलेश देव यांचा प्रशासनाकडे आग्रह



निवेदनातून स्पष्ट केले आहे. 'जनगणना ही केवळ औपचारिक प्रक्रिया नसून प्रत्येक नागरिकाच्या अस्तित्वाची अधिकृत नोंद आहे. एकही नागरिक वंचित राहू नये, यासाठी वास्तव परिस्थितीचा विचार करून निर्णय घेणे आवश्यक आहे,' असे त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, त्यांनी प्रशासनासमोर काही ठोस मागण्या मांडल्या आहेत. यात सेल्फ जनगणनेसाठी तात्काळ मुदतवाढ देणे, १६ तारखेनंतर होणाऱ्या घरभेटीच्या मोहिमेस अतिरिक्त वेळ देणे, सध्यस्थितीचा सविस्तर अहवाल वरिष्ठांकडे पाठवणे आणि नागरिक परतल्यानंतर जनजागृती मोहीम पुन्हा राबवणे यांचा समावेश आहे. या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मुदतवाढ दिल्यास अकोला शहरात सर्वसमावेशक व अचूक जनगणना पूर्ण होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास निलेश देव यांनी व्यक्त केला आहे.

# किड्स पॅराडाईजच्या विद्यार्थ्याने बनवली 'सेल्फ चार्जिंग बाईक'

■ प्रतिनिधी | पातूर ■

भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग आणि नॅशनल इनोव्हेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबवल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या 'इन्स्पायर अवॉर्ड्स - मानक' २०२५-२६ साठी पातूरच्या किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्याच्या प्रकल्पाची निवड झाली आहे.

इयत्ता दहावीत शिकत असलेल्या प्रणव विशाल कांबळे याने ए आय मॉड्युल विकसित करीत 'सेल्फ चार्जिंग बाईक' हा प्रकल्प तयार केला होता. या प्रकल्पाचे त्याने इन्सापयर साठी नामांकन दखल केले या अभिनव प्रकल्पाची दखल भारत सरकारच्या इन्स्पायर अवॉर्ड मानक समितीने घेतली असून त्याला इन्स्पायर अवॉर्ड साठी नामांकन मिळाले आहे. किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या प्रणव कांबळे याला आपला वैज्ञानिक प्रकल्प किंवा 'प्रोटोटाइप' वर्किंग मॉड्युल विकसित करण्यासाठी दहा हजार



भारत सरकार तर्फे विद्यार्थ्याला दहा हजार रुपये आर्थिक सहाय्य

रुपये अर्थसहाय्य मंजूर झाले आहेत. हा प्रकल्प अधिक विकसित केल्यानंतर पुढील प्रदर्शनीमध्ये मांडला जाणार आहे. त्यासाठी प्रणव अथक परिश्रम घेत आहे. या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे, कार्यकारी संचालिका सौ. ज्योत्स्ना गाडगे, शाळेचे मुख्याध्यापक चंद्रमणी धाडसे, विज्ञान शिक्षक हरिष सौंदळे यांच्यासह शिक्षकांनी प्रणव चा सत्कार केला.

किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलने विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना नेहमीच प्रोत्साहन दिले आहे आणि हे यश शाळेसाठी अभिमानास्पद आहे.

### डॉ. आशीष अग्रवाल यांना रुमेटॉलॉजी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

**अकोला :** स्थानिक रामनगर येथील निवासी डॉ. आशीष ओमप्रकाश अग्रवाल यांना रुमेटॉलॉजीच्या वैद्यकीय शिक्षणासाठी आशियातील प्रतिष्ठित 'डॉ. देबाशीष दंड एआरए-अप्लार शिष्यवृत्ती २०२६' जाहीर झाली आहे. ही शिष्यवृत्ती संपूर्ण आशियात फक्त दोन निवडक व्यक्तींनाच प्रदान केली जात असते. ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिष्यवृत्ती जोडांच्या व ऑटोइम्यून आजारांच्या क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या डॉक्टरांना



दिली जाते. डॉ. आशीष अग्रवाल यांनी यापूर्वी जपान, अमेरिका आणि हाँगकाँग येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय वैद्यकीय परिषदांमध्ये आपले संशोधन केले आहे. त्यांचे संशोधन मे २०२६ मध्ये ऑस्ट्रेलियात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी मौखिक सादरीकरणासाठी निवडल्या गेले आहे.

# पुतणीच्या लग्नाला जाणा-या काकाचा दुर्दैवी मृत्यू

## ज्येष्ठ समाजसेवक सतीश राऊत यांचे निधन

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

आपल्या पुतणीच्या नागपूर येथे संपन्न होणाऱ्या शुभविवाहाला जाणाऱ्या काकाचा लग्न मंडपात पोहोचण्यापूर्वीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडल्याने हिवरखेड शहरावर शोककळा पसरली आहे.

हिवरखेड येथील ज्येष्ठ समाजसेवक, ग्रामपंचायत माजी पदाधिकारी, दै. हितवाद चे प्रतिनिधी तसेच हिवरखेड एज्युकेशन अँड सोशल वेल्फेअर सोसायटी या शिक्षण संस्थेचे सचिव सतीश तुळशीरामजी राऊत हे आपल्या आपल्या पुतणीच्या नागपूर येथे संपन्न होणाऱ्या शुभविवाहासाठी त्यांचे सर्व कुटुंबीय आधीच नागपूर लग्न स्थळी पोहोचलेले होते. नंतर सतिष राऊत हे १ मे रोजी एसटी बस द्वारे हिवरखेड



येथून नागपूरला निघाले होते. प्रचंड उन्ह लागल्यामुळे त्यांना अस्वस्थ वाटू लागले. नागपूर बस स्थानकावर उतरताच त्यांना त्रास वाढला आणि हृदयविकाराचा तीव्र धक्का आल्याने ते बस स्थानकावरच कोसळले. त्यांच्यासोबत असलेले भागचंदजी राठोड, स्वप्निल सत्यदेवरावजी गिऱ्हे आणि इतर सहकारी यांनी त्यांना तात्काळ रुग्णालयात हलविले परंतु डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अत्यंत उत्साहाने आपल्या लाडक्या पुतणीच्या लग्न सोहळ्यात जाणाऱ्या काकाचा लग्न मंडपात पोहोचण्यापूर्वीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडल्याने हिवरखेड शहरावर शोककळा पसरली आहे.

सतीश राऊत हे मनमिळावू स्वभावाचे, बोलके, व सदैव समाजकार्यासाठी तत्पर असलेले व्यक्तिमत्त्व होते. ते स्वातंत्र्य संग्राम सेनानी स्व. तुळशीरामजी राऊत यांचे सुपुत्र होते त्यामुळे त्यांना बालपणापासूनच समाजकारणाचे आणि देश सेवेचे धडे मिळाले होते. त्यांनी आपल्या आयुष्यात समाजसेवा, शिक्षण क्षेत्र व विविध लोकोपयोगी कार्यामध्ये मोलाचे योगदान दिले. गरजूंना मदत करण्यासाठी ते नेहमी पुढाकार घेत असत, त्यामुळे समाजात त्यांना विशेष मानाचे स्थान होते.

त्यांचेवर दिनांक २ मे २०२६ (शनिवार) रोजी हिवरखेड येथे शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी, १मुलगा, १मुलगी, भावंडे, नातवंडे, असा बराच आप्त परिवार आहे. त्यांच्या निधनाने समाजातील एक कर्तृत्ववान व सेवाभावी व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त केली जात आहे.


## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६७२/२०२६ — प्रोसेस नं.५४९८/२०२६
चौ.ता. १८/०६/२०२६ — दिनांक : २२/०४/२०२६

**अर्जदार :** १. झाकेरा बी मोहम्मद सलिम २. मोहम्मद नसिम मोहम्मद सलिम ३. सुरैय्या परवीन नसिर खान पठान नं. १ ते ३ रा. ताज नगर बोर्ड जवळ, खैर मोहम्मद प्लॉट, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ४. गुलनार परवीन मोहम्मद रफिक रा. इकरा टॉवर, तेलीपुरा चौक, ताजनापेठ, अकोला. ता. जि. अकोला. ५. मोहम्मद बक्षी मोहम्मद सलिम रा. वार्ड नं. १–४, शांती नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मोहम्मद सलिम शेख मुनीर
**पत्ता :-** रा. ताज नगर बोर्ड जवळ, खैर मोहम्मद प्लॉट, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ७३८५०५४०००

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मोहम्मद सलिम शेख मुनीर यांचे दि. २५/०७/२००९ रोजी अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे. गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७३६/२०२६ — प्रोसेस नं.६३५९/२०२६
चौ.ता. २०/०६/२०२६ — दिनांक : ०५/०५/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती मिना जितेंद्र विरमणी रा. ३०१, मधुनंदा अपार्टमेंट, एमराल्ड हाईटस शाळेसमोर, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. मेघना अंशुल बजाज रा. मेन रोड, दिवानबडा, शिव मंदिर समोर, मोनेगाव, ता. जि. जबलपूर, मध्यप्रदेश. ३. प्रेरणा जितेंद्र विरमणी रा. ३०१, मधुनंदा अपार्टमेंट, एमराल्ड हाईटस शाळेसमोर, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : जितेंद्र हरीचंद विरमणी
**पत्ता :-** रा. ३०१, मधुनंदा अपार्टमेंट, एमराल्ड हाईटस शाळेसमोर, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जितेंद्र हरीचंद विरमणी यांचे दि. २४/११/२०२४ रोजी क्रिष्णा इंस्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स, हैद्राबाद (तेलंगाना) येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६१३/२०२६ — प्रोसेस नं.५४७२/२०२६
चौ.ता. १५/०६/२०२६ — दिनांक : २१/०४/२०२६

**अर्जदार :** १. सुभाष ज्ञानदेव खर्च २. योगेश सुभाष खर्चे दोघेही रा. विठ्ठल रूख्मिनी मंदिराजवळ, कोठारी वाटीका नं. ४, खडकी, अकोला. ता. जि. अकोला. ३. रूचिका पवन चौधरी रा. फ्लॅट नं. ८०३, बी विंग, एमराल्ड पार्क, सि. नं. ५०/६, कोयते वस्ती जवळ, पुनावाले, पुणे सिटी, पुणे. ४११०३३

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत :स्वाती सुभाष खर्चे
**पत्ता :-** रा. विठ्ठल रूख्मिनी मंदिराजवळ, कोठारी वाटीका नं. ४, खडकी, अकोला ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत स्वाती सुभाष खर्चे यांचे दि. १३/०५/२०२४ रोजी बोरले हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, अमरावती रोड, बुऱ्हाणपुर, मध्यप्रदेश येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबंब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७१६/२०२६ — प्रोसेस नं.६३४९/२०२६
चौ.ता. ११/०६/२०२६ — दिनांक : ०५/०५/२०२६

**अर्जदार :** १. राजाभाउ दिनकरराव गावंडे (देशमुख) रा. मु. पो. कानशिवणी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : दिनकरराव फकिरराव देशमुख गावंडे
**पत्ता :-** रा. मु. पो. कानशिवणी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दिनकरराव फकिरराव देशमुख गावंडे यांचे दि. २९/०९/२०१६ रोजी कानशिवणी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत. त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७४३/२०२६ — प्रोसेस नं.६३५२/२०२६
चौ.ता. १८/०६/२०२६ — दिनांक : ०५/०५/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती लक्ष्मी धनराज गंगवाणी २. संजय धनराज गंगवाणी ३. रवी धनराज गंगवाणी सर्व रा. शास्त्री नगर चौक, पक्की खोली, सिंधी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : धनराज केसमल गंगवाणी
**पत्ता :-** रा. शास्त्री नगर चौक, पक्की खोली, सिंधी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत धनराज केसमल गंगवाणी यांचे दि.०६/०९/२०१२ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# लग्नाची वरात अडवून दोन गटात शिवीगाळ
## धपकी येथील घटना, चौघांवर गुन्हा

**वर्धा/जनमाध्यम**

जुन्या वादातून नवरदेवासह वरातीला अडवून दोन्ही गटाने एकमेकांना शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. ही घटना धपकी येथे २९ एप्रिल रोजी सकाळी १०.२० रोजी घडली. पोलिसांनी दोन्ही गटांना नोटीस देऊन सुद्धा वाद झाल्याने पोलिस पाटलाच्या तक्रारीवरून दहेगाव गो. पोलिसांनी ४ मे रोजी चौघांवर गुन्हा दाखल केला.

मिळालेल्या माहितीनुसार, मुळच्या उमरेड तालुयातील मकरडोकरा येथील रहिवासी तसेच सध्या सेलू तालुयातील धपकी येथे वास्तव्यास असलेल्या आशा शिंदे या मुलगा अभिषेक याच्यासोबत राहून मजुरीचे काम करतात. आशा शिंदे यांचे गावातील बाप्पा जगताप यांच्यासोबत जुना वाद आहे. त्यामुळे आशा शिंदे धपकी येथे राहण्यास आली. ५ एप्रिल रोजी आशा शिंदे ही त्यांच्या नातेवाईकांसह मकरडोकरा येथे साक्षगंधासाठी गेली होती. दरम्यान, बाप्पा जगताप व त्यांच्या नातेवाईकांनी पुन्हा एकदा जुन्या वादावरून कडायाचे भांडण झाले. त्यावेळी उमरेड पोलिस ठाण्यात एकमेकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. तेव्हापासून त्यांचा आपसी वाद सुरूच आहे. अनेकवेळा आपली बैठका घेऊन समझोता सुद्धा करण्यात आला. मात्र, समझोता झाला नाही. २३ एप्रिल रोजी प्रवीण जगताप हा धपकी येथे आला आणि आम्ही २९ एप्रिलला हळद व ३० एप्रिल रोजी नितेश जगताप याच्या जग्नाकरिता १०० ते १५० लोक वेनीगराव शिंदे रा. धपकी यांच्या घरी येत आहो. तुम्हाला काय करायचे करा, अशी धमकी आशा शिंदे व त्यांच्या नातेवाईकांना देऊन गेला. त्यामुळे २३ एप्रिल रोजी दहेगाव गो. पोलिसात तक्रार दिली होती. तक्रारीवरून पोलिसांनी त्यांना नोटीस सुद्धा दिली. दरम्यान, २९ एप्रिलला सकाळी १०.२० वाजताच्या सुमारास आप्पा जगताप हे त्यांचा नवरदेव नितेश शिंदे तसेच नातेवाईकांसह हळदीकरिता वाहनांनी आले असता आशा तसेच त्यांच्या नातेवाईकांनी राकेश चव्हाण, राजेंद्र सावंत, लंगेश जगताप सर्व रा. धपकी, अभिषेक शिंदे रा. मकरडोकरा ता. उमरडे जि. नागपूर यांचा वाद सुरू झाला. त्यांनी नवरदेव तसेच लग्नाची वरातीची वाहने अडवून गावात येण्यास मज्जाव केला. दरम्यान, त्यांचा आपसी वाद होऊन एकमेकांना शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. यादरम्यान, सुरेश बाप्पा चव्हाण, राजेंद्र सावंत, लंगेश जगताप, आशा शिंदे रा. धपकी यांनी नवरदेवाचे वाहन अडवून शिवीगाळ करीत मारण्याची धमकी दिली. दोन्ही गटांना लग्न समारंभादरम्यान वाद होऊ नये म्हणून नोटीस देऊन सुद्धा वाद झाला. पोलिस बंदोबस्त असूनही हा वाद झाल्याने पोलिस पाटील हंसराज जगताप यांच्या तक्रारीवरून राकेश चव्हाण, राजेंद्र सावंत, लंगेश जगताप तसेच अभिषेक शिंदे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला.

# सिंदी रेल्वेच्या सुनबाईची महाराष्ट्रभर दणक्यात एंट्री
## ‘उद्योग रत्न’ किताब पटकावत प्रांजली गुल्हाने यांचा सन्मान

**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**

जिद्द, कष्ट आणि आत्मविश्वासाच्या बळावर पुरुषप्रधान समजल्या जाणाऱ्या बांधकाम क्षेत्रात झेंडा रोवणाऱ्या सिंदी रेल्वेच्या सुनबाईने आता थेट महाराष्ट्रभर आपली छाप उमटवली आहे. प्रांजली सचिन गुल्हाने यांना ‘महाराष्ट्र उद्योग रत्न पुरस्कार २०२६’ प्रदान करण्यात आल्यानंतर त्यांच्या यशाचा डंका राज्यभर घुमू लागला आहे.

नगरपालिकेचे माजी उपाध्यक्ष तथा माजी प्राचार्य मधुकरराव गुल्हाने यांच्या स्नुषा असलेल्या प्रांजली यांनी ‘गुल्हाने प्रॉपर्टीज’च्या माध्यमातून नागपूरमध्ये एकापेक्षा एक भव्य निवासी प्रकल्प उभारून बांधकाम क्षेत्रात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. स्पृहा-कुसुम, स्पृहा-सिंधू, स्पृहा-एनक्लेव्ह, स्पृहा-एक्झॉटिका, स्पृहा पार्क व्ह्यू, स्पृहा-एलेगन्स, स्पृहा-एमेराल्ड अशा प्रकल्पांमधून त्यांनी दर्जा, विश्वास आणि वचनपूर्तीची परंपरा जपली.अडचणींचे डोंगर आडवे आले, तरी न डगमगता त्यांनी संघर्षाला सामोरे जात यशाची



शिखरे गाठली. त्यांच्या या वाटचालीत पती प्रा. सचिन गुल्हाने यांची खंबीर साथ लाभली, हेही तेवढेच महत्त्वाचे.नाशिक येथे पार पडलेल्या भव्य समारंभात अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते ‘महाराष्ट्र उद्योग रत्न’ हा मानाचा किताब त्यांना बहाल करण्यात आला. यापूर्वीही नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल तर्फे ‘उत्कृष्ट महिला बिल्डर’ म्हणून अभिनेत्री जरीन खान व उद्योगपती हिरानंदानी यांच्या हस्ते त्यांचा सन्मान झाला होता. सिंदी रेल्वेच्या मातीतून उगवलेल्या या यशकथेने संपूर्ण परिसराचा उर अभिमानाने भरून आला असून, सर्व स्तरातून प्रांजली गुल्हाने यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मेहनतीच्या जोरावर उभी राहिलेली ही ‘उद्योगरत्न’ सुनबाई आता अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## आज वर्धा येथे ॲड निलेश हेलोंडे-पाटील यांचा दौरा

**वर्धा/जनमाध्यम**

वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड निलेश हेलोंडे- पाटील आज जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे.

त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे.दि.७ मे रोजी दुपारी ३.३० वाजता आष्टी येथील विश्रामगृह येथे आष्टी तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शासकीय जमिनीवर चारा लागवड संबंधी आढावा बैठकीस उपस्थिती.

दुपारी ५ वाजता शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास भेट देतील. सायंकाळी ६.३० वाजता विश्रामगृह वर्धा येथे आगमन व मुक्काम. दि.८ मे रोजी सकाळी ९.३० वाजता वर्धा येथून कळंबकडे प्रयाण करतील.

## डिकीतून दीड लाख पळविले

**हिंगणघाट** - मजुरांची मजूरी देण्याकरिता बँकेतून काढलेले दीड लाख रुपये डिकीत ठेवून ओट्याच्या कामाचे मोजमाप घेण्याकरिता गेलेल्या ठेकेदाराचे अज्ञात चोरट्याने डिकी फोडून चोरून नेल्याची घटना सोमवार ४ रोजी घडली.

याप्रकरणी तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला. प्रमोद देठे हे ठेकेदार आहेत. त्यांच्याकडे १२ ते १५ मजूर काम करतात. सोमवार असल्याने मजुरी देण्यासाठी त्यांनी महाराष्ट्र बँकेतून दीड लाख रुपये काढले. ती रकम एम. एच. ३२ टी. ८००९ क्रमांकाच्या दुचाकीच्या डिकीमध्ये ठेवून ढोमणे ज्वेलर्सच्या दुचाकानाच्या ओट्याचे मोजमाप करण्याकरिता ते दुकानात शिरले. मोजमाप घेऊन घरी जाण्यासाठी निघाले असता डिकी तुटल्याचे दिसून आल्याने पाहणी केली असता त्यांना चोरी झाल्याचे लक्षात आले. देठे यांनी तात्काळ पोलिस ठाणे गाठून तक्रार नोंदविली. तक्रारीनुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# आरोग्य निर्देशांक सुधारण्यासाठी समन्वयाने काम करा-पराग सोमण
## माझ गाव आरोग्य संपन्न गाव मोहिमेची आढावा बैठक

**वर्धा/जनमाध्यम**

आरोग्य क्षेत्रात काम करणारे अधिकारी, कर्मचारी, आशा यांनी स्तनदा मातांना प्रसूतीनंतर सलग ७ दिवस प्रत्यक्ष भेटी देऊन योग्य स्तनपान पध्दती समजावून सांगावे. तसेच स्तनपानानंतर बाळाचे ढेकर काढण्याचे प्रात्याक्षिक करुन दाखविणे आवश्यक आहे. माता व बालकांचे आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी समन्वयाने काम करावे, अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी दिल्या.



माझ गाव आरोग्य संपन्न गाव मोहिम अंतर्गत वर्धा तालुकास्तरीय चर्चा व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी सुचना केल्यात. बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मंगेश रेवतकर, गटविकास अधिकारी हेमंत देवतळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. माधुरी दिघेकर, बाल विकास प्रकल्प अधिकारी अनुजा मोमले, माधुरी तडस, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी आम्रपाली मोरे, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. प्रशांत वाडीभस्मे, डॉ. विनीत झलके, स्मिता वासनिक, आशा संघटक दिपाली चांडोळे आदि उपस्थित होते.बैठकीदरम्यान पराग सोमन यांनी माझं गाव आरोग्य संपन्न गाव या अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांचा सखोल आढावा घेतला व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सुचना दिल्या. ग्रामीण भागातील आरोग्य निर्देशांक सुधारण्यावर यावेळी भर देण्यात आला. बैठकीला आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यिका, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, गट प्रवर्तक, आशा स्वयंसेविका व अंगणवाडी कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

## संक्षिप्त

### मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेच्या लाभार्थ्यांची ८ मे रोजी निवड

**वर्धा**-मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेंतर्गत जेष्ठ नागरिकांना बौद्धगया येथील तीर्थक्षेत्राकरीता लाभ देण्यात येणार आहे. यासाठी पात्र अर्जातून २०० लाभार्थ्यांची निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी पात्र लाभार्थ्यांमधून ईश्वर चिठ्ठीने निवड करण्यात येणार आहे. यासाठी ८ मे रोजी सकाळी ११ वाजता सामाजिक न्यायभवन येथे सोडतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास लाभार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सामान्य जेष्ठ नागरिकांना देशातील मोठ्या तीर्थस्थळांना जाऊन मन:शांती तसेच आध्यत्मिक पातळी गाठणे सुकर व्हावे, यासाठी राज्यातील सर्व धर्मातील जेष्ठ नागरिक जे ६० वर्ष किंवा त्याहून अधिक वयाचे आहेत, त्यांना राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीचे व दर्शनाची संधी देण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरु करण्यात आली आहे.योजनेंतर्गत सर्वप्रथम बौद्धगया या तीर्थक्षेत्राकरीता रेल्वेने रवाना करावयाचे असल्याने या यात्रेकरीता पात्र अर्जातुन २०० लाभार्थ्यांची निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करावयाची आहे. जिल्ह्याकरीता नेमुन दिलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यामुळे ईश्वरचिठ्ठीद्वारे लाभार्थ्याची निवड करण्यात येणार आहे, असे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त अंकेश केदार यांनी कळविले आहे.

### डिकीतून ४८ हजारांची रोख पळविली

**वर्धा**-बँकेतून वडिलांच्या पेन्शनची रकम काढून आईस्क्रिम पार्लरमध्ये लस्सी पिण्याकरिता थांबले. दरम्यान, अज्ञात चोरट्याने दुचाकीच्या डिकीतून ४८ हजारांची रोख पळविल्याची घटना ४ रोजी दुपारच्या सुमारास घडली. याप्रकरणी हेमंत महाजन यांच्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला. हेमंत महाजन हे वडिलांसोबत एम. एच. ३२ ए. डी. ७५५३ क्रमांकाच्या दुचाकीने स्टेट बँकेत गेले. पेन्शनचे ४८ हजार रुपये काढून डिकीत ठेवले होते. वडिलांना लस्सी पिण्याची इच्छा झाल्याने ते नॉव्हेल्टी पार्लरमध्ये थांबले होते. दरम्यान, चोरट्याने पेन्शनरवरच हात साफ केला.

### डोळयावर दगड हाणला

**देवळी**-मित्रांसोबत वायगाव येथील एका खानावळीत जेवण करण्यासाठी गेले. जेवण सुरू असताना राजू कावनकुरे याने जेवणाच्या कारणावरून सुरेश आत्राम याला शिवीगाळ करीत होता. सुरेशने राजूला हटकले. मात्र, याच कारणावरून राजू कावनकुरे याने तू माझ्यासोबत हॉटेलमध्ये वाद का केला असे म्हणत सुरेशच्या डोळयावर दगड मारून जखमी केले. याप्रकरणी तक्रारीवरून राजू कावनकुरे याच्याविरुद्ध देवळी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

# नागपुरात ‘राजा शिवाजी’ चित्रपटाचा प्रीमियर सोहळा उत्साहात

**हिंगणघाट/जनमाध्यम**

मराठी चित्रपटसृष्टीत सध्या चर्चेत असलेल्या ‘राजा शिवाजी’ या ऐतिहासिक चित्रपटाच्या निमित्ताने नागपुरात प्रीमियर सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यास दिग्दर्शक व अभिनेता रितेश देशमुख यांनी विशेष उपस्थिती लावली.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे युवा नेते सलीलदादा देशमुख यांच्या पुढाकाराने या प्रीमियरचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वर्धा



जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले,मयुरा काळे, शहराध्यक्ष दुणेश्वर पेठे, गोटमारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.चित्रपटाला मिळणाऱ्या प्रचंड प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त करत रितेश देशमुख म्हणाले, हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसून तरुण पिढीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणादायी कार्याची जाणीव करून देणारा आहे.कार्यक्रमादरम्यान चाहत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. चित्रपटातील निवडक दृश्ये व गाण्यांचे सादरीकरण करण्यात आल्याने वातावरणात उत्साहाची लहर पसरली होती.‘राजा शिवाजी’ हा चित्रपट १ मे २०२६ रोजी प्रदर्शित झाला असून अल्पावधीतच बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत प्रेक्षकांची पसंती मिळवत आहे.

# प्रश्न विचारण्याची सवय जोपासा-गजेंद्र सुरकार



**वर्धा/जनमाध्यम**

प्रत्येकाला प्रश्न पडणे ही मानवी प्रवृत्ती असून, प्रश्न विचारण्याची सवय जोपासली तरच विज्ञाननिष्ठ विचारसरणी विकसित होऊ शकते, असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी केले.

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, वर्धा यांच्या वतीने १ ते ७ मे दरम्यान गोपुरी येथील केंद्रात आयोजित विद्यार्थ्यांच्या संस्कार शिबिरात ते मार्गदर्शन करत होते. यावेळी ब्रह्मकुमारी सेवा केंद्राच्या संचालिका बी.के. माधुरी, बी.के. अपर्णा, बी.के. रेनू , बी.के. स्नेहा तसेच लोक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुषमा कोटेवार उपस्थित होत्या.सुरकार म्हणाले, आदिम काळात मानवास भूक आणि सुरक्षेचे प्रश्न भेडसावत होते. त्या प्रश्नांची उत्तरे शोधताना त्याने निसर्गातील घडामोडींचा अभ्यास केला आणि विज्ञानाचा पाया रचला. मात्र आजच्या स्पर्धात्मक युगात प्रश्न विचारण्याऐवजी अंधश्रद्धेकडे झुकण्याची प्रवृत्ती वाढत आहे. भीती, नशीब, पाप-पुण्य यांच्या प्रभावामुळे लोक बुवा-बाबांच्या मागे जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना निरीक्षण, तर्क, अनुमान आणि प्रयोग यांच्या माध्यमातून विज्ञाननिष्ठ विचार कसा करावा, याचे प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. तथाकथित चमत्कारांमागील विज्ञान उलगडून दाखवत दैवी शक्ती, जादूटोणा, भुत-प्रेत यासारख्या गोष्टी अंधश्रद्धा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी बी.के. माधुरीदीदी व सुषमा कोटेवार यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बी.के. अपर्णा दीदी यांनी केले. सूत्रसंचालन बी.के. रेनू दीदी यांनी केले, तर आभार प्रदर्शन बी.के. स्नेहा दीदी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सेवाधारी बी.के. अविनाशभाई, बी.के. मधुदीदी, ऋषिकेश दिवटे, प्रणालीताई वादाफळे, श्वेता राऊत यांनी परिश्रम घेतले.

## समाजात तेढ निर्माण करण्यावर गुन्हा

**सेलू** - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आक्षेपार्हरित्या फोटो तयार करून व्हॉट्सअॅपद्वारे मित्रांना पाठवून दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्या ओंकार कुंभारे रा. दुबे ले-आऊट सेलू याच्याविरुद्ध तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. ही घटना ३ रोजी उघडकीस आली. डॉ. आंबेडकरांचे आक्षेपार्हरित्या फोटो तयार करून ओंकार हा व्हॉट्सअॅपद्वारे पसरवित असल्याची माहिती निखील नंदेश्वर याला त्याच्या मित्रांनी सांगितली.

या प्रकारामुळे दोन समाजात तेढ निर्माण होईल तसेच धार्मिक भावना दुखावणार, या उद्देशाने व्हॉट्सअॅपद्वारे प्रसारित करीत होता. दरम्यान, निखिलन सेलू पोलिस ठाणे गाठून ओंकार कुंभारे याच्याविरुद्ध तक्रार दिली. तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे.

## संशयितास अटक

**समुद्रपूर**-तालुयातील वाकसूर येथील नागरिकांनी एका संशयित इसमाला पकडून ठेवल्याची माहिती गस्तीवर असलेल्या पोलिसांना मिळाली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून नाव विचारले असता शांताराम उईके असे सांगितले. मात्र, तो उडवाउडवीचे उत्तर देत असल्याने अंगझडती घेतली. तो अंधारात एखादा दखलपात्र गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याचे आढळून आल्याने त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# वन्यजीव हल्ल्यातील पिडीतास सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकार-न्या.विवेक देशमुख
## बोरधरण येथे जिल्हास्तरीय चर्चासत्र व प्रशिक्षण कार्यशाळा

**वर्धा/जनमाध्यम**

वन्यजीव हल्ल्यातील पिडीत व त्यांच्या कुटुंबियांना केवळ आर्थीक मदत नव्हे तर संपुर्ण न्याय सहाय्य, मानसिक आधार व त्यांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक मदत करणे गरजेचे आहे. त्यांना सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकारी आहे, असे प्रतिपादन जिल्हा विधीसेवा प्राधिकरणाचे सचिव न्या.विवेक देशमुख यांनी केले.

मानव-वन्यजीव संघर्षातील पीडितांना न्याय मिळवून देण्याकरीता राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाद्वारे योजना सुरु करण्यात आली आहे. मानव आणि वन्यजीव यांच्यात वाढत चाललेला संघर्ष, त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक, पर्यावरणीय व कायदेशीर समस्या तसेच वन्यजीव हल्ल्यातील पीडितांना न्याय, सहाय्य व पुनर्वसन उपलब्ध करून देण्याच्या



उद्देशाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व वन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बोरधरन येथे जिल्हास्तरीय चर्चास्तर व प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वरिष्ठ दिवानी न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव विवेक देशमुख होते. प्रमुख अतिथी म्हणून उप वनसंरक्षक हरवीर सिंग, बोर व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक मंगेश ठेंगडी उपस्थित होते. देशमुख यांनी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाची मानव-वन्यजीव संघर्षातील पीडितांना न्याय मिळवून देण्याकरीता योजना, २०२५ बाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

योजनेंतर्गत वन्यजीव हल्ल्यातील पीडितांना त्वरित व मोफत विधी सहाय्य देणे, नुकसानभरपाई प्रक्रियेमध्ये आवश्यक कागदपत्रे व कायदेशीर मार्गदर्शन पुरविणे, पीडित कुटुंबांना कल्याणकारी योजनांचा लाभ देणे, दुर्गम व जंगल परिसरातील नागरिकांमध्ये विधी साक्षरता व जनजागृती निर्माण करणे, लोकअदालतीच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणे जलद निकाली काढणे, विधी स्वयंसेवकांच्या माध्यमातून सहाय्य पोहोचविणे, मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी स्थानिक समुदायाचा सहभाग वाढविणे हा योजनेचा उद्देश असल्याचे देशमुख यांनी सांगितले.कार्यक्रमात प्रसिद्ध मानववंशशास्त्रज्ञ व वन्यजीव अभ्यासक डॉ.विरेंद्र प्रताप यादव यांनी मानव-वन्यजीव सहअस्तित्व आव्हाने व उपाय या विषयावर मार्गदर्शन केले. वाघ हा जंगल परिसंस्थेचा अत्यंत महत्वाचा घटक असून जंगलातील जैवविविधतेचे संतुलन राखण्यात त्याची महत्वपूर्ण भूमिका आहे. जंगलातील नैसर्गिक अधिवास कमी होणे, पाण्याची टंचाई, जंगलांवरील मानवी अतिक्रमण व वन्यजीव मार्ग बंद होणे ही संघर्षाची प्रमुख कारणे असल्याचे त्यांनी सांगितले. पीपल फॉर ॲनिमल्स संस्थेचे सचिव आशिष गोस्वामी यांनी वन्यजीव संवर्धनासाठी पर्यावरणीय संतुलन राखणे, वनक्षेत्रांचे संरक्षण करणे, वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासाचे जतन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी वन विभागातील अधिकाऱ्यांनी क्षेत्रीय पातळीवरील अडचणी, वन्यजीव बचाव मोहिमा, नुकसानभरपाई प्रक्रिया तसेच स्थानिक नागरिकांच्या समस्यांवर चर्चा केली. प्रास्ताविक मनिष सावरकर यांनी केले. संचलन श्रीकांत पवार यांनी केले. कार्यक्रमास वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी, पॅनल अधिवक्ता, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)


**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १५९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा ११ ला

**अमरावती/प्रतिनिधीः-** कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील मोर्शी रोड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (आयटीआय) येत्या ११ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता 'प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून आयटीआय उत्तीर्ण व अन्य पात्र उमेदवारांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

या भरती मेळाव्यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित 'एनआरबी बेअरिंग या कंपनीसह अमरावती जिल्ह्यातील विविध स्थानिक नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यासाठी फिटर, वेल्डर, इलेक्ट्रिशियन, डिझेल मेकॅनिक, ऑटो इलेक्ट्रिशियन, सीएनसी ऑपरेटर, टूल अँड डाय मेकर,




मशिनिस्ट, मशिनिस्ट ग्राइंडर, मशीन टूल मेंटेनन्स आणि मोटर मेकॅनिक या व्यवसायातून आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच १० वी, १२ वी, कोणत्याही शाखेचे पदवीधर आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंगमधील डिप्लोमा उत्तीर्ण उमेदवारांसह अंतिम वर्षात प्रशिक्षण घेत असलेले उमेदवारही या मेळाव्यात सहभागी होऊ शकतात.

इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी येताना आपला अद्ययावत बायोडाटा, मूळ कागदपत्रे आणि त्यांच्या छायांकित प्रती (झेरॉक्स) सोबत आणणे अनिवार्य आहे. या संधीचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे उपसंचालक तथा सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार यांनी केले आहे.

## नवीन कामगार संहिताः नियमावलीवर हरकती व सूचना नोंदवा- कामगार उपायुक्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागामार्फत राज्यातील कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी नवीन कामगार संहितांच्या नियमावलीची घोषणा करण्यात आली आहे. याअंतर्गत औद्योगिक संबंध संहिता आणि वेतन संहिता यांबाबतच्या अधिसुचना दि. २८ आणि ३० एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या प्रस्तावित नियमावलीबाबत संबंधित व्यक्ती, कामगार संघटना आणि भागधारकांनी आपल्या हरकती व सूचना विहित मुदतीत नोंदवाव्यात, असे आवाहन अमरावती विभागाचे कामगार उप आयुक्त चं. अं. राऊत यांनी केले आहे.

औद्योगिक संबंध संहिता आणि वेतन संहिता यांसारख्या महत्त्वाच्या नियमांबाबत हरकती नोंदवण्यासाठी ४५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

ज्या नागरिकांना किंवा संघटनांना या नियमावलीबाबत काही बदल सुचवायचे असतील, त्यांनी आपल्या सूचना लेखी स्वरूपात 'कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१' या पत्त्यावर पाठवाव्यात. तसेच, mh.labourcodes@gmail.com या ई-मेल आयडीवर देखील आपल्या सूचना पाठवता येतील.

## जाहीरनामा

श्रीमती रोहिणी वि.मनोरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तिवसा, जि.अमरावती यांचे न्यायालय
आर.एम.जे.सी.क्र.९१/२०२६ — ने.ता.०९.०६.२०२६

अर्जदार -
1. Smt.Asha Pralhad Mankar, Aged about 50 Yrs. Occu.:Housewife (Deceased's Daughter-in-law)
2. Divya D/o Pralhad Mankar, Aged about 25 Yrs.Occu.:Education (Deceased's Grand Daughter)
3. Shreya D/o Pralhad Mankar,Aged about 22 Yrs.Occu.:Education (Deceased's Grand Daughter)
   Appli.1 to 3 R/o Behind S.S.D.Bangalow, Maa Jijau Colony, Arjun Nagar, Shivaji Nagar, Amravati
4. Sushila Vasant Kaware, Aged about 55 Yrs.Occu.: Housewife R/o Ward No.1, At Po.Shirajgaon Mozari, Tq.Tiwasa, Dist.Amt. (Deceased's Daughter)
5. Shalini Ashok Meshram,Aged about 55 Yrs. Occu.:Housewife R/o Netaji Chowk, Bhatkuli, VTC Takarkheda Sambhu) Po.Takarkheda, Dist. Amravati. (Deceased's Daughter)
6. Anuradha Pramod Kosarkar, Aged 49 Yrs.Occu.: Housewife R/o Ward No.6, Hinganghat Fail, VTC- Pulgaon, Dist.Wardha (Deceased's Daughter)
7. Sujata Rajendra Kavre, Aged about 50 Yrs.Occu.: Housewife R/o Hirapur, Po.Nimkhed Bzr. Dist.Amravati (Deceased's Daughter)
8. Shamrao Natthuji Shende, Aged about 75 Yrs. Occu.: Labour R/o At Po.Bhankhed, Tq.Dist.Amravati. (Deceased's Son-in-law)
9. Dinesh Shamrao Shende, Aged about 46 Yrs. Occu.: Labour R/o Dastur Nagar, Forest Colony, Chhatri Talao Road, Shivaji Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati (Deceased's Grand Son)
10. Jyoti Santosh Meshram, Aged about 44 Yrs.Occu.:Housewife R/o Jalalpur, Tq.Dist.Akola (Deceased's Grand Daughter)
11. Pratibha Jitendra Kaware, Aged about 43 Yrs.Occu.: Housewife R/o Behind 110 Super Market, Plot No.30-B, Kashi Nagar, Rameshwari Road, Parvati Nagar, Nagpur. (Deceased's Grand Daughter)
12. Manisha Mohan Sahare, Aged about 39 Yrs.Occu.: Housewife R/o House No.50, Tower Line Road, Pundlik Baba Nagar, V.M.V. Amravati. Tq.Dist.Amravati (Deceased's Grand Daughter)
13. Gopal Shamraoji Shende, Aged about 37 Yrs. Occu.: Labour R/o At Po. Bhankhed, Tq.Dist. Amravati. (Deceased's Grand Son)

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **श्रीमती आशा प्रल्हाद मानकर व ईतर** यांनी दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, तिवसा यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता APPLICATION UNDER THE CLAUSE 2 OF BOMBAY REGULATION ACT VIII OF 1827 अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **पुंडलिक गोपाळ मानकर** यांचा मृत्यू दिनांक **२५.११.२०२५** रोजी बख्तार हॉस्पीटल अमरावती, ता.जि.अमरावती येथे झालेला आहे. व **गौकर्णा पुंडलिकराव मानकर** यांचा मृत्यू दिनांक **०१.०९.२०२४** रोजी शिरजगांव मोझरी, ता.तिवसा, जि.अमरावती येथे झाला. तसेच **प्रल्हाद पुंडलिकराव मानकर** यांचा मृत्यू दिनांक **२८.०४.२०१९** रोजी वडुरा फाटा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. **महानंदा शामरावजी शेंडे** यांचा मृत्यू दि.**०२.१०.२०२५** रोजी सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, अमरावती, ता.जि.अमरावती येथे झालेला आहे. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे ईतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू **पुंडलिक गोपाळ मानकर** मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दि.०६ **माहे मे २०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहाय्यक अधीक्षक**, दिवाणी न्यायालय, क.स्तर, तिवसा

---

**DISTRICT CONSUMER DISPUTED REDRESSAL COMMISSION, AMRAVATI**
Under the Consumer Protection Act, 2019

Telephone No.: 0721-2662158 — AT BEHIND CIRCUIT HOUSE
Email : confo-am-mh@nic.in — OLD BYPASS ROAD, JAIL ROAD,
Website : — CAMP, DIST. AMRAVATI (M.S)

**CONSUMER CASE NO.DC/468/CC/207/2024**

Shri Mangesh Rameshrao Umak ... Petitioner/Appellant
- Versus -
M/s Aasha Builders & Developers & 2 ... Opposite Party/ Respondent(s)

Opposite Party / Respondent Name :
1. M/s Aasha Builders and Developers & 2
Through its partner Sanjay Vaikunthrao Varhade,
R/o C/o Ashok Ijalkar, Shanti Nagar, Old Bypass Road,
Chaitny Colony, Amravati (Maharashtra)

**NOTICE**

WHEREAS the complaint above-mentioned has been filed in the Amravati by the Complainant above named (copy whereof is enclosed)

AND WHEREAS the Petition came up for admission hearing on 27.03.2026, and the same was admitted and the court has directed to issue notice to the opposite party(s). (Copy of Order is Enclosed).

ow, Therefore, TAKE NOTICE THAT THE matter above mentioned will be listed for directions/hearing before the Amravati on **12.05.2026** at **10.30** A.M.

NOW, THEREFORE, TAKE FURTHER NOTICE that you may file your version of the case with affidavit duly signed in three sets and enter appearance in person or through/counsel/agent within thirty days from the date of receipt of this Notice.

A copy of your version of the case be served on the Complainant at the address given hereunder and proof of service thereof is to be filed in the Registry at the time of filing your version. The reply of the complaint be filed online at https://e-jagriti.gov.in portal and also to the complainant's counsel via email, additionally.

TAKE FURTHER NOTICE that in default of your apearance the matter will be heard and determined ex-parte.

Dated Amravati, on this 30 March 2026

शिक्का — **Sd/- REGISTRAR**

---

## जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकाराने **श्रीमती संजिदा मो.अशरफ सिद्दीकी आणि श्रीमती रहिसा मो.अंनजार सिद्दीकी** रा.चपराशीपुरा, कॅम्प अमरावती, ता.जि.अमरावती यांचे मालकीची शेत जमीन मौजा जळका शेत सर्व्हे नंबर १८६ क्षेत्र ०४ हे.२० आर, प्रगणे नांदगाव पेठ, ही विकत घेण्याचा सौदा केला आहे. तरी या शेतजमिनीवर कोणास हक्क, कर्ज, बक्षीस, गहाण, बँक कर्ज इत्यादी सांगावयाचे असल्यास त्यांनी ही जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आम्हाला न चुकता कळविण्यात यावे. उक्त मुदतीत तकार किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास कुणाचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन सदरहू शेताची खरेदी करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कोणताही उजर ऐकला जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - अमरावती
दिनांक - ६ मे, २०२६

(ॲड.दिपक मा.आंबलकर)
मो.७०२०३९८८८१

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८८४/२०२६
**मंजुबाई व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२०.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Smt.Manjubai Wd/o Nandkishor Gaurihar, Age 65 Yrs. Occu.: Household
2. Ranjit S/o Nandkishor Gaurihar Age 40 Yrs. Occu.: Labour
3. Indrajit S/o Nandkishor Gaurihar, Age 31 Yrs. Occu.: Labour
   All R/o Salora Bk. Po.Nandura Bk. Tq.Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **नंदकिशोर रामप्रसाद गौरीहर** हे दिनांक 12.01.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **मंजुबाई व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मंजुबाई व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक**, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

**मा.सह दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.१४२/२०२६ — ने.ता.१०.०६.२०२६

अर्जदार :
१. आशा रामराव निंघोट, रा.राजना पो.काजना, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. संदीप रामराव निंघोट, रा.राजना पो.काजना, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावता
३. अतुल रामराव निंघोट, रा.राजना पो.काजना, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावता
४. संध्या दिगांबर बारखडे, रा.अंतरगांव ईटकी, ता.दर्यापूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी मयत **रामराव शामराव निंघोट** यांचा मृत्यू दि.**०१.०८.२०२२** रोजी राजना, पो.काजना ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला.अ.नं.१ मयताची पत्नी असून अ.नं.२ व ३ ही मुले आहेत व अर्जदार नं.४ ही मुलगी आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२ मे, २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक**, दिवाणी व फौजदारी न्यायालय नांदगाव खंडेश्वर

---

**वि.दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,**
कि.दि.अ.क्र.१५२/२०२६ — ने.ता.११.०६.२०२६

अर्जदार :
१. केसरीमल नेहमीचंद जैन (पती) वय ७८ वर्षे, व्यवसाय - शेती
२. मनोज केसरीमल जैन (मुलगा), वय ५३ वर्षे, व्यवसाय - शेती
३. अश्विन केसरीमल जैन (मुलगा), वय ४३ वर्षे, व्यवसाय - शेती
   अ.नं.१ ते ३ रा.नांदसावंगी, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती
४. अर्चना अनिल जैन (मुलगी), वय ४८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी रा.आलेगांव, ता.जि.अकोला
५. अलका संतोषकुमार जोगद जैन (मुलगी), वय ४६ वर्षे, व्यवसाय - गृहिणी रा.लोणार, ता.लोणार, जि.बुलढाणा
६. रिता अतिषकुमार गुगलीया (मुलगी) वय ४५ वर्षे, व्यवसाय - गृहिणी रा.मुंडनिशांकराव, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी वरील नमुद अर्जदारांनी या न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन अधिनियम (८) १८२७ चे कलम २** अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज सादर केला आहे की, अर्जदार नं.१ यांची पत्नी व अर्जदार नं.२ ते ६ यांची आई स्व.सुशिला केसरीमल जैन, रा.नांदसावंगी, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती या दिनांक ०५.०१.२०२५ रोजी मरण पावल्या. तसेच अर्जदारांनी नमुद केल्याप्रमाणे मृतकांच्या पश्चात वरील अर्जदार हेच त्यांचे कायदेशीरवारस असून त्यांना वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे.

म्हणून, या न्यायालयात जो कोणी व्यक्ती वरील वारस प्रमाणपत्र देण्यास हरकत घेऊ इच्छित असेल, त्याने आपल्या हरकती दिनांक ११.०६.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात स्वतः हजर राहून किंवा योग्य वकीलामार्फत लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा कोणतीही हरकत नसल्याचे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदर जाहीरनामा दिनांक ०५.०५.२०२६ रोजी दिला आहे.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक**, दिवाणी न्यायालय (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर

---

**DISTRICT CONSUMER DISPUTED REDRESSAL COMMISSION, AMRAVATI**
Under the Consumer Protection Act, 2019

Telephone No.: 0721-2662158 — AT BEHIND CIRCUIT HOUSE
Email : confo-am-mh@nic.in — OLD BYPASS ROAD, JAIL ROAD,
Website : — CAMP, DIST. AMRAVATI (M.S)

**CONSUMER CASE NO.DC/468/CC/208/2024**

Shri Vasudev Pralhad Patil ... Petitioner/Appellant
- Versus -
M/s Aasha Builders & Developers & 2 ... Opposite Party/ Respondent(s)

Opposite Party / Respondent Name :
1. M/s Aasha Builders and Developers & 2
Through its partner Sanjay Vaikunthrao Varhade,
R/o C/o Ashok Ijalkar, Shanti Nagar, Old Bypass Road,
Chaitny Colony, Amravati (Maharashtra)

**NOTICE**

WHEREAS the complaint above-mentioned has been filed in the Amravati by the Complainant above named (copy whereof is enclosed)

AND WHEREAS the Petition came up for admission hearing on 27.03.2026, and the same was admitted and the court has directed to issue notice to the opposite party(s). (Copy of Order is Enclosed).

ow, Therefore, TAKE NOTICE THAT THE matter above mentioned will be listed for directions/hearing before the Amravati on **12.05.2026** at **10.30** A.M.

NOW, THEREFORE, TAKE FURTHER NOTICE that you may file your version of the case with affidavit duly signed in three sets and enter appearance in person or through/counsel/agent within thirty days from the date of receipt of this Notice.

A copy of your version of the case be served on the Complainant at the address given hereunder and proof of service thereof is to be filed in the Registry at the time of filing your version. The reply of the complaint be filed online at https://e-jagriti.gov.in portal and also to the complainant's counsel via email, additionally.

TAKE FURTHER NOTICE that in default of your apearance the matter will be heard and determined ex-parte.

Dated Amravati, on this 30 March 2026

शिक्का — **Sd/- REGISTRAR**

---

**DISTRICT CONSUMER DISPUTED REDRESSAL COMMISSION, AMRAVATI**
Under the Consumer Protection Act, 2019

Telephone No.: 0721-2662158 — AT BEHIND CIRCUIT HOUSE
Email : confo-am-mh@nic.in — OLD BYPASS ROAD, JAIL ROAD,
Website : — CAMP, DIST. AMRAVATI (M.S)

**CONSUMER CASE NO.DC/468/CC/209/2024**

Shri Mangesh Wasudeorao Maldhure ... Petitioner/Appellant
- Versus -
M/s Aasha Builders & Developers & 2 ... Opposite Party/ Respondent(s)

Opposite Party / Respondent Name :
1. M/s Aasha Builders and Developers & 2
Through its partner Sanjay Vaikunthrao Varhade,
R/o C/o Ashok Ijalkar, Shanti Nagar, Old Bypass Road,
Chaitny Colony, Amravati (Maharashtra)

**NOTICE**

WHEREAS the complaint above-mentioned has been filed in the Amravati by the Complainant above named (copy whereof is enclosed)

AND WHEREAS the Petition came up for admission hearing on 27.03.2026, and the same was admitted and the court has directed to issue notice to the opposite party(s). (Copy of Order is Enclosed).

ow, Therefore, TAKE NOTICE THAT THE matter above mentioned will be listed for directions/hearing before the Amravati on 12.05.2026 at 10.30 A.M.

NOW, THEREFORE, TAKE FURTHER NOTICE that you may file your version of the case with affidavit duly signed in three sets and enter appearance in person or through/counsel/agent within thirty days from the date of receipt of this Notice.

A copy of your version of the case be served on t h e Complainant at the address given hereunder and proof of service thereof is to be filed in the Registry at the time of filing your version. The reply of the complaint be filed online at https://e-jagriti.gov.in portal and also to the complainant's counsel via email, additionally.

TAKE FURTHER NOTICE that in default of your apearance the matter will be heard and determined ex-parte.

Dated Amravati, on this 30 March 2026

शिक्का — **Sd/- REGISTRAR**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७६१/२०२६
**शकुंतला अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.१२.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Shakuntala Vijaynarayan Laddha, Age 83 Yrs. Occu.: Household
2. Manish Vijaynarayan Laddha, Age 57 Yrs. Occu.: Business
   Both R/o Dhanraj Line, Sakkarsath, Amravati.
3. Sapna Viren Maheshwari, Age 55 Yrs. Occu.: Household R/o 8, Anjana Apartment, BSNL, Bill Center Manager, Ahmadabad
4. Krishna Manish Sawal, Age 52 Yrs. Occu.: Household R/o Shivaji Nagar, Shankar Nagar,, Nagpur

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Vijaynarayan Hargovindji Laddha हे दिनांक 29.04.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Shakuntala Vijaynarayan Laddha + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Shakuntala Vijaynarayan Laddha + 3 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक**, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

## जाहीर नोटीस

आम जनतेला सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी खालील वर्णनांकित मालमत्ता १) जयवंती प्रभाकर प्रधान, २) संजय प्रभाकर प्रधान, ३) गजानन प्रभाकर प्रधान व ४) अजय प्रभाकर प्रधान, क्र.रा.वडाळी कॅम्प, १४ नं.मनपा शाळेजवळ, वडाळी, बस स्टॅण्ड अमरावती यांचेकडून माझे पक्षकाराने खरेदी करण्याचा सौदा केला आहे. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे--

**मालमत्तेचे वर्णन -** मौजे-रहाटगांव, प्रगणे- नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती शेत सर्व्हे नं.२२/२-अ व २२/३, एन.ए.पी.३४/रहाटगांव/१२२/२००१-०२ नि.ता.२३.०५.२००३ चे लेआऊट कन्व्हर्शन मंजूर व सहायक नगर रचना अमरावती अधिकारी मनपा अमरावती यांचे कार्यालय पत्र क्र.अमनपा/संसनर/अभि ५३/दिनांक १३.०६.२००२ नुसार मंजूर नकाशाप्रमाणे मंजूर लेआऊट प्लॉट क्र.४४ ए याची साईज मंजूर नकाशाप्रमाणे १० मी. X १७ मी. असून एकुण क्षेत्रफळ एरिया १७० चौ.मी. (१८२९.२० चौ.फुट) आहे. लेआऊट प्लॉट क्र.४४-ए ची चतुःसिमा -- पुर्वेस प्लॉट क्र.४३, पश्चिमेस - प्लॉट क्र.४४-बी, उत्तरेस - लेआऊटमधील रोड, दक्षिणेस - दुसऱ्याचे लेआऊट व नाला

वरील नमुद मिळकत ही सामाईक मिळकत असून ती क्र.१ ते ४ यांच्या नावे वारस हक्काने आलेली आहे. त्यांचे वडील मयत **प्रभाकरराव गोपाळराव प्रधान** यांचा मृत्यू दिनांक ०६.११.२०१९ रोजी झाला. त्यांनी सदर मिळकत खरेदीखताद्वारे दस्त क्र.१९१४/२००३ दिनांक १६.०६.२००३ रोजी विकत घेतली होती. व त्यांच्या मृत्यूनंतर क्र.१ ते ४ यांना कायदेशीररित्या वारस हक्काने प्राप्त झालेली आहे. तरी माझे पक्षकार शेषराव देवराम मोहुर्ले, रा.राधाकृष्ण नगर, नागपूर यांनी क्र.१ ते ४ यांच्यासोबत खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे.

तसेच सदरच्या मालमत्तेवर कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क किंवा हितसंबंध अथवा कोणाचाही आक्षेप किंवा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हितसंबंध असल्यास सदरच्या जाहीरनामा प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क करावा. अन्यथा त्यानंतर कोणाचाही उजर चालणार नाही करीता सदरचा जाहीरनामा.

अमरावती
**दिनांक** /०५/२०२६

(ॲड.मंगेश बी.तिडके)
मो.९३२६४४९२४९

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८४८/२०२६
**रमाबाई व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२५.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Smt.Ramabai Sureshrao Adakane
   Age 49 Yrs. Occu.: Household
   R/o V.M.V.Road, Kathora Naka, Navsari Mahatma Fule Nagar, V.M.V. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सुरेश तुळशिरामजी अडकणे** हे दिनांक 19.01.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रमाबाई विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रमाबाई विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक**, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८७८/२०२६
**सुधीर व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०९.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Sudhir S/o Baburao Manjre, Age 74 Yrs. Occu.: Retired R/o 10, Shriram Nagar, Amravati.
2. Pradip S/o Baburao Manjre, Age 72 Yrs. Occu.: Advocate R/o 10, Shriram Nagar, Amravati.
3. Smt.Rekha W/o Ulhas Betole, Age 70 Yrs. Occu.: Household R/o Flat No.401, 4th Floor, Atharva Regency Opp.NMC Office Laxmi Nagar Nagpur
4. Nitin S/o Baburao Manjre, Age 63 Yrs. Occu.: H.R. R/o Khadki Cantonment Flat No.5, 1st Floor, E-Building Sappers Line Bazar Khadki Gandham Nagar, Phase Pune.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **निर्मा बाबुराव मांजरे** हे दिनांक 02.02.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुधीर व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुधीर व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०५.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक**, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८७९/२०२६
**शोभा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२५.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Shobha Vasantappa Ganthade, Age 65 Yrs. Occu.: Household
2. Parag Vasantappa Ganthade, Age 42 Yrs. Occu.: Business
3. Shital Vasantappa Ganthade, Age 45 Yrs. Occu.: Service
   All R/o 205, Om Shri Apartment, Near Datt Mandir Budhwara,Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **वसंतअप्पा रामचंद्रप्पा गानधाडे** हे दिनांक 10.02.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शोभा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शोभाव ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक**, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७८७/२०२६
**श्रीमती शोभा अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.०९.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Smt.Shobha Manohar Lonare, Age 67 Yrs. Occu.: Housewife
2. Satish Manohar Lonare, Age 44 Yrs. Occu.: Business
3. Ravi Manohar Lonare, Age 43 Yrs. Occu.: Business
4. Narendra Manohar Lonare, Age 42 Yrs. Occu.: Business
5. Sau.Priti Nitin Mahulkar, Age 41 Yrs. Occu.: Housewife
   All 1 to 5 R/o Near Durga Mata Mandir, Belpura, Rukhmini Nagar, Amravati-444606

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मनोहर अंबादासजी लोणारे** हे दिनांक 22.10.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शोभा अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शोभा अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०५.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक**, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७८६/२०२६
**राजकन्या अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.०९.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Smt.Rajkanya Chhannuji Dongare, Age 77 Yrs. Occu.: Housewife
2. Vijay Chhannuji Dongare, Age 47 Yrs. Occu.: Labour
3. Nikesh Chhannuji Dongare, Age 36 Yrs. Occu.: Labour
4. Su.Sulochana Devanand Wankhade, Age 43 Yrs. Occu.: Housewife
   All 1 to 4 R/o Near Choube Bichayat Kendra, Sanjay Gandhi Nagar,Amt.
5. Sau.Sonu Anil Thomare, Age 40 Yrs. Occu.: Housewife R/o Asatpur, Tq.Dist.Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Chhannuji Pannuji Dongare हे दिनांक 25.11.2016 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Rajkanya Chhannuji Dongare + 4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Rajkanya Chhannuji Dongare + 4 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक**, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २३८
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अमरावतीत कंत्राटदारांचे बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू

## १८.८१ कोटींचे देयक प्रलंबित

**अमरावती/का.प्र.**


मजीप्रा जलव्यवस्थापन विभाग, अमरावती कार्यालयासमोर कंत्राटदारांनी आज, दि. ६ मे २०२६ पासून बेमुदत ठिय्या आंदोलनाला सुरुवात केली आहे. सन २०२४-२५ मधील ३.५० कोटी रुपये आणि सन २०२५-२६ मधील १५.३१ कोटी रुपये अशी एकूण १८.८१ कोटी रुपयांची देयके अद्याप प्रलंबित असल्याने कंत्राटदारांची आर्थिक परिस्थिती गंभीर झाली आहे.

कंत्राटदारांच्या म्हणण्यानुसार, प्रलंबित निधीची मागणी मुंबई येथील मध्यवर्ती कार्यालयाकडे प्रलंबित आहे. या पार्श्वभूमीवर १ एप्रिल २०२६ पासून पाणीपुरवठ्याची कामे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, एप्रिल महिन्यात निधी वितरित केला जाईल, असे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेऊन कामे सुरू ठेवण्यात आली.त्यानंतर १५ एप्रिलपर्यंत देयके अदा करण्याची मागणी करण्यात आली होती. तसेच, मुंबईतील बैठकीत संचालक (वित्त) यांनी ८ ते १० दिवसांत निधी वितरित करण्याचे आश्वासन दिले होते.

मात्र एप्रिल महिना संपूनही देयकांची अदायगी न झाल्याने कंत्राटदारांनी पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.या आंदोलनात अमरावती जिल्हा जीवन प्राधिकरण कंत्राटदार असोसिएशनचे अध्यक्ष नितीन काळे, उपाध्यक्ष संजय सिंह, सचिव अनिल भटकर आणि मार्गदर्शक धनंजय बंड यांच्यासह इतर सदस्य सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.कंत्राटदारांनी इशारा दिला आहे की, प्रलंबित देयके तात्काळ अदा न केल्यास पाणीपुरवठा कामांवर परिणाम होऊ शकतो. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी त्यांनी केली आहे.



## संक्षिप्त



### विद्यानिकेतनचा उच्च माध्यमिकचा निकाल ९६.७० टक्के

**कुऱ्हा-**इयत्ता १२ वि विज्ञान परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या मध्ये व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ़ हायर एज्युकेशन नागपुर, द्वारा संचालित विद्यानिकेतन व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय कुऱ्हा येथील १२ वि च्या विद्यार्थ्यांनी प्रविण्यासह यश संपादन केले. सोबतच विद्यालय चा ९६.७० ℅ निकाल जाहिर झाला यात प्राविण्यासह यश प्राप्त करणारे विद्यार्थी प्रथम क्रमांक समृद्धी संजय कुऱ्हाडे द्वितीय क्रमांक नम्रता सुनील कुऱ्हाडे,तृतीय क्रमांक मेराज खान अयाज खान,चतुर्थ क्रमांक गायत्री इखार व अश्विनी इखार या १२ वि विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्तमगुणांकन प्राप्त केले. नेत्रदिपक यश संपादन करणाऱ्या विद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनदंन प्रकाश मक्रमपुरे पालक संचालक विद्यानिकेतन कुऱ्हा तथा सहकार्यवाह व्हिएसपिएम नागपुर व मुख्याद्यपिका तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## महावितरण अमरावती परिमंडळाची उल्लेखनीय कामगिरी

# ४१ हजार ६९० नवीन वीज जोडण्या, वितरण हानीतही घट

**अमरावती/का.प्र.**

महावितरणच्या अमरावती परिमंडळाने मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक वर्ष २०२४- २५ च्या तुलनेत वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. वीज जोडण्या देणे, वितरण हानी कमी करणे आणि शंभर टक्के वीजबिल वसुली या महत्त्वाच्या निकषांवर उत्कृष्ट कामगिरी केली आहे. एवढेच नाही तर मार्च २०२५ च्या थकबाकीपेक्षा मार्च २०२६ ची थकबाकी कमी करणाऱ्या राज्यातील तीन परिमंडळापैकी अमरावती परिमंडळ एक असून ही अभिमानाची बाब आहे.

ग्राहकाभिमुख उपक्रमांतर्गत अमरावती परिमंडळात कृतिमानकांनुसार ४१ हजार ६९० नवीन वीज जोडण्या देण्यात आल्या. ही संख्या गेल्या वर्षाच्या तुलनेत १४ हजार ९४६ ने अधिक आहे. पीएम सूर्यघर मोफत योजनेअंतर्गत ३१ हजार ३७५ ग्राहकांच्या घरांच्या छतांवर सौर यंत्रणा बसविण्यात आली असून, मागील वर्षी ही संख्या १२ हजार ५२७ होती. तांत्रिक सुधारणा राबविताना तांत्रिक व वाणिज्यिक हानीत ८.५४ टक्क्यांनी घट झाली असून ती सध्या २१.२६ टक्क्यांवर आली आहे. वितरण हानीतही ०.७० टक्क्यांची घट झाली आहे. वीज चोरी रोखाण्यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेत ६,४२२ प्रकरणे उघडकीस आणण्यात आली असून त्यातून २० कोटी ७५ लाख रूपयाचे दंड लावण्यात आले आहे. परिमंडळाने गेल्या वर्षभरात १०० टक्के वीजबिल वसुली साध्य करत मार्च २०२५ मधील थकीत बिलांमधून १९ लाख रुपयांची घट केली. बिलिंग कार्यक्षमतेत ३ टक्क्यांची वाढ झाली असून महसूल कार्यक्षमता १०० टक्क्यांवर पोहोचली आहे. सध्या बिलिंग कार्यक्षमता ८६ टक्के आहे.तसेच, निरूपयोगी साहित्याच्या लिलावातून २.५१ कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळविण्यात परिमंडळाला यश आले आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला गती देत ३१३ मेगावॅट क्षमतेचे ७० सौर प्रकल्प उभारण्यात आले असून, त्यामुळे परिमंडळातील सुमारे ६० टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होऊ लागली आहे. त्याचबरोबर परिमंडळात ४ लाख १९ हजार ५४६ मीटर लावण्यात आले असून आगामी काळातही अनेक ग्राहकाभिमूख बदल होणार असल्याचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी वर्षपूर्तीनिमित्त स्पष्ट केले.



## 'बी.ए.' विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत उच्च न्यायालयाचा निर्णय!

**अमरावती/क्रा.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील बी.ए. भाग-२ (सत्र ४) च्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येते की, मराठी साहित्य विषयातील 'कादंबरी' या प्रकारांतर्गत अभ्यासासाठी असलेल्या दोन कादंबऱ्यांबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निकाल दिला असून, विद्यापीठाने त्याबाबतची अधिसूचना क्र. ६६/२०२६, दि. ५ मे, २०२६ जाहीर केली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, बी.ए. भाग-२, सत्र ४ (मराठी साहित्य-मेजर-५) मधील विद्यार्थ्यांना आता 'ते पन्नास दिवस' किंवा 'धग' या दोन कादंबऱ्यांपैकी एकाची निवड करण्याची मुभा देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेचा अर्ज भरताना जो पर्याय निवडला असेल, त्यानुसारच त्यांची परीक्षा घेतली जाईल. विद्यार्थ्यांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या पर्यायानुसार 'ते पन्नास दिवस' किंवा 'धग' यापैकी एका कादंबरीवर आधारित प्रश्नांची उत्तरे देता येतील. हा निर्णय केवळ शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी लागू असणार आहे. हा बदल रिट याचिका क्रमांक ३०२८/२०२६ मधील उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी म्हणून करण्यात आला आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ.अविनाश असनारे यांनी अधिसूचनेव्दारे कळविले आहे.

# शेकडो विद्यार्थी व प्रवासी एसटी महामंडळाच्या कार्यालयावर धडकले

## बस सेवा बंद: नागरिक, विद्यार्थी त्रस्त




**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

येथे गेल्या अनेक वर्षांपासून अमरावती-टाकरखेडा रामा मार्गावर नियमितपणे धावणारी बस सेवा गेल्या काही दिवसांपासून अचानक बंद झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. विशेषतः डेली वेजेसवर कामासाठी जाणारे कामगार, तसेच शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. याची दखल घेत उपसरपंच प्रदीप शेंडे यांच्या नेतृत्वात विद्यार्थी व प्रवासी एस टी महामंडळाच्या कार्यालयावर धडकले यावेळी विभाग नियंत्रण यांना निवेदन देण्यात आले.

अमरावतीहून पहाटे पाच वाजता सुटणारी बस ही कामगार आणि विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची होती. मात्र, ही बस तसेच आणखी एक बस सेवा बंद झाल्याने प्रवाशांचे हाल वाढले आहेत. वेळेवर कामावर पोहोचणे कठीण झाले असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही परिणाम होत आहे.स्थानिक नागरिकांनी प्रशासन आणि संबंधित परिवहन विभागाने तातडीने दखल घेऊन ही बस सेवा पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.दरम्यान, बस सेवा बंद होण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, त्यामुळे टाकरखेडा संभू च्या नावाने स्वतंत्र बस सेवा सुरू करण्यात यावी अशी मागणी देखील यावेळी रेटण्यात आली कारण साऊंर ला जाणारी बस टाकरखेडा संभु येथे थांबत नसल्याने विद्यार्थी व त्यांची मोठी गैरसोय होत आहे ,प्रशासनाने याबाबत लवकरात लवकर स्पष्टीकरण देण्याची गरज व्यक्त होत आहे. याकरिता विद्यार्थी व प्रवासी प्रदीप शेंडे यांच्या नेतृत्वात विभाग नियंत्रक यांच्या कार्यालयावर धडकले होते यावेळी त्यांच्याशी सकारात्मक चर्चा करण्यात आली यावेळी साऊर व टाकरखेडा संभु येथील विद्यार्थी उपस्थित होते.

> टाकरखेडा रामा मार्गावर नियमितपणे धावणारी बस सेवा गेल्या काही दिवसापासून अचानक बंद झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे तसेच नागरिकांची गैरसोय होत आहे टाकरखेडा शंभू या गावाकरिता स्पेशल बस सेवा सुरू करण्यात यावी अशी मागणी यांनी केली आहे.
>
> **प्रदीप शेंडे**, उपसरपंच

> साऊर वरून येणारी बस टाकरखेडा संभू येथे थांबत नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे त्याकरिता प्रशासनाने आणि एसटी महामंडळाने त्यावर सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी विद्यार्थ्यांनी केलेली आहे.
>
> **ऋषिकेश तायडे**

# शर्वरीची एन.एम.एम.एस.परीक्षेत यशस्वी झेप



**कुऱ्हा-**श्री. गणेशदास राठी छात्रालय समिती अमरावती द्वारा संचालित तनसुखदास राठी विद्यालय वऱ्हा येथे केंद्र सरकार पुरस्कृत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्या करिता दरवर्षी डिसेंबर महिन्यात राष्ट्रीय शोध संवर्धन शिष्यवृत्ती म्हणजेच एन.एम.एम.एस. परीक्षेचे आयोजन देशपातळीवर करण्यात येते.यावर्षी विद्यालयातील अनेक विध्यार्थी या अंत्यत महत्वाच्या व स्पर्धात्मक परीक्षे करिता प्रविष्ट झाले होते. त्यापैकी शर्वरी अमोल बांडाबुचे वर्ग ८ अ हिने आपल्या कष्टाच्या आणि जिद्दीच्या जोरावर शिष्यवृत्ती साठी पात्र ठरवून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय पाचंगे यांच्या हस्ते तिचा यथोचित सत्कार करण्यात आला.शैक्षणिक क्षेत्रातील अंत्यत कठीण समजल्या जाणाऱ्या या परीक्षेतील यशस्वी वाटचालीकरिता तिचे गणेशदास राठी छात्रालय समिती अमरावतीचे अध्यक्ष वसंतकुमारजी मालपाणी, संस्थेचे उपाध्यक्ष जुगलकिशोरजी गट्टाणी, संस्थेचे सचिव डॉ. गोविंदजी लाहोटी संस्थेचे कोष्याध्यक्ष प्रकाशजी हेडा तसेच संस्थेचे सहसचिव तथा तनसुखदास राठी विद्यालय वऱ्हा शाळा समिती अध्यक्ष मोहनबाबू कलंत्री व प्रशासकीय अधिकारी आभा लाहोटी यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक,शिक्षिका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी तिला उज्वल शैक्षणिक भविष्याच्या वाटचालीस अंनत शुभेच्छा प्रदान करून तिचे कौतुक केले.

# बुद्ध तत्त्वज्ञान म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे, अज्ञानातून विज्ञानाकडे-नंदकुमार चिंचखेडे




**शिराळा-**येथील बाजार चौकामध्ये बुद्ध जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.बुध्दाच्या पुर्णाकृती पुतळ्याचे सौंदर्यीकरण आणि लोकार्पण सोहळ्यानिमित्त शिराळा येथे बुद्ध जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती मिंलिद तायडे हे लाभले होते. तर प्रमुख वक्ते म्हणून नंदकुमार चिंचखेडे, अँड महिंद्र तायडे, मंगेश नाईक हे उपस्थित होते. २५८९ वी बुद्ध जयंतीच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलताना प्रमुख वक्तांनी आपले विचार व्यक्त केले.यावेळी बोलताना नंदकुमार चिंचखेडे म्हणाले की जगाच्या पाठीवर बुद्ध हा असा धर्म संस्थापक होवुन गेला ज्यांनी मानवाला अज्ञानातुन विज्ञानाकडे जावुन स्वयंप्रकाशीत होण्याचा आणि स्वताच स्वतःचे मार्गदर्शक होण्याचा उपदेश दिला. जिवनातील सर्व दुःखाचे कारण अज्ञात असुन तृष्णे पासून सर्व दुःख निर्माण होते.म्हणुन मनावर संयम ठेवून संम्यक विचारांचा स्वीकार करा असा उपदेश नंदकुमार चिंचखेडे यांनी दिला. यावेळी नंदकुमार चिंचखेडे यांनी आपले विचार व्यक्त केले. मंचकावर माजी उपसरपंच रुपरावजी तायडे, डॉ मुकुंदराव ढोणे, प्रकाश अजमिरे, आदी मान्यवर उपस्थित होते. कार्येक्रमाला शेकडो उपासक उपासिका, आबालवृद्ध उपस्थित होते. कार्येक्रमाचे संचालन रुपाली बोरकर तर आभारप्रदर्शन संतोष डोंगरे यांनी केले.

# या.द.व. देशमुख महाविद्यालयामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




**तिवसा-**या.द.व. देशमुख कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी १२ वी बोर्ड परीक्षेत उत्तुंग यश संपादन केले आहे. वाणिज्य शाखेचा निकाल याही वर्षी १००% लागला असून कला शाखेचा निकाल ९०.००% टक्के लागला. महाविद्यालयाचा एकत्रित निकाल ९५.७३ % लागला आहे. वाणिज्य शाखेमधून तनुजा नंदकुमार ढोरे हिने ८४.८३% गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळविला. तन्वी प्रकाश दौड हिने ७५.५०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकाविला. डिंपल किरण भागडे यांनी ७५.००% गुण मिळवून तिसरा क्रमांक कमाविला.कला शाखेमधून अनुराग भवनदास गाडगे यांनी ७८.६७% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. हर्षदा सुरेंद्रराव चामट हिने ७५.५०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकाविला तर हरीओम किशोर कामलकर यांने ६९.३३% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह महाविद्यालयाच्या वतीने रोख पारितोषिक, पुष्पगुच्छ आणि मिठाई देऊन सत्कार करण्यात आला तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख, अतुल देशमुख गट समन्वयक, पंचायत समिती तिवसा,कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. योगेश देशमुख तसेच प्रा. गौरी गनोरकर प्रा. वृषाली जगताप प्रा. खुशबू कुथे, प्रा. पूजा भोयर, प्रा. राजकुमार तिडके, प्रा. भरत गोंजारे आणि वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# धनश्री थोरात तालुक्यात प्रथम



**नांदगाव खंडेश्वर-**येथील वाय. ई. एस. इंग्लिश स्कूल व जुनिअर कॉलेज येथील विद्यार्थ्यांनी बारावी परीक्षेत घवघवीत यश संपादन करून शाळेच्या उज्ज्वल परंपरेस यंदाही कायम ठेवले आहे. शाळेचा एकूण निकाल ९८.६६ टक्के लागला आहे.यंदाच्या बारावी परीक्षेत धनश्री प्रदीप थोरात हिने ९१.१७% गुण मिळवून खंडेश्वर तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. शाळेतून द्वितीय क्रमांक रुद्राशू गोपाल पिंपळकर-७४.००%,तृतीय क्रमांक आदित्य जनार्धन उघडे -७१.६७%, हिमाणी जितेंद्र हुमणे- ७१.३३%, तन्वी अशोकराव रूमणे-७१.३३%, विद्यार्थ्यांच्या या उत्कृष्ट यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, सचिव, प्राचार्य आणि सर्व शिक्षकवृंद यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# रामकृष्ण कनिष्ठ महाविद्यालयात उज्वल यशाची परंपरा कायम



**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात आलेल्या एचएससी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित रामकृष्ण कनिष्ठ महाविद्यालय, दारापूर ने सातत्यपूर्ण गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या जिद्दिच्या जोरावर कनिष्ठ महाविद्यालयाने आपल्या उज्ज्वल निकालाची परंपरेला यंदाही साजेशी अशीच भर घातली आहे. परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करत यशाची परंपरा कायम ठेवली आहे. ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ओळख असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा एकूण निकाल ९७ टक्के लागला असून विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के, कला शाखेचा निकाल ९१ टक्के, वाणिज्य शाखेचा निकाल ९८ टक्के तर एचएसव्हीसी शाखेचा निकाल हा ९४ टक्के लागला आहे.


विज्ञान शाखेतून मिनल अशोकराव बगाडे व स्वरारी मोहन ढगे यांनी ७२.६७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक, शिवम गजानन सगणे ह्याने ६८.६७ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक पटकाविला. कला शाखेतून चैताली गोपाळ लोखंडे हिने ६८ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक, आचल सोळंके हिने ६७.१७ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक तर सावरी लखन पवार हिने ६२ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकाविला. वाणिज्य शाखेतून सलोनी अतुल पेढेकर हिने ७६.६७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक,राधिका शहाकार हिने ६९ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक तर ज्ञानेश्वरी बढे हिने ६३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकाविला. तसचे एचएसव्हीसी शाखेतील ईलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी मधून रोहीत गौतम दामले याने ७१ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकाविला असून ऑटो मोबाईल टेक्नॉलॉजी मधून अंकुश ठाकरे याने ६४.६७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा कनिष्ठ महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीत पार पडतला. गुणवंत विद्यार्थ्यांसमवेत त्यांच्या पालकांचा सुध्दा सत्कार करण्यात आला. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या वर्षा भगवंतराव मोरशे संयुक्त विभागातील प्रा. डॉ. कुणाल झोटींग, प्रा. डॉ. अनिल भूरके, प्रा. विवेक ढोके, प्रा. अमित मूळे, प्रा. डॉ.वंदना धांडे विज्ञान विभागातील प्रा. अविनाश कोरडे, प्रा.वैशाला कडू, प्रा. प्रतिभा रघुवंशी, प्रा. रिना भडके, प्रा. अमित वानखडे एचएसव्हीसी विभागातील प्रा. राजेश्वर संत, प्रा.श्यामकांत केचे, प्रा. सुजित देशमुख, प्रा. राजेश बोराडे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी वाघ, खोब्रागड, बेलसरे, सोनोने यांनी गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार करुन भरभरुन कौतुक केले व पुढील आयुष्यासाठी मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावतीच्या संस्थापक अध्यक्षा कमलताई गवई, अध्यक्षा किता राजेशजी अर्जुन, सचिव प्राचार्य डॉ. कमलाकर पायस, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा. डॉ. सचिन पंडीत तसेच सर्व संचालक मंडळ यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करुन अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकीतील कौशल शेळकेची TUM जर्मनी व IIT बॉम्बेच्या संयुक्त इंटर्नशिप करिता निवड

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील तृतीय वर्ष मेकॅनिकल अभियांत्रिकी शाखेचा विद्यार्थी कौशल एस. शेळके याची जर्मनीतील Technical University of Munich (TUM) आणि Indian Institute of Technology Bombay यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे.'ग्रामीण भागातील निवासी शाळा कॅम्पसमध्ये ऊर्जा निर्मिती आणि वापराच्या परिस्थितीचा अभ्यास' (Understanding the Energy Generation and Utilisation Scenario for Residential School Campus in Rural Area) या विषयावर तो काम करणार आहे. या इंटर्नशिपसाठी देशभरातून सुमारे ९००० अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी केवळ १५ विद्यार्थ्यांची मुलाखतीसाठी निवड करण्यात आली आणि अंतिमतः फक्त ५ विद्यार्थ्यांना संधी देण्यात आली. यंत्र अभियांत्रिकी शाखेतून एकट्या कौशल चीच निवड झाली आहे.या अत्यंत स्पर्धात्मक प्रक्रियेत कौशल शेळके यांनी आपले स्थान पक्के करत महाविद्यालयासह आपल्या पालकांचेही नाव उंचावले आहे.ही इंटर्नशिप TUM-IITB-SEED Centre मार्फत दिली जात असून, हा उपक्रम Indian Institute of Technology Bombay आणि Technical University of Munich (जर्मनी) यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येतो. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन आणि प्रत्यक्ष प्रकल्पांवर काम करण्याची संधी मिळते.



कौशल यांच्या या यशाबद्दल महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण असून, शिक्षक व विद्यार्थ्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# अकोटात 'बेनामी' खाणसाम्राज्य : प्रशासनाचे आंधळेपण की संगनमत ?

## -आदिवासींच्या नावावर कोट्यवधींचा व्यवहार, नफ्याचा ताबा मात्र बाह्य घटकांकडे

**-परवानगीशिवाय बाँडवर भाडेपट्टे, करारनामे ; रॉयल्टी, परवाने आणि बँक व्यवहार**

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील गाजीपूर–रुदाळी परिसरात उघडकीस आलेल्या कथित 'बेनामी' खाणसाखळी प्रकरणाने आता गंभीर आर्थिक गैरव्यवहाराचे रूप धारण केले असून, आदिवासींच्या नावावर सुरू असलेल्या गौण खनिज उत्खननाच्या आड कोट्यवधी रुपयांची उलाढाल बाह्य घटकांकडे वळवली जात असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. जमीन, परवाने आणि रॉयल्टी आदिवासींच्या नावावर असताना प्रत्यक्ष उत्खनन, गुंतवणूक आणि नफा यांवर गैर आदिवासी घटकांचे नियंत्रण असल्याचा आरोप अधिक तीव्र होत आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील कलम ३६ मधील तरतुदींनुसार आदिवासी जमिनींचा वापर किंवा हस्तांतरण करण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी आवश्यक असताना, अनेक ठिकाणी केवळ बाँडवर भाडेपट्टे व करारनामे करून उद्योग उभारले गेल्याचे समोर येत आहे. या प्रक्रियेत कायद्याला बगल देण्यात आल्याचा स्पष्ट संशय व्यक्त होत आहे.

तात्पुरत्या उत्खननाच्या नावाखाली आदिवासींच्या नावावर परवाने व रॉयल्टी काढली जात असली, तरी त्यासाठी लागणारी आर्थिक देवाणघेवाण प्रत्यक्षात कोण करत आहे, हा प्रश्न अधिकच गडद होत आहे. संबंधित आदिवासींच्या खात्यांमध्ये येणारी रक्कम आणि त्यानंतर होणारे व्यवहार तपासल्यास मोठे आर्थिक जाळे उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, ज्या जमिनींवरून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत आहे, त्या जमिनींचे मालक असलेल्या अनेक आदिवासी कुटुंबांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याचे वास्तव समोर येत आहे. अनेक कुटुंबे आजही दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत असून, उद्योगांमधून निर्माण होणाऱ्या संपत्तीचा त्यांना थेट लाभ होत नसल्याचे दिसून येते. या प्रकरणात जिल्हा उद्योग केंद्रामार्फत मिळालेल्या अनुदानाचाही गैरवापर झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. चुकीची माहिती देऊन अनुदान घेतले असल्यास ती शासनाची फसवणूक ठरू शकते, ज्यामुळे अनुदान वसुली व गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होऊ शकते.

महसूल, खनिज, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पोलीस यंत्रणा या सर्व विभागांच्या कार्यक्षेत्रात येणारे हे प्रकरण असतानाही, इतक्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या व्यवहारांबाबत प्रशासनाने ठोस कारवाई न केल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक स्तरावर सुरू असलेली हालचाल पाहता ही अनभिज्ञता नसून जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याची टीका होत आहे.

या संपूर्ण प्रकरणात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, बेनामी व्यवहार (प्रतिबंध) अधिनियम १९८८, पर्यावरण संरक्षण अधिनियम तसेच भारतीय दंड संहितेनुसार कठोर कारवाईची तरतूद आहे. दोषी आढळल्यास जमीन जप्ती, दंड, अनुदान वसुली आणि कारावास अशा शिक्षा होऊ शकतात.

### पैशांचा मागोवा घेतल्याशिवाय सत्य समोर येणार नाही-

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा आणि दुर्लक्षित मुद्दा म्हणजे आर्थिक व्यवहारांचा. खाणकामासाठी भरली जाणारी रॉयल्टी, परवाने मिळवण्यासाठी केलेले व्यवहार आणि उत्खनन, वाहतूक यांसाठी करण्यात आलेली कोट्यवधींची गुंतवणूक ही सर्व रक्कम नेमकी कोणत्या खात्यातून आली? ज्या आदिवासी बांधवांच्या नावावर परवाने आहेत, त्यांच्या बँक खात्यातून हे व्यवहार झाले का, की इतर कोणीतरी ही खाती नियंत्रित करत आहे? खात्यांचे ऑपरेशन कोणाच्या ताब्यात आहे, याचा तपास केल्याशिवाय या 'बेनामी' साखळीचा खरा सूत्रधार समोर येणार नाही.

### जमिनी कोट्यवधींच्या, पण मालक आजही गरिबीत-

ज्या आदिवासी बांधवांच्या जमिनीवर लाखो-कोट्यवधींची उलाढाल होत असल्याचे चित्र आहे, त्यांची प्रत्यक्ष आर्थिक स्थिती मात्र दयनीय असल्याची माहिती समोर येत आहे. अनेक कुटुंबे आजही दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत असून आर्थिक असुरक्षिततेचा सामना करत आहेत. त्यांच्या नावावर खदान आणि परवाने असतानाही त्यांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याचे स्पष्ट होत आहे. ही विषमता केवळ आर्थिक नाही, तर व्यवस्थेतील गंभीर अपयशाचे द्योतक आहे. एकीकडे कागदोपत्री विकास आणि दुसरीकडे वास्तवातील दारिद्र्य या विरोधाभासामुळेच या प्रकरणाची तीव्रता अधिक वाढत असून प्रशासनाने यावर तातडीने लक्ष देऊन योग्य ती चौकशी करावी आणि आदिवासी बांधवांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन होणारी लूट थांबवावी अशी मागणी जोर धरत आहे.

## अल्पवयीनवरील अत्याचार दडपला? डॉक्टरसह दोघे जाळ्यात

**हिंगणघाट जनमाध्यम :** अकरा वर्षीय मुलीचा लैंगिक छळ प्रकरणी वडनेर येथील डॉ. जवाहरचंद खत्री यांना पोलिसांनी ताब्यात घेत अटक केली आहे. पाचवीत शिकणाऱ्या एका मुलीवर आरोपीने बलात्कार केल्याचे पुढे आल्यावर तिच्या पालकांच्या तक्रारीवरून वडनेर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी नरेश हिरबा दिवे हा मुलीचा नातेवाईक आहे. पीडितेचे वडील घर सोडून गेल्यानंतर त्याने मुलीला फुस लावून तिचा लैंगिक छळ केला. तिच्या त्रासामुळे वडिलांनी मुलीला वडनेर मधील सुयश क्लिनिकमध्ये डॉ. जवाहर खत्री यांच्याकडे नेले.

प्रकरणाचे गांभीर्य असूनही त्यांनी हे प्रकरण पोलिसांपासून लपवल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. त्यांनी पीडितेला फक्त औषध देऊन घरी परत पाठवले. यापूर्वी पोलिसांनी आरोपी नरेश हिरबा दिवे (वय ५२) यास ताब्यात घेतले होते.

तर आता डॉक्टरचीही चौकशी सुरू होती. डॉक्टरने पीडितेवर झालेल्या कथित अत्याचाराची पुष्टी केली. घटनेची माहिती असूनही पोलिसांना कळवण्यात आले नाही. या संदर्भात पोलिसांना ठोस पुरावे मिळाले आहे. डॉक्टरने पीडितेला काही औषधही दिले होते. रुग्णालय आणि मेडिकल स्टोअरमधील सीसीटीव्ही फुटेजही तपासण्यात आले. आरोपी मुलीसोबत दिसला होता. अखेरीस वडनेर पोलिसांनी डॉ. जवाहरचंद खत्री (वय ६३) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले आहे. वडनेर पोलिस ठाण्याचे अधिकारी श्याम पाटील यांच्या मार्गदर्शनात पुढील तपास सुरू आहे.

## जेवड नगरातील मंगल कार्यालयात बालविवाह रोखला

### -महिला व बालकल्याण विभागाचे यशस्वी प्रयत्न

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील जेवड नगर परिसरातील एका मंगल कार्यालयामध्ये होणारा बालविवाह महिला व बालकल्याण विभागाने राजापेठ पोलिसांच्या मदतीने रोखला. साडे १६ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचे लग्न मुंबई येथील तरुणासोबत होणार होते. पोलिसांनी हा बालविवाह रोखला. माहिती नुसार ठरलेल्या मुहूर्तनुसार मुंबईवरून तरुण कुटुंबियासह अमरावती आला होता. अल्पवयीन मुलगी जेवड नगर मध्ये आपल्या आई सोबत भाड्याने राहते. तिच्या विवाह निश्चित झाला होता. याची माहिती मनपाच्या महिला व बालकल्याण पथकाला लागली. विभागाने महिला सेलला याची माहिती दिली. माहिती मिळतात सेलच्या प्रीती ब्राह्मणे पथकासह जेवड नगर येथील मंगल कार्यालयात पोहोचल्या. त्यांनी मुलीचे जन्म प्रमाणपत्र मागितले. त्यामध्ये तरुणी अल्पवयीन असल्याचे लक्षात आले. त्यांनी तत्काळ हा विवाह रोखला. लग्नाची पूर्ण तयारी झाली होती. परंतु पथकाने वेळेवर पोहोचून बाल विवाहाला रोखला. एका राजकीय पक्षाच्या नेताने पण हा बालविवाह रोखण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. राजापेठ पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल केला.

## मध्यप्रदेशातून अवैध रेती वाहतूक करणारे तीन ट्रक व ट्रॅक्टर ताब्यात

### -तिवसा व शेंदूरजना बाजारमध्ये गुन्हे शाखेची कारवाई

**-८४.१२ लाखाचा मुद्देमाल जप्त**



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत मध्य प्रदेशातून महाराष्ट्रात होणारी अवैध रेती वाहतूक रोखली असून, तब्बल ८४ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे वाळू माफियांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. आज बुधवार ६ मे रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या दोन पथकांनी तिवसा आणि शेंदूरजनाघाट पोलिस स्टेशनच्या हद्दीत ही कारवाई केली. तिवसा परिसरातून दोन वाहने आणि शेंदूरजनाघाट परिसरातून दोन मोठी वाहने अशी एकूण चार वाहने अवैध रेतीसह ताब्यात घेण्यात आली आहेत. तिवसा पोलिस स्टेशनच्या हद्दीतून पाच ब्रास रेतीसह ट्रक जप्त करण्यात आला. यात फुलचंद हरसुले (३५, रा. परसापूर) आणि नीलेश गुडधे (अमरावती) या आरोपींना ताब्यात घेतले आहे. दुसऱ्या कारवाईत एक ब्रास रेतीसह ट्रॅक्टर जप्त करण्यात आला असून अभिषेक मुसळे (२२) आणि अजय लोखंडे (५६, दोन्ही रा.आष्टी, जि. वर्धा) यांच्यावर कारवाई करण्यात आली.तर शेंदूरजनाघाट पोलिस ठाण्याच्या हद्दीतून ६ ब्रास रेती असलेला टिप्पर व मोबाइल जप्त करण्यात आले. यामध्ये अरविंद अंबाडकर (४७, रा. लोणी, ता.वरूड), क्रिश बडोदे (२१, मिर्झापूर, ☞(पान २ वर)

## बडनेरात तरुणावर प्राणघातक हल्ला

### -एक आरोपी ताब्यात, २ फरार



**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या इस्लामी चौक मध्ये घरासमोर बसलेल्या एका तरुणावर चाकुने हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. अब्दुल शाफिक अब्दुल रशीद (वय २७) असे हल्ल्यात जखमी तरुणाचे नाव आहे. त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहे. या प्रकरणात पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेतले आहे तर दोन फरार आहे. माहिती नुसार अब्दुल शफिक अब्दुल रशीद (वय २७) गवंडी काम करतो. मंगळवारी रात्री नऊ वाजता तो आपल्या घरासमोर बसला होता. त्यावेळी तीन आरोपी तिथे आले. त्यांनी अब्दुल शफिकवर चाकूने प्राणघात हल्ला केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. यानंतर आरोपी तिथून पळाले. परिसरातील नागरिकांनी आरोपींच्या मागे जाऊन एकाला पकडले तर☞(पान २ वर)

## माजी नगरसेवक विवेक कलोतींविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक जवाहर गेट प्रभागातील माजी नगरसेवक विवेक कलोती यांच्या विरोधात खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची घटना आज बुधवार ६ मे रोजी समोर आली आहे. यामुळे राजकीय वर्तळामध्ये एकच खळबळ उडाली आहे. माहितीनुसार मंगळवारी रात्री माजी नगरसेवक विवेक कलोती यांचे एका ओझा नामक इसमा सोबत वाद झाला होता. हा वाद एवढा वाढला की, मारहाण झाली. तक्रारकर्ता ओझा यांनी माजी नगरसेवक विवेक कलोती यांच्यावर मारहाण आणि शिवीगाळ करण्याचा आरोप लावला. यानंतर त्यांनी तातडीने खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. पोलिसांनी ओझाची वैद्यकीय तपासणी केली. मेडिकल रिपोर्ट आणि प्राथमिक माहितीच्या आधारावर पोलिसांनी विवेक कलोतीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात पृढील तपास पोलीस करत आहे. हा वाद कशामुळे झाला, हे अजून पर्यंत समोर आले नाही पण यामुळे राजकीय वर्तुळामध्ये वेगवेगळ्या चर्चा रंगल्या आहे.

## विभागीय लोकशाही दिन ११ मे रोजी

**अमरावती/प्रतिनिधीः-** विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार येत्या सोमवारी दि. ११ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन विभागीय आयुक्त कार्यालयात करण्यात आले आहे, असे अपर आयुक्त संजय जाधव यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

विभागीय लोकशाही दिनासाठी यापूर्वी प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात येईल. विभागीय लोकशाही दिनात तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांनी तसेच महिलांनी त्यांचे तक्रार अर्ज (तालुका, जिल्हा किंवा महापालिका लोकशाही दिनानंतर) विहित नमुन्यात १५ दिवस अगोदर दोन प्रतीत पाठविणे आवश्यक राहील. नागरिकांनी तक्रार अर्ज dcgamravati@gmail.com किंवा dcg_amravati@rediffmail.com या ई-मेलवर विहित नमुन्यात पाठविण्याचे आवाहन आयुक्तालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

## मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण द्या

### -तिवसा तहसीलदारांना निवेदन



**तिवसा/प्रतिनिधीः-** सकल मातंग समाजाला १९६१ च्या जनगणनेनुसार मातंग समाजाला उप वर्गीकरणानुसार अ ब क ड स्वतंत्र आरक्षण देण्यात यावे,यासाठी तिवसा तालुका सकल मातंग समाजाने तिवसा तहसीलदार यांना निवेदन सादर केले.

१९६१ च्या झालेल्या सर्वेक्षणानुसार एकंदरीत मातंग समाजाची लोकसंख्या ३० टक्के होती. परंतु २०११ च्या सर्वेक्षणानुसार बार्टी संस्थेने दिलेल्या अहवालानुसार मातंग समाजाची लोकसंख्या १९% अहवालात दिसून आली. लोकसंख्येच्या इतक्या तफावतीमुळे उप वर्गीकरणात मातंग समाजाचे नुकसान होऊ नये. मातंग समाजा विषयी महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या उप वर्गीकरण अ ब क ड या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरक्षणाचा लाभ मिळावा ही संकल्पना विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची होती. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, यांनी शोषित, पिढीत, मजूर, वर्गासाठी मोलाचे योगदान दिले.परंतु त्यानंतर मातंग समाजाची शिक्षणाची प्रगती मंदावली. या उपवर्गीकरणामुळे समाजाला योग्य दिशा मिळेल व शिक्षण क्षेत्रात प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही असे निवेदन तिवसा तहसीलदारांना गुरुदेव नगरचे माजी उपसरपंच किरण खंडारे, मोझरीचे उपसरपंच प्रशांत प्रधान, समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते देविदासराव गायकवाड, दिलीप वानखडे, गोपाल वानखेडे, सुनील इंगोले ,शरद हिवराळे, जनार्दन वानखडे, इत्यादींच्या उपस्थितीत देण्यात आले.

### विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या प्रदेशाध्यक्ष

## रंजना मामर्डे यांचे निधन




**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रंजना मामर्डे यांचे बुधवार, ६ मे २०२६ रोजी दुपारी १.३० वाजता त्यांच्या निवासस्थानी 'शशिशंकर वास्तू' जयराम नगर, राजापेठ, अमरावती येथे हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने विदर्भ राज्य आंदोलन चळवळीला मोठा धक्का बसला आहे.

त्या कणखर नेतृत्व, प्रभावी वक्तृत्व आणि महिलांना संघटित करण्यासाठी ओळखल्या जात होत्या. शेतकरी, महिला आणि प्रादेशिक प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवला. त्यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनाला व्यापक स्वरूप मिळाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार, दिनांक ७ मे २०२६ रोजी, सकाळी ११ वाजता हिंदू स्मशानभूमी, अमरावती येथे अंत्यसंस्कार होणार आहेत.

## मिरची पूड टाकून कर्मचाऱ्याला लुटण्याचा प्रयत्न

**अमरावती/प्रतिनिधीः-** पंचवटी चौक येथील डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालयात काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याला बँकेत पैसे जमा करण्यासाठी जात असताना डोळ्यात मिरची पूड टाकून लुटण्याचे प्रयत्न करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. कर्मचाऱ्याच्या सतर्कतेमुळे आरोपींचा प्रयत्न फसला. कर्मचारी निरंजन अजाबराव राऊत (४०, दर्यापूर) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी १६ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार निरंजन राऊत डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालयात परिचर पदावर कार्यरत आहे. रुग्णालयात जमा होणारे पैसे गोळा करून ते नेहमी इंडियन बँक मध्ये जाऊन जमा करतात. मंगळवारी गोळा झालेले २ लाख १० हजार रुपये ते बँकेत जमा करण्यासाठी दुपारी ३.३० वाजता पायदळ जात होते. त्यावेळी समोरून आलेल्या एका आरोपीने त्यांच्या डोळ्यात मिरची पूड फेकली. यामुळे निरंजन घाबरले आणि रुग्णालयाकडे धावले. आरोपींनी यावेळी त्यांच्या जवळील पैशाची बॅग झपाटण्याचे प्रयत्न केला. निरंजन यांनी बॅग सोडली नाही आणि आरडाओरडा करून मदत मागितली. यामुळे आरोपी तेथून पळाले. गाडगे नगर पोलिसांनी कलम ३०९(५) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## वर्धा-हिंगणघाट मार्गावर भीषण अपघात मोटरसायकल चालक ठार





**वर्धा जनमाध्यम :** वर्धा–हिंगणघाट मार्गावरील इंझापूर परिसरात बुधवारी सायंकाळच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात मोटरसायकल चालकाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून वाहतुकीत काही काळ खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, मोटरसायकल एक्स ६९५५) आसाताना (क्रमांक एमएच ३२ वर्ध्याकडे येत समोरून येणाऱ्या बोलेरो (क्रमांक एमएच ४० बीएल ७८३८) या वाहनाला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की मोटरसायकल चालक गंभीर जखमी होऊन जागीच मृत्युमुखी ☞(पान २ वर)

## धमक्यांना कंटाळून महिलेची आत्महत्या

### - दोन महिलांवर गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीतील राजेंद्रनगर परिसरात एका महिलेने सततच्या धमक्या व मानसिक छळाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोन महिलांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा नोंदविला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी रुपेश बनसोड (वय ४६, रा. राजेंद्रनगर, महादेवखोरी, अमरावती) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, वर्ष २०२२ मध्ये त्यांच्या परिसरातील विजय भोंगाडे यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा मुलगा रोहित विजय भोंगाडे (वय ३८) याच्याशी संबंधित खून प्रकरणात बनसोड व त्यांच्या कुटुंबीयांना आरोपी केले होते. या प्रकरणात त्यांना व त्यांच्या भावाला सशर्त जामीन मिळाला असून न्यायालयाच्या आदेशानुसार ते सध्या यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा येथे वास्तव्यास आहेत व अधूनमधून अमरावतीला येत असतात. दरम्यान, त्यांच्या अनुपस्थितीत बेनोडा परिसरातील दोन महिलांकडून त्यांच्या पत्नीला सातत्याने धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप आहे. 'जेलमध्ये पाठवू' तसेच 'जीवे मारू' अशा ☞(पान २ वर)

## नरसापुर घटनेचा सरयुपारिण ब्राह्मण सभेने केला तीव्र निषेध

### -आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नरसापुर येथे एका निष्पाप, अबोध चिमुकलीवर अमानुष व अनैतिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली. या घटनेचा शहरात सरयूपारिण ब्राह्मण सभेद्वारा बुधवार ६ मे रोजी निषेध करण्यात आला. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात, आरोपी विरुद्ध कठोर कारवाई करण्याची मांगणी करण्यात आली आहे.

नरसापुर येथील घटना निंदनीय आणि माणुसकीला काळीमा फासणारी आहे. या प्रकरणातील आरोपीवर तातडीने कठोर कार्यवाही☞(पान २ वर)

## नागरिकांनी 'स्व-गणना' करावी

### -जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यामध्ये १ मेपासून स्व-जनगणनेच्या मोहिमेला सुरुवात झाली आहे. यावेळची जनगणना पूर्णपणे डिजिटल माध्यमाद्वारे होणार असून, नागरिकांना स्वतःची माहिती स्वतः भरण्याची म्हणजेच 'स्व-गणना' करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे. यावेळच्या ☞(पान २ वर)